

# एकलव्य

विश्वनाथ खैरे

# एकलव्य

# एकलव्य

## तीन अंकी नाटक

पहिली आवृत्ती : १६ डिसेंबर १९७२

प्रकाशक : साधना प्रकाशन
४३१ शनिवार, पुणे ४११०३०

मुद्रक : साधना प्रेस
४३१ शनिवार, पुणे ४११०३०

महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार : १९७४

दुसरी आवृत्ती : २३ मार्च १९८८

प्रकाशक : उमादेवी खैरे
संमत प्रकाशन
३७४ सिंध हाउसिंग सोसायटी
औंध, पुणे ४११००७

प्रतिरूप : ग्राफिना, ११५१ सदाशिव, पुणे ४११०३०

नवी जुळणी : साधना प्रेस
४३१ शनिवार पुणे ४११०३०

प्रतिरूप मुद्रक : श. हे. गुर्जर
आर्यविद्या मुद्रणालय
९९२ सदाशिव, पुणे ४११०३०

मुखपृष्ठ : ल. म. कडू

© उमादेवी खैरे

किंमत पंधरा रुपये

विश्वनाथ खैरे

# एकलव्य

संमत

इतरांच्या आणि स्वतःच्या मुलांच्या
शिक्षणातच ज्यांनी आयुष्य वेचले
त्या
आता स्मृतिरूप राहिलेल्या
**मास्तर** आणि **आई**
यांना

— ईसू

विश्वनाथ खैरे

वंशाचा व्यास

युगाणीं

द्रविड महाराष्ट्र
मराठी भाषेचे मूळ

अडगुलं मडगुलं
भारतीय मिथ्यांचा मागोवा

एकलव्य नाटकाची ही दुसरी आवृत्ती.

साधना प्रकाशनाची पहिली आवृत्ती संपून बारपाच वर्षे झाली. तिच्या प्रकाशनप्रसंगी थोर रसिक विचारवंत दि. के. बेडेकर यांनी दिलेला आशीर्वाद सुफळ झाला. विचारी मराठी वाचकाची दाद नाटकाला १९७४ साली लाभलेल्या राज्य पुरस्कारातही व्यक्त झाली.

रंगमंचावर नाटकाचा प्रयोग असा एकच झाला, तो ज्ञान प्रबोधिनीचे व्रती कुलगुरू अप्पा पेंडसे यांच्या प्रेरणेने आणि प्रभातचे ध्येयवादी दिग्दर्शक यशवंत पेठकर यांच्या मार्गदर्शनाने. वंदनीय अच्युतरावजी पटवर्धन यांची फार इच्छा होती की त्याचा इंग्रजीत प्रयोग जे. कृष्णमूर्तींच्या समोर व्हावा. दुर्दैवाने कृष्णजींच्या निर्याणामुळे ते झाले नाही.

प्रकाशनाच्या वेळी झालेल्या व्याख्यानांमध्ये नाटकाचे अंतरंग समर्थपणे उलगडून दाखवले गेले होते. व्याख्यानांचा तो भाग या आवृत्तीत ' परिचय ' या मथळ्याखाली दिला आहे.

' ग्राफिना ' चे ऐतिवडेकर यांनी प्रतिरूप पारिकांचे काम हौसेने अंगावर घेतले. आर्यविद्या मुद्रणालयाने छपाई-बांधणी त्वरेने करून दिली. ल. म. कडू यांनी अर्थपूर्ण चित्र करून दिले. त्याचे ठसे के. जोशी यांनी बनवले. एकलव्याच्या या सर्व सहायक मित्रांचे आभार मानतो.

पुणे ४११००७
२३ मार्च १९८८

विश्वनाथ खैरे

# परिचय

## दि. के. बेडेकर

मी हे नाटक चारपंचमांश ऐकलेलं आहे आणि कालपरवा मी ते सबंध पुन्हा जेव्हा वाचलं तेव्हा मला अस वाटलं की, फार मौलिक– काय करावं, मराठी साहित्यामध्ये सगळे शब्द झिजून गेले आहेत – फार चांगलं असं हे एक नाटक झालेलं आहे.

हे अत्यंत विद्रोही नाटक आहे, हे, कुणी नुसतं वाचूनसुद्धा बघितलं तरी त्याच्या मनावर ठसेल. हे विद्रोही नाटक विद्रोहाचं अध्यात्म सांगतं. म्हणजे असं की, काही प्रसंग अत्यंत अध्यात्मिक पातळीवर गेलेले आहेत.

कोणत्याही क्रांतीचा इतिहास पाहिला तर असं दिसून येईल की, ती क्रांती होण्याआधी सर्वसामान्य जनतेपर्यंत आणि त्याआधी विचारवंतांमध्ये क्रांतीचं किंवा विद्रोहाचं अध्यात्म सांगितलं गेलेलं असतं. तो सर्वांगीण विद्रोह असतो. ज्ञान, श्रम, समाजव्यवस्था, सेक्स या प्रत्येक बाबतीत विद्रोही भूमिका रूढ व्हायला लागते. त्या भूमिका वेगवेगळया विषयांवरल्या असतात. त्यांचं मग नुसतं एकीकरण होत नाही, तर त्या एकीकरणामधून समाजामधल्या विचारवंतांना काही प्रमाणात, आणि समाजामधला जो पीडित वर्ग असतो त्यांना फार मोठ्या प्रमाणावर, गती मिळू लागते. आणि मग जे विद्रोहाचं अध्यात्म असतं ते प्रत्यक्षात अवतरतं.

आजपर्यंत अनेक नाटककारांनी पौराणिक आणि ऐतिहासिक कथांचा वापर केला आहे. कलावंत वर्तमानावरही उत्कृष्ट लिहू शकतो तरी भूतकाळाकडे का वळतो ? तर, तो भूतकाळ सपाट असा नसतो. त्यातही सत्ताधारी आणि विद्रोही हा झगडा फार जुन्या काळापासून चालू आहे.

महाभारत, रामायण यांबद्दलच्या आपल्या कल्पनांमध्ये दोन बदल करावयास हवेत. डॉ० भांडारकरांनी प्रथम सांगितलं की, हे पुराणग्रंथ आहेत; त्यांत इतिहास नसून मिथे–मिथ्स–आहेत. ती महाकाव्ये आहेत, म्हणजे प्रतीकात्मक आहेत. निरनिराळ्या मानवी प्रश्नांना त्यात मुळापासून हात घातला आहे. दुसरं अस की, व्यास आणि वाल्मीकी दोघेही हीन कुळातले; प्रस्थापित समाजाची संस्कृती त्यालाच भ्रष्ट करीत होती, त्याच्याविरुद्ध ते उभे राहिले होते– जसे सॉक्रेटिस आणि ख्रिस्त हे त्यांच्या समाजाविरुद्ध उभे राहिले. शंबुकाच्या

किंवा वालीच्या कथांतून, गोरखाच्या शाली घालून का होईना, त्यांनी प्रस्थापिताचा निषेध केला आहे; खांडववन–दहनाच्या वर्णनातून आपल्या परिसरातल्या नागनिषाद संस्कृतींना नष्ट करण्याची आर्यांची वृत्ती दाखवली आहे; एकलव्यासारख्या अनेक कथांतून, या संस्कृतीचा उगमच भ्रष्ट आहे हेच मूळी कवी सांगत आहे. म्हणून आजच्या संस्कृतीसंबंधी ज्याची विद्रोहाची भूमिका आहे त्याला अशा कथा दृष्टीस पडतात.

अनेक लेखकांनी अशा कथांना स्वतःच्या उपयोगासाठी भ्रष्ट करून नागवलं आहे – एक्स्प्लॉइट केलं आहे. पुराणकथेत जे आहे त्यात बदल करण्याचा निरंकुश कवीलासुद्धा अधिकार नाही. परंतु असा फेरफार न करता, त्या महाकाव्यात जर विद्रोहाची ठिणगी असेल तर ती उचलून तिची मोठी ज्वाला करणं हे बरोबर आहे आणि खैरे यांनी तसं करताना, एकलव्याच्या सबंध कथेमधून, व्यासांना जे अभिप्रेत होतं असं मला वाटतं, तेच उघड केलंय. इतकंच नव्हे, तर त्याला प्रचंड असा आधुनिक संदर्भ दिला आहे. हा प्रचंड संदर्भ नव्याने देऊन त्यांनी असा एक एकलव्य उभा केलाय की जो या नाटकामध्ये एकच एक गोष्ट सांगतो. सर्वांगीण विद्रोहाची भूमिका एका नाटकामध्ये सांगता येणार नाही पण विद्रोहाचं एक महत्वाचं अंग, ज्ञान, ते ज्ञान म्हणजे काय हे तो सांगतो; विकलेलं ज्ञान, विकाऊ ज्ञान, स्वतःला विकून घेण्यासाठी होणारं ज्ञानग्रहण आणि एकंदरीत सबंधच ज्ञानव्यवस्थेबद्दल बोलतो. समाज कितीही भ्रष्ट असला तरी शेवटी मानवाची ज्ञानप्रक्रिया, त्याचा श्रम करण्यामधला आनंद, त्याचं कामजीवन, अशा काही गोष्टी ह्या स्वतःच्या जोमानं टिकून राहतात, आणि वाढतात सुद्धा. म्हणूनच प्रत्येक काळात विद्रोह करणारे हे ज्ञानाचे, कलेचे उपासक असतात.

आज पुन्हा असा काळ आलेला आहे की, आपल्या देशामध्ये कित्येक शतके नांदलेल्या या भ्रष्ट समाजरचनेने, वर्णव्यवस्थेने अनेक व्यक्तींच्या आणि जातींच्या हृदयापर्यंत खोलवर केलेल्या जखमा वाहू लागल्या आहेत. अशा वेळी महाभारताच्या विद्रोही ठिणग्यांमधून आणि आजच्या सबंध समाजाच्या विरुद्ध उठू पाहणाऱ्या विद्रोहाला एक संदर्भ म्हणून जी एक ज्ञानमीमांसा, ज्ञानाचं पावित्र्य, ज्ञानाचं मूळ स्वरूप सांगण्याची जिद्द ही सगळी या एकलव्याच्या स्वरूपात खैरे यांनी मांडलेली आहे.

वंचर हाही मुक्त जीव आहे. त्याचा मुक्तपणा हा ज्ञाननिष्ठाचा नाही. पण तो नुसता वनचराचाही नाही, नसावा. शहरातल्या माणसाचाही असायला पाहिजे.

मनुष्य कुठेही असला तरी त्याने माणसाच्या स्वातंत्र्याची, उत्स्फूर्ततेची कदर राखलीच पाहिजे.
प्रत्येक कलाकृती प्रतीकात्मकच असते. म्हणून तिच्यावर एकलव्य वंचर आदी पात्रांच्या मर्यादा पडत असतात. हे नाटक म्हणजे महाभारताच्या कथेच्या मर्यादेत आणि तरीही त्या मर्यादा पार ओलांडून जाणारा, विद्रोहाच्या बाबतीमध्ये आजचा विद्रोह आणि पाच हजार वर्षांपूर्वीचा समाजातील विद्रोह यांची एक सलगता बांधून देणारा असा प्रयत्न आहे.

नाटकाचं प्रायोगिक यश हे जर नाटकातल्या गाण्यांवर किंवा पडद्याला लावलेल्या अत्तरावर अवलंबून असेल तर त्या यशाबद्दल मला फारसा लोभ नाही. या नाटकाला प्रायोगिक यश लाभलं तर मला आनंदच होईल. परंतु हे नाटक वाचलं जाईल, वाचलं जावं. कादंबऱ्या, कविता आपण वाचतो तसंच हे नाटक ही एक कलाकृती म्हणून, हृद्य विचारणीय वाचनीय कलाकृती म्हणून, तिचं यश वाढत जावं असं मला वाटतं.

## यदुनाथ थत्ते

साधनेच्या धोरणाला धरून असं हे एक प्रकाशन आहे असं मला मुद्दाम आवर्जून सांगावंसं वाटतं.

एकलव्याची आपल्याला रूढकथा माहिती आहे. इतकी रूढ आहे ती, की त्यानं अंगठा कापून दिला, फार गुरुभक्त होता, याच्यापलीकडे एकलव्याच्या कथेमध्ये सखोल जाऊन त्याचे जे अनेक धागेदोरे आहेत त्यांच्यासंबंधी आपल्या मनामध्ये कधी विचार शिवत नाही. किंबहुना सोप करता करता आपली प्रचलित समाजरचना जी आहे ती जशीच्या तशीच कायम राहावी अशा पद्धतीनेच आपण जुने ग्रंथसुद्धा लावून दाखवतो असा माझा एक समज झाला आहे.

मला असं वाटतं की, एकलव्याकडे नव्या दृष्टीने पाहण्याचा प्रयत्न फारसा झाला नाही. त्याच्यामध्ये द्रोणाच्या जीवनामधले जे काही धागेदोरे आहेत, द्रोण मानव म्हणून जो आहे, एकलव्य माणूस जो आहे, जी समाजरचना आहे त्या समाजरचनेचेही धागेदोरे त्याच्यामध्ये गुंतलेले आहेत– असे हे सगळे धागेदोरे अनासक्त वृत्तीने पण निर्भयपणाने आपल्या पुस्तकात मांडणं हे फार अवघड असतं आणि हे कार्य खैऱ्यांनी बजावलेलं आहे असं मला वाटतं.

सगळ्या अडचणींतून एकलव्याने जी विद्येची साधना केली तिचा पुस्तकाच्या

अखेर शेवट जो त्यांनी केला आहे त्यामध्ये तो द्रोणाचार्य असं म्हणतोय की जोपर्यंत जिज्ञासा म्हणून जिवंत आहे तोपर्यंत एकलव्याची कहाणी माणसाला विसरणं अशक्य आहे आणि शेवटी गुरू जो असतो तो बाह्य नसतो, माणसाच्या मनामध्येच गुरू असतो.

असं दिसून येतं की, पब्लिक स्कूलमधला तो अर्जुन आणि म्युनिसिपालिटीच्या शाळेमधलाच जवळ जवळ एकलव्य यांच्यामध्ये जेव्हा सामना झाला तेव्हा पब्लिक स्कूलचा मनुष्य हा अधिक कनिंग होता, कारण त्याने अंगठा कापून मागितला आणि म्युनिसिपालिटीच्या शाळेत शिकलेला अगदी साधा बिचारा जो एकलव्य होता त्याला त्याची फिकीर नव्हती. त्याला विद्या मिळाली याचाच आनंद इतका होता की, अंगठा गेला तरी बेहत्तर आहे अशा पद्धतीने तो वागला. पब्लिक स्कूलचं प्रकरण अजूनही आपल्या देशात चालू आहे. तेव्हा एका अर्थानं ही जुनी कथा आहे आणि दुसऱ्या अर्थानं ही आजच्या काळालासुद्धा तितकीच लागू पडणारी कथा आहे. नाट्यरूपाने त्यांनी मांडली आहे.

हे नाटक बसवलं जाईल किंवा जाणार नाही. हे नाटक वाचण्यासारखंच आहे असं मला वाटतं. कारण की, विचारप्रधान आहे. नाटकाच्या मंचाकरता, स्टेजकरता ज्या दुरुस्त्या कराव्या लागतील त्या तेव्हा करता येतील. परंतु अशी शक्यता निर्माण होते, की स्टेज करायचं म्हटलं की मग ते सेन्सॉर, ती त्यांनी केलेली तपासणी, मग त्याच्यानंतर त्यांनी केलेल्या सूचना... अशा स्थितीमध्ये लेखकाचं खरोखर आविष्कार-स्वातंत्र्य ज्याच्यामध्ये अबाधित राहिलेलं आहे अशा पद्धतीने ही कलाकृती प्रगट करण्याचा आमचा प्रयत्न होता.

## केशव मेश्राम

एकलव्याची गोष्ट ही पुराणकथा आहे आणि पुराणकथा थिजलेल्या असतात, स्वतःचं असं एक स्वरूप त्यांना असत की जे आपण बदलू शकत नाही. उदाहरणार्थ दुर्योधनाची वृत्ती, भीमाचा बलदंडपणा, अर्जुनाचा पराक्रम, धर्माने वेळोवेळी या सर्वांना घातलेला मोडता ह्या गोष्टी बदलणं तुमच्या, माझ्या कोणाच्याच हातात नाही. असं असताना एखादा लेखक जेव्हा जुनी कथा घेतो आणि तिला एक नवा अन्वयार्थ देण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्याच्यावर असणारी जबाबदारी ही नेहमीपेक्षा दुप्पट असते. त्यातही जो वाङ्मय प्रकार खैरे यांनी निवडला आहे तो नाटकाचा आहे— ज्याचं यश रंगभूमीवर, अभिनयावर आणि रंगरंगोटीवरही अवलंबून असतं.

असं असताना नाटकाच्या स्वरूपामध्ये एखादं नवीन अर्थभाष्य देण्याचा प्रयत्न करणं, एक नवा अन्वयार्थ देणं हे मूलत: एक आव्हान आहे. ते पेलायला एक वेगळी जिद्द लागते ती नाटककारात आहे.

जुन्या पद्धतीचा नाटकीपणा त्यांच्या भाषेत नाही. परंतु ही भाषा लवचिक आणि मनाचा वेध घेणारी आहे. म्हणूनच " जेव्हा द्यायला काहीच नसतं तेव्हा द्यायचं फार सोपं असतं. " अशासारखी वाक्यं खैरे सहज लिहून जातात. किंवा द्रोणाची व्यथा व्यक्त करणारी वाक्ये पाहा : " मन जळत होतं पण पोट जाळीत होतं. अरे ह्या पोरांना कोरड्या विहिरीतली विटी काढतो म्हणालो न् लागलीच शूद्रासारखं विनवलं, गोळाभर भात द्या रे आधी ! ... माझ्या विद्येचा व्यापार केला. वाटलं मी विकणारा आहे ! खरा विकला गेलो तो मी ! " " मी साऱ्यांचा, सारेजण माझे " असं म्हणणारा एकलव्य मला केशवसुतांच्या नव्या शिपायासारखा जाणवून जातो. या भाषेने नाटकाचा प्रभावीपणा व सामर्थ्य आणखीच वाढायला मदत झाली आहे.

दुसरा अंक पहिल्या व तिसऱ्या अंकाइतका चढत नाही. त्या दृष्टीनं या नाटकाचं प्रायोगिक यश भविष्यात ठरेल. पण चांगल्या कलाकृतीचं यश इतकंच असतं की ज्या ज्या वेळेला ती तुम्ही वाचता त्या त्या वेळेला एक नवीन पैलू तुमच्या मनामध्ये निनादून उठायला ती मदत करते. या दृष्टीने खैरे यांच्या एकलव्याला खूप मोठं यश मिळालेलं आहे.

## दया पवार

दोनतीन दिवसांपूर्वी हे नाटक ऐकण्याचा योग मला आला असतानाच आजवर लिहिल्या गेलेल्या मराठी नाटकांपेक्षा हे नाटक मला विलक्षण आणि वेगळं वाटलं. कारण आजवरच्या नाटकांत बहुतांशी मध्यमवर्गीयांची कौटुंबिक सुखदु:खं वर्णिली आहेत. या नाटकात मात्र माणसाच्या तुच्छतेसंबंधी मोठा आशय लेखकाने पकडला आहे आणि हे नाटक सर्व भारतीय जीवनाला व समाजरचनेला स्पर्श करते असं मला भासलं.

सामान्य मराठी नाटकाला अपवाद असं " भूमिकन्या सीता " हे वरेरकरांचं एकच नाटक मला आठवतं. त्यात भारतीय समाजानं परित्यक्तजीवन दिलेल्या स्त्रीच्या वेदनेला मामांनी वाचा फोडली. नाट्यसृष्टीतून शूद्र तेवढा राहिला होता. एकलव्याच्या रूपाने खैरे यांनी शूद्राच्या जीवनाला वेगळ्या तऱ्हेने स्पर्श केला आहे. एकलव्याइतकंच हे नाटक दुभंगलेल्या मनाच्या द्रोणाचार्याचं आहे. हे विचारवंताचं

दुभंगलेपण आहे. तो विचार करू शकत असला तरी समाजव्यवस्थेला बांधला गेला आहे, पोटाची खळगी भरण्यासाठी विकला गेला आहे. सालीच्या आत एकत्र पण वेगवेगळ्या वाढणाऱ्या लिंबाच्या फोडींसारख्या जातींच्या व्यवस्थेतून तो बाहेर पडू शकत नाही.

द्रोणाच्या बरोबर विरोधी आहे तो विद्रोही आवाजाचा एकलव्याचा साथी वंचर. त्याला नेमकं जीवन समजलेलं आहे. तो निष्पाप आहे. नागरी संस्कृतीचे नियम त्याला माहीत नाहीत. तो विद्रोही भाषा वापरतो. तिच्यात अकांडतांडव नाही, मिष्किल उपरोध आहे. राजचिन्हे दाखवणाऱ्या दुर्योधनाला तो जनावरांना डाग देण्याच्या त्यांच्या पद्धतीचं उदाहरण देतो आणि ही जातिव्यवस्था तशीच आहे काय असं सुचवून त्याला बघता बघता भुईसपाट करतो. त्याचा विचार परखड आहे. द्रोणाचार्य एकलव्याला क्षत्रिय करायला निघतात तेव्हा " माणसामाणसांत फूट पाडणाऱ्या या कवटाळात तू सापडू नकोस " असं तो सांगतो. त्याचप्रमाणे एकलव्यसुद्धा " विद्या हवी पण तिच्यासाठी माणुसकी सोडायला लावू नका " म्हणून विनवतो.

नाटक लिहिताना लेखकाच्या नजरेसमोर आजचा संदर्भ होता की नाही मला माहीत नाही; पण ते ऐकत असताना मला मात्र आजचा एकलव्य, द्रोण, क्षत्रिय कुठं आहे ते जाणवत होतं. आणि म्हणून अनेक वाक्यं वेगळ्या अर्थानं प्रतीत होत होती. आजचा विचारवंतही वेतनाच्या दोऱ्यांनी बांधला जात आहे आणि आपला मुक्त आवाज देत नाहीये हे द्रोणाच्या रूपानं जाणवत होतं.

एकलव्यात वंडखोरी नाही. बारा वर्षांच्या अध्ययनानंतर विश्वाशी तादात्म्य पावण्याइतका तो वर जातो आणि म्हणून अंगठा लीलया कापून देतो. तरी या नाटकात तो जो कुठे कुठे अध्यात्मात कमालीचा गुरफटलेला वाटतो तो मला प्रामाणिकपणे आवडला नाही. अर्थात " विद्या किंवा उन्नती ही ज्याची त्यानंच करून घ्यायची असते " हे अनेक ठिकाणी त्याच्याच तोंडून लेखकानं नेमकं सांगितलं आहे. " ध्यान हे धनुष्य, आपण स्वत: बाण आणि सारं विश्व हे त्याचं लक्ष्य " अशा शब्दांत एका वेगळ्या एकलव्याच्या माध्यमातून मानवतावादाला स्पर्श करणारं असं खूपसं चांगलं नाटक पुष्कळ काळानंतर मराठीत वाचायला मिळालं. महाराष्ट्रानं जास्तीत जास्त कौतुकानं रंगमंचावर आणून ते यशस्वी केलं तर महाराष्ट्र विचारी झाला असं आपण मानू. नाहीतर भूतकाळातल्या त्याच त्याच प्रकारच्या व्यक्तिरेखांमध्ये तो गुरफटून राहणार. या नाटककारानं एका वेगळ्या विज्ञाननिष्ठ भूमिकेतून लिहिलेलं हे नाटक नाट्यसृष्टीला एका क्रांतिकारक प्रवाहाला नेणारं आहे असं मला वाटतं.

मुंबई, १६–१२–'७२

प्रकाशन प्रसंगी

पराकाष्ठेच्या गुरुभक्तीचे उदाहरण म्हणून एकलव्याची कथा आपल्याला परिचित असते. एक दिवस महाभारतात ( आदिपर्व, अध्याय १३१ : गीता प्रेस आवृत्ती ) ती कथा वाचीत असताना तिच्यात पवित्रभीषण नाट्य भरलेले आहे असे अचानक जाणवले. त्यातून हे नाटक झपाट्याने लिहून झाले. विद्याधर करमरकर व राजाभाऊ जोशी यांनी पहिले आणि केशव मेश्राम यांनी नंतरचे हस्तलिखित वाचून आवडल्याचे सांगितले.

कृती हे कर्तव्य मानणारे यदुनाथ थत्ते यांनी त्यात रस घेतला. त्यांनी ते स्वतः ऐकले, वाचले आणि २-९-७२ रोजी नाट्यवाचनाचा कार्यक्रमही घडवून आणला. एस्. एम्. जोशी, दि. के. बेडेकर, अरविंद मंगरूळकर यांसारख्या उपस्थित मान्यवरांना तो पसंत पडला असे वाटते. मित्रांनी आपली पसंती सांगितली.

'साधना प्रकाशना'ने जबाबदारी घेतली म्हणूनच इतक्या लवकर हे नाटक सर्वांपुढे येत आहे. सत्वर आणि निर्दोष मुद्रणाचे श्रेय 'साधना प्रेस'चे आहे. हव्या तशा वेष्टनासाठी 'मावळ सेवा मंडळा'चा हातकागद आणि सुभाष अवचटांची हातकला उपलब्ध झाली.

सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो.

नाटकाचे बीज मला सापडले पण त्याचे संवर्धन आरंभापासून अखेरीपर्यंत माझी पत्नी उमा हिने केले. अपत्याच्या संबंध नावात फक्त पित्याचे नाव घालण्याच्या प्रथेमुळेच, या वाङ्मय-अपत्याचा जनक-लेखक म्हणून माझे नाव घालीत आहे.

घाटकोपर, मुंबई-८६.
१६ डिसेंबर '७२

—वि. आ. बुवा

## अंक पहिला

### प्रवेश पहिला

[ स्थळ : द्रोणाचार्यांची कुटी.

वेळ : आवशीची.

पात्रे : द्रोणाचार्य : आणि त्यांचा मुलगा अश्वत्थामा.

द्रोणाचार्य वय सुमारे पंचेचाळीस. कमरेला पंचा. वर उपडे. खांद्यावरून कमरेपर्यंत जानवे. डोक्यावर जटाभार बांधलेला. त्यांचे शरीर मूळचे गोरे, आता तांबूस झालेले. ते एका कसलेल्या तिरंदाजाचे आहे. अंगावर वायफट चरबीचा कण सापडायचा नाही, चेहरा बुद्धिमान सत्त्वयुक्त पण करड्या शिस्तीच्या शिक्षकाचा; त्याच्यावर प्रेमळपणा नाही पण तो भीतिदायकही नाही. ते हसू शकतात पण प्रसन्नपणे, खळखळून नव्हे. आयुष्यात जे भोगलं-साहिलं त्याच्या खुणा ते मनावर आणि चेहऱ्यावर वागवतात; पण सत्त्वशील पुरुषाचा आदर्श मनापुढं असल्यानं तसे राहण्याचा प्रयत्नही करतात. तप, साधना वगैरे शिस्तीतच वागत आल्याकारणाने त्यांची प्रत्येक क्रिया नेटकी असते. आताही ते सवयीने पद्मासनच घालून बसले आहेत.

अश्वत्थामा त्यांचा मुलगा. वय बारा-तेरा. हलाखीत वाढल्याचे दिसून येते. फार हुषार वडिलांचा हा मध्यमबुद्धी मुलगा त्यांच्याहीसमोर स्वतःला आकुंचित करूनच वागत असतो. आई नसल्यामुळे वडिलांशी जास्त जिव्हाळा वाढला असे झाले नाही. आत्ता त्याला झोप यायला लागली आहे. तो कुटीच्या दारातून आत शिरत आहे. ही कुटी दोन सव्वादोन मीटर उंचीची कोपी. दोनपाखी. वासे एकात एक गुंतवून शाकारलेली. शाकारणी काडाच्या किंवा भातकाड्यांच्या पेंढ्यांची नेटकी. कुटीला मेढ नाही. दारातला चांदईचा भाग शाकारून झाकलेला. खाली तशाच झापाचे दार असते, ते आता उजव्या पाख्यावर पाडून ठेवले आहे. तिची भुई सारवलेली आहे. बाहेर लालसर मातीची जमीन आहे. दूर कोपऱ्यात एक लिंबाचे झाड आहे. पार्श्वभूमीवर गुरुकुलाच्या ' रम्य ' वातावरणाची निदर्शक हिरवीगार झाडी– विशेषतः फुलझाडे वगैरे नाहीत. हा एका गद्यप्रकृती मुनीचा विद्याश्रम आहे याच दृष्टीने त्याची मांडणी आहे. इथला निसर्ग स्वाभाविक रम्य-रुक्ष आहे. आचार्यांची मृगाजिनाची बैठक आहे. मागे

जराशा उंच टाणवीवर एक मोठासा दगडी दिवा जळत आहे. त्याला जवसाचे तेल. आचार्यांचा चेहरा तेलाच्या दिव्याच्या उजेडातच उजळून निघत असतो. अश्वत्थामा आत आल्यावर आचार्यांच्या उजव्या बाजूला, उजेड डोळ्यांवर घेत बसणार आहे. बाहेर झुंजुरका अंधार आहे. आभाळात चांदण्या चमकत आहेत. पार्श्वसंगीत रातकिड्यांचे. बऱ्याच लांब कुत्रे भुंकल्याचा आवाज. ]

**अश्वत्थामा :** [ कुटीच्या दाराशी ] आचार्य...

**द्रोणाचार्य :** [ ध्यानस्थ आहेत; तोंडाने जप चाललेला. हाक ऐकतात; पण चालू मंत्र पुरा होईपर्यंत डोळे उघडीत नाहीत. ]

**अश्व. :** आचार्य,

**द्रोण. :** [ डोळे उघडीत ] कोण ?

**अश्व. :** आचार्य, मी अश्वत्थामा. मी आलो आहे. तुम्ही सांगितलं होतं ना !

**द्रोण. :** [ डोळे उघडून ] ये. आत ये. वाटच पाहात होतो. उशीर झाला तुला. पाणी झालं होतं ना भरून लवकर ?

**अश्व. :** [ आत येत ] होय आचार्य. का नाही होणार ? सगळ्यांचे कमंडलू अन् माझा तेवढा घडा.

**द्रोण. :** तरी उशीर कसा झाला ?

**अश्व. :** मी थांबलो युधिष्ठिराचं भरू लागायला. म्हटलं, सगळ्यांच्या आधी जाऊन तरी काय करायचं ?

**द्रोण. :** [ खिन्न रोषानं·हसून ] असं काय ? बरं बस. अश्वत्था,

**अश्व. :** [ बसतो. कष्टानं जांभई दाबतो. ] आचार्य –

**द्रोण. :** बाळ अश्वत्था, आता आचार्य नको म्हणूस हं. ताता म्हण.

**अश्व. :** पण आचार्य...

**द्रोण. :** [ प्रेमळ आवाजात ] नव्हे नव्हे, ताता.

**अश्व. :** [ बुचकळलेला ] पण आचार्य...नाई...ताता, त्या दिवशी तुमीच काय म्हणाला, ' अश्वत्था, या जानव्याचा अर्थ समजून घे. आता तू पण गुरुकुलातला एक विद्यार्थीच. मला हाकसुद्धा आचार्य अशीच मारायची. '

**द्रोण. :** हो ऽ य. बरोबर आहे. मीच तुला सांगितलं. मी काही विसरलो नाही. पण ते गुरुकुलापुरतं रे. आता तू काही गुरुकुलात नाहीस, आपल्या घरी आहेस ना. अन् आत्ताची वेळही तशी अध्ययनाची नाही.

**अश्व. :** पण ताता, तुम्ही तर मला अध्ययनासाठी बोलावलंत ना ?

**द्रोण. :** अश्वत्था, अरे ही काही नेमलेली वेळ नव्हे. नेमलेली वेळ कोणती ? सूर्य उगवल्या-पासून मावळेपर्यंत. तशी पहाटेची वेळ पण ध्यानाला चांगली. म्हणून तर आम्ही छात्रांना बसवतो पहाटे. पण रात्रीची वेळ विश्रांतीची. एकदा संध्यावंदन संपलं

की सगळे मोकळे. फारच कुणाला वाटलं तर करायचा...? [ अश्वत्थाम्याच्या उत्तराची वाट पाहतात. त्याचे डोळे जड. तो काही बोलत नाही. मग स्वतःच उत्तर देतात ] ...आवडीचा अभ्यास. [ अश्वत्थामा मान हालवतो. ] हा तुझा न् माझा आवडीचा अभ्यास. बर का ! कशावरून सांगायला लागलो...

अश्व. : मला म्हणालात – ताता म्हण.

द्रोण. : [ त्याच्या पाठीवर हात फिरवतात. ] हो, ताताच म्हण. बरं वाटतं ते ऐकलं की. शिस्तीसाठी सांगावं लागतं आचार्य म्हणत जा; पण 'ताता' म्हणून हाक ऐकली की... [ स्वतःशी बोलायला लागतात ] तेवढ्या एका शब्दानं या निवाऱ्याच्या झोपडीला घराचं घरपण येतं...या घराची मालकीण, तुझी आई आज असती... तर मला तुझी चिंताच नसती. मी गढलो असतो गुरुकुलातच...अन् ती गुरुपत्नी म्हणून या उघड्या झोपडीत... एकटीच. म्हणूनच वाटतं गेली ती! झिजत– झिजून. माझ्यासाठी, या पोरासाठी, धर्मकर्मासाठी...आता उरली फक्त आठवण, टोचणारी या पोरासाठी काही तरी करा म्हणणारी. माझ्या घरात माझ्या भीतीनं मुकी होती... आता माझ्याच मनात पोराच्या प्रेमानं ती बोलकी होत असते...प्रेरणा देत असते. [ अश्वत्थाम्याच्या झोपेमुळे त्याला हे काही कळण्याचा संभव नाही. त्याचे अस्तित्व जाणवून पुढे ] बाळ अश्वत्था,

अश्व. : [ झोपेतच आपल्या विचारांची साखळी जोडून ] मग ताता, आपल्या घरीच, असं रात्रीचं, हे अध्ययन– कशाला हो ?

द्रोण. : कसं समजवणार तुला ?

अश्व. : वाऽ ताता ! सगळे तर काय म्हणतात ठाऊकाय ? [ ते बोलावेत म्हणून थांबतो. ते नुसतेच कुतूहलाने पाहात राहतात. ] म्हणतात...आचार्यांच्यासारखं... सबंद जगात कुणाला समजावता यायचं नाही.

द्रोण. : ते म्हणणारच. पण बाहेरच्यांना समजावणाराला स्वतःला समजावता येतं असं थोडंच आहे ? जगाचा दिग्विजयीसुद्धा मनाच्या कोशात वाट चुकतो. अश्वत्था, भुंगे पाहिलेस का तू ? बाभळीच्या लाकडाचं पीठ करतात... कमळात अडकले तर गुदमरून जातात. मी बाहेर धुरंधर तिरंदाज... मनाचा अंदाज घ्यायचं मात्र जमत नाही अजिबात. पण जाऊ दे ते. अश्वत्था, तू नको याचा विचार करू.

अश्व. : [ कंटाळत ] ताता, ह्या आवडीच्या अभ्यासात तुम्ही मला काय शिकवणार हो ? [ उत्साहानं ] मला किनई, फार आवडतं...

द्रोण. : [ घाईनं, गुपित सांगितल्यासारखं, बळेच्या प्रेमळपणानं ] अरे मी ना, तुला अस्त्रं शिकवणार आहे.

अश्व. : [ चेहरा पडतो. ] ती कशाला ?

द्रोण. : अस्त्रं ना ? शस्त्रं कशाला असतात– तशीच. पण ती शस्त्रांसारखी हातात नसतात धरायची. मनातल्या मनात जपायची असतात. अन् शस्त्रानं एका वेळेला एका

माणसालाच मारता येतं. अस्त्रानं मात्र एकदम शेकडो माणसांनासुद्धा—

अश्व. : [ भ्याल्याप्रमाणं ] ताता, मग मला नकोत ती शिकायला. माझा आवडीचा अभ्यास सांगू? चिखलाची चित्रं बनवावी, भुईवर चित्रं काढावी...

द्रोण. : [ चिडून ] तूही एक विचित्रच आहेस. चित्रं काढण्यात काय शिकायचं असतं? माणसाचा जन्म लाभतो तो शस्त्रं, अस्त्रं, योग, वेद हे शिकायला; चित्रं काढायला नव्हे. ताता शिकवणार तर नुसतं शिकायला काय झालं तुला?

अश्व. : मला नाही आवडत माणसं मारायला. मला आपलं तुम्ही...[ जीभ चावतो. ] बरं का ताता, [ उसना उत्साह तोंडावर ] अर्जुन आहे ना अर्जुन...

द्रोण. : त्याचं काय आलं आता?

अश्व. : तो सारखा बोलत असतो असलं काय काय. आत्तासुद्धा मी आलो ना, तर तो तेवढा जागा;—कसलासा जप करीत. ताता, त्यालाच का नाही हो शिकवत ही अस्त्रं?

द्रोण. : शक्य नाही!

अश्व. : का हो ताता?

द्रोण. : [ चिडून ] तुला नसत्या चौकशाच फार. [ सावरून ] अश्वत्था, अस्त्रं किती मोलाची असतात तुला कळत नाही. तू लहान होतास तेव्हा एकदा मी परशुरामांकडे गेलो होतो. कारण ते सगळ्या ब्राह्मणांना खूप धनधान्य वाटीत होते.

अश्व. : [ घाईनं ] मग तुम्ही पुष्कळ आणलंत?

द्रोण. छे: ! [ खालच्या आवाजात ] आम्हांला नेहमीप्रमाणं उशीर झाला. [ अश्वत्थाम्याला ] मी गेलो तर ते म्हणाले, धनधान्य सारं वाटून संपलं. आता राहिल्या दोनच गोष्टी. एक माझं शरीर, दुसरी माझी अस्त्रं! मग मी काय मागितलं असेल?

अश्व. : [ वैफल्यानं ] अस्त्रं! दुसरं काय?

द्रोण. : [ सानंद ] बरोबर! अस्त्रांवाचून...

अश्व. : पण मग ती अर्जुनाला का शिकवत नाही?

द्रोण. : तू आलास मूळपदावर! अरे, गुरूंनी सांगितलंय, ही ब्राह्मणाशिवाय कुणाला द्यायची नाहीत!

अश्व. : असं का हो ताता? ब्राह्मण सगळ्यांत थोर म्हणून? मग ताता, दुर्योधन मला असं का हो बोलत असतो?

द्रोण. : कसं?

अश्व. : म्हणतो, तुला न् तुझ्या वडलांनासुद्धा अखेर माझेच पाय धरावे लागतील!

द्रोण. : [ संतापून कडवटपणे ] ते राजे...ते क्षत्रिय...त्यांच्यापाशी सत्तासंपदा आणि म्हणून हा मद! आमच्यापाशी काय आहे? सरस्वती. ती सदाची उघडी! [ अश्वत्थाम्याला विसरतात. तो बावरून पाहतो. लवकरच त्याची झोप पुन्हा

त्याच्यावर अंमल करते. ] त्यांच्याकडे सुवर्णराशी– आम्हांला गोड शब्दांच्याच सु–वर्णराशी. कधीकधी फुकाचे गोड शब्दही मिळत नाहीत... [ स्तब्ध. अंग कापू लागते. ] ' भटा, बोलतोयस काय तू ? शुद्धीवर आहेस का ? माझा मित्र म्हणे ! अरे, मैत्री कुणाची असते ? मानानं आणि धनानं जे तुल्य असतात त्यांची ! तुझ्यासारख्या दळिंदर बामनाची आणि माझ्यासारख्या धनंतर राजाची नव्हे ! अर्धे राज्य मागायची हिंमत तुझी ? चतकोर भाकरी खाऊन अन् एक रात्र राहून चालता हो कसा ! ' हे महाराजाधिराज पांचालपती द्रुपदांचे बोल ! हा माझा आश्रमातला मित्र... आणाभाका घेणारा अन् वेळ आल्यावर खाका वर करणारा... नाही...याचा बदला घेतल्याशिवाय राहणार नाही- अश्वस्था...

अश्व. : [ तारवटलेल्या अर्ध्या उघडया डोळ्यांनी पाहात असतो. दचकून ] ताता आजच शिकायला सुरुवात करायची ना ? मला कशी कुणास ठाऊक, झोपच येतेय फार-

द्रोण. : [ खेदानं आणि चिडीनं ] शेते निपद्यमानस्य ! झोपाळूचं भाग्यही झोपूनच राहणार ! तुमचं कर्मच वाटतं तसं, त्याला कोण काय करणार ? [ आवेगानं ] अश्वस्था, असा रे कसा ! तेव्हा तसा, आता हा असा ! लहानपणी एकदा, बाजूच्या पोरांचं पाहून दूध मागितलंस प्यायला— मीही असला कर्मदरिद्री की चार गावं धुंडूनसुद्धा वाटीभर दूध काही दिलं नाही कुणी मला ! मग तुझ्या आईला सांगितलं– सुटली बिचारी !– पाण्यात पीठ कालव अन् दे ते पांढरं पाणी त्याला ! अहो, तो पिईल कसा ?... त्याला कुठं समजते दुधाची चव ? अंगावरचं-सुद्धा कधी मिळालं नाही त्याला !...आणि तेव्हा ते पिठाचं पांढरं पाणी घोटघोट पिऊन नाचलास... आता मी इथं विद्येचं दूध वाटायला बसलोय... ही शेकड्यावर मुलं ते पितायत... तुला कसं पिववत नाही ? अन् मी तर तुला निव्वळ साय द्यायला निघालोय, अश्वस्था...

अश्व. : [ झोपेनं डोळे मिटत असतात. त्याचा नाइलाज आहे. एकदम डुलकी खाऊन जागा होतो. अपराधी मुद्रेनं वडिलांकडे पाहतो. ] सांगा ताता. करा सुरुवात.

द्रोण. : [ त्याची अवस्था पाहतात. उद्वेगानं ] नको. आज नको. जा, तुला झोप येतेय. जा. खरंच जा. [ त्याचा विश्वास बसत नाहीय्. ] रागावून नाही सांगत. उद्या ये लवकर. तुझं पाणी भरायचं लवकर व्हावं म्हणून घडा दिलाय तुला हां. लवकर उरकून येत जा. अन् हसतमुखानं. कुणी विचारलं तर सांग, ब्रह्मकर्म शिकतो म्हणून. जा. [ तरी तो निघत नाही. ] जा ना. [ अश्वत्थामा उठतो. प्रणाम करून, बावरल्या अवस्थेत चोरट्यासारखा जातो. ] वाटतं पुष्कळदा... त्याची आई नक्की म्हणाली असती, तो लहान आहे हो अजून ! पण मला तिचं बोलणं ऐकू येत नाही, फक्त तिचं चित्र दिसतं ...ते, ते...त्या नराधम द्रुपदाच्या राजसभेतलं ! सशासारख्या भेदरलेल्या

अश्वस्थाला पोटाशी धरून उभी राहिलेली ती आठवते... मग मला दुसरं काही सुचत नाही...फक्त सूड !...परशुरामांसारखा !...त्या उन्मत्त द्रुपदाची मस्ती उतरवायला ह्या अश्वस्थाचा प्रतिपरशुराम बनवावा.. आत्तापासून...हिरव्या वेळूला तेलात वाकवून कमठा बनवावा तसा.. मग त्याच राजसभेतल्या अश्वमुखी आसनावर हा माझा पुत्र बसावा.. आणि तोच तो द्रुपद त्याच्यापुढं दीनवाणा उभा राहावा...अश्वस्था, माझं हे स्वप्न खरं करायचं तुझ्या हातात आहे रे...

[ पडदा ]

## अंक पहिला
### प्रवेश दुसरा

[ कौरव-पांडव गुरुकुलात येऊन दोनचार महिने झाले असतानाचा काळ. गुरुकुलातील छात्रनिवासाची दोनपाखी चौसोपी इमारत पार्श्वभूमीवर आहे. तिच्या चौकात खेळण्याची, सामुदायिक कार्यक्रमांची जागा आहे. आत्ता मात्र चार मुले त्या इमारतीपासून जरा दूर अंतरावर काही काम करीत आहेत. एका शेतातले दगडगोटे उचलून बांधावर टाकण्याच्या या कामात दुर्योधन (१७), अर्जुन (१५), अश्वत्थामा ( १२ ) अशा भिन्नप्रकृती मुलांचा समावेश आहे. त्यांची वये कंसात दिलेली. त्यांचा वेष छात्रांचा. सकाळची कोवळी उन्हे पडलेली आहेत. काम रमतगमत चालू आहे. अशा वेळी एकलव्य ( १५ ) आणि त्याचा सेवक सवंगडी वंचर ( २० ) प्रवेश करतात. एकलव्य वर्णाने काळा पण घोटीव शरीराचा, नाकेला आणि चलाख; मात्र त्याच्या गंभीर चेहऱ्यावर शाश्वतचे स्मित असते. प्रयत्न करूनही याला रडवेला करता येणार नाही असे वाटते. नेपाळी किंवा झेन-बौद्ध माणसासारखी अविकारी मुद्रा. तो आपल्या सेवकाच्या काहीसा मागे पण चौकसपणे इकडेतिकडे पाहात चालत आहे. वंचर हा त्याचा साथी थोडा उंच आहे. एकलव्याच्या कमरेला पोटरीपर्यंतचे कृष्णाजिन आहे. कमरेच्या वर तो उघडाच. सेवक मात्र झोकात पोषाख करून आला आहे. वंचराच्या डोईच्या फेट्यामुळे वगैरे तो राजपुत्र वाटत आहे. हे दोघेजण येतात तेव्हा, साहजिकच मुले हातांतले गोटे हातांतच घेऊन त्यांच्याभोवती कोंडाळे करतात. ]

वंचर : काय रे मुलांनो, तुमचा गुरू कुठाय ? [ मुले कुतूहलाने पाहतात पण गप्पच बसतात. अर्जुनाच्या मुद्रेवर मात्र राग. तो एकटक पाहात असतो. अश्वत्थामा पाळीपाळीने एकाएकाकडे पाहतो. दुर्योधन सर्वांत मागून येत असतो. ]

वंचर : काय रे, बोलत का नाही ?

अश्व. : कुठल्या देशाचे राजे हो तुम्ही ?

दुर्यो. : [ येत ] राजा कसला रे ? राजाचं एक तरी चिन्ह आहे का त्याच्या अंगावर ?

वंचर : चिन्ह ? राजाच्या अंगावर चिन्हं असतात काय रे ?

दुर्यो. : अर्थात !

वंचर : असं ? आमच्यांत किनई फक्त गाईबैलांना लाल सळयांचे डाग देतो आम्ही. ओळखायला यावीत म्हणून. तुमच्यात राजालासुद्धा देतात काय रे ?

दुर्यो. : मूढा, राजचिन्हं ओळखता यायला लागतात. तुला नाही जमायचं ते. हा बघ हात. [ स्वतःचा हात हवेत वर करून दाखवतो. ] चक्रवर्तीची सारी चिन्हं कोरलेली आहेत त्याच्यावर; जन्मतःच. [ वंचरावर काही परिणाम नाही. अश्वत्थामा ज़वळ जाऊन वर मान करून पाहू लागतो. अर्जुन फक्त भुवया चढवून पाहतो. ]

वंचर : [ उपरोधाने ] बरं तर...तुम्हा लोकांचा गुरू ओळखायची काई चिन्हं सांगतोस का ?

अर्जुन : [ रागाने ] ए उद्धट, नीट बोल जरा. तुमचा गुरू, तुमचा गुरू असं एकारून काय बोलतोस. आदरानं बोलायचं कळत नाही तुला ?

वंचर : ते आणखी कसं बोलायचं रे ?

अर्जुन : तुमचे गुरुजी, तुमचे आचार्य– असं काही तरी म्हणा की.

वंचर : मला वाटलं एकच गुरू आहे इथं. मला काय माहिती दोनचार आहेत म्हणून.

अर्जुन : पुन्हा तेच ! अहो महाराज, एका आचार्यांची योग्यता इतर लाखो, कोटी माणसांपेक्षा मोठी असते...म्हणून तर त्यांना अहोजाहो म्हणायचं असतं !

वंचर : [ त्रासिकपणे ] अरे पण, केवढाही मोठा झाला तरी माणूस एकच ना ? [ एवढ्यात एकलव्य त्याचा पदर जरा ओढतो. वंचराने मागे पाहताच तो नुसत्या तर्जनीच्या इशाऱ्याने त्याला गप्प बसवतो. ]

दुर्यो. : राजा म्हणे ! रीतरिवाजही नाहीत ! सामंत तरी असतील का ? मानी मात्र दिसतात. अश्वत्थामा, जारे आचार्यांना सांग... [ अश्वत्थामा लगेचच जातो. ] काय नाव रे तुझं ? कोण देशचे राहणारे तुम्ही ? अन् आचार्यांच्याकडे काय काम आहे तुमचं ?

वंचर : माझं नाव वंचर.

अर्जुन : नावही चमत्कारिकच आहे. वंचर म्हणजे काय बुवा ?

वंचर : वंचर म्हणजे वनात मजेनं फिरणारा !

अर्जुन : व न च ऽ र ! मग वंचर काय सांगतोस ?

वंचर : आमच्या बोलीत वंचरच म्हणतो आम्ही !

दुर्यो. : वंचर म्हण, नाहीतर खे-चर म्हण. पुढं सांगू दे त्याला अर्जुना. [ अर्जुन नाराजीनं मान हालवतो. ]

वंचर : आम्ही ससक देशाचे. हिरंधनू आमचा राजा. त्याचा मुलगा एकलवा. मी सेवक. आमच्या एकल्वाला तुमच्या गुरूजवळ विद्या शिकायची आहे.

अर्जुन : पण आचार्यांची शिस्त फार कडक आहे. अन् प्रवेशाच्या आधी ते कसून परीक्षा पण घेतात. [ एकलव्य लक्षपूर्वक ऐकत असतो. ]

वंचर : परीक्षा कशाची, धनुष्यबाणाची ना? तिला काय घाबरतो आमचा एकल्वा. अरे, आमची पोरं उभं राह्यला शिकली कीच धनुकलीनं खेळायला लागतात. आत्ताच आमचा एकल्वा इतका तयार आहे की उडत्या चिमणीच्या पंखातून-सुद्धा तीर मारतो. उजव्या म्हणाल तर उजव्या, डाव्या म्हणाल तर डाव्या! [ एकलव्य पलीकडे आभाळात पाहात उभा आहे. पाय धनुष्यबाण खेचण्याच्या पवित्र्यात. ]

दुर्यो. : एवढा फाकडा आहे तर येतोय् कशाला या गुरुकुलात?

अर्जुन : [ भक्तिभावानं ] असं कसं? आचार्यांच्याजवळ अस्त्रं किती आहेत शिकण्यासारखी!

वंचर : होय ना? तेवढ्याचसाठी...[ एकलव्य त्याला खुणावून जवळ बोलावतो. वंचर त्याच्याकडे जातो. ]

दुर्यो. : हूं. अस्त्रं म्हणे, ती मिळणार फक्त अश्वत्थाम्याला. अन् तो पठ्या विसरणार ती...त्याच्या कुंभकर्णी झोपेत नाही तर खिंकाळी हसण्यात. तुला ठाऊक आहे का आचार्य काय करतात?

अर्जुन : काय करतात?

दुर्यो. : रात्रीच्या वेळी, अश्वत्थाम्याला शिकवत असतात.

अर्जुन : मग त्यात काय झालं? आचार्यच नव्हते का त्या दिवशी सांगत? 'तुम्हा राज-पुत्रांच्याबरोबर धनुर्वेद शिकेल तो, पण तेवढ्यानं कुठं भागणार आहे? ब्राह्मणाला आवश्यक ती विद्याही त्याला शिकलीच पाहिजे. इदं क्षात्रं इदं ब्राह्म असं तो सार्थपणं म्हणू शकला पाहिजे.' अश्वत्थामाही सांगत होता, तो रात्रीचं ब्रह्मकर्म शिकतो म्हणून.

दुर्यो. : कर्म तुझं! ब्रह्मकर्म म्हणे! मला विचार. मी राजा होणार आहे. [ अर्जुनाच्या मुद्रेवर 'आहे ठाऊक' असा भाव. ] मला किट्ट अंधारात दिसतं अन् गुडूप्प शांततेत ऐकू येतं. तू समजतोस तितकं सरळ नाही हे प्रकरण. पण, तुला कशाला सांगा या साऱ्या गोष्टी? [ अर्जुन गोंधळून अविश्वासानं पाहू लागतो. ] ते आले बघ. [ तेवढ्यात द्रोणाचार्य आणि अश्वत्थामा येताना दिसतात. दुर्योधन बोलायचा थांबतो. वंचर आणि एकलव्य पुढे होतात. आचार्य जवळ आले की एकलव्य लगबगीने पुढे होऊन त्यांना वंदन करतो. ]

एक. : [ पायावर पडून ] आचार्य, वंदन करतो, अनुग्रह असावा. [ द्रोण नकळत मागे सरतात; पण त्याच्याकडे लक्ष देत नाहीत. चित्रविचित्र पोषाखातल्या वंचराकडे आवर्जून बघतात. ]

द्रोण. : [ एकलव्याला ] ऊठ रे. [ वंचराला ] काय हो? कुठले राजे म्हणालास रे अश्वत्थामा?

दुर्यो. : राजे कसले आचार्य! शशक देशच्या राजाचे सेवक आहेत झालं!

अश्व. : ताता–चुकलो–आचार्य, राजाचे सेवक एवढे झगमगीत, तर राजा कसा असेल!

द्रुपदापेक्षाही श्रीमंत असेल नाही ?

द्रोण. : [ कपाळावर आठ्या, संताप ] गप्प बैस धुंभा. जगातले इतर सारे राजे नष्ट झाले का काय ?

दुर्यो. : आचार्य, क्षमा असावी; पण असं म्हणण्यानं मानधन वंशांचा अधिक्षेप होतो.

अर्जुन : यात कसला अधिक्षेप ?

द्रोण. : अधिक्षेप ? [ दुर्योधनाकडे करड्या नजरेने पाहतात. ] माझा अमर्याद अधिक्षेप झाला एकदा, तो धुवून काढण्यासाठी तर कुरूंच्या पुत्रांची जबाबदारी पत्करली. अजून तरी—

[ एकलव्य उभा राहिला आहे. आनंद-भावानं आचार्यांच्या मुखाकडं आणि चरणांकडं पाहात आहे. ]

वंचर : [ मध्येच ] गुरू रे, तुझ्याचकडं आलो होतो आम्ही.

द्रोण. : [ भुवया वर जातात. ] तुमच्या मानानं हा तुमचा दास चांगला शालीन वाटतो.

एक. : आचार्य, तुमचा हा दासानुदास तुम्हांला वंदन करीत आहे. अनुग्रह असावा. [ आचार्यांच्या पायावर पडतो : उठतो. ]

वंचर : गुरू रे, यालाच तर आणलाय तुझ्याकडे.

द्रोण. :
दुर्यो. :
अर्जुन :
अश्व. : [ एकदमच ] याला ?

वंचर : हो याला. तुला पटला, फार बरं झालं. हाच एकल्वा. आमच्या हिरंधनु राजाचा मुलगा. यास घे. धनुर्विद्या शिकव. एकल्वा, [ ते सर्वजण अजून अविश्वासाने पाहतात. ]

एक. : आचार्य, तुमच्या मनातला संदेह मी दूर करतो. मी एकलव्य, अंग–वंग–कलिंगांच्या सीमेवरील शशक देशाचा राजपुत्र. हिरण्यधन्वा माझ्या पित्याचं नाव. राजा असला तरी आमचं राज्य गणराज्यासारखंच आहे. हा माझा सेवक वंचर.

दुर्यो. : युवराजाहून सेवक शिरजोर ! काय बिशात कुरूवंशात असं कधी व्हायची !

एक. : नाही युवराज. हा माझा सेवक शिरजोर नाही. तुमच्या लक्षात नाही आलं मघाशी. नुसतं बोट वर केलं तर भडाभडा बोलायचा थांबला. तो अरे तुरे करतो याच्यावर जाऊ नका. आमच्या देशात कुणीच कुणाला अहोजाहो करत नाही. राजालासुद्धा. ऐकलंतच ना तुम्ही ?

अश्व. : पण मग याच्या अंगावर एवढे कपडे अन् तू मात्र उघडा कसा ?

एक. : गुरुबंधो, तेही सांगतो. आचार्य, आमच्या देशाच्या रिवाजाप्रमाणं राजा हाच परंपरेचा वाहक आणि नीतीचा दीपक. प्रजा कितीही बदलली तरी राजा मात्र

मूळपुरुषानं घालून दिलेल्या नीतीप्रमाणंच वागत राहतो. म्हणून आम्ही राजघराण्यातली माणसंच तेवढी मूळपुरुषासारखी उघडी राहतो. म्हणूनच शय्याघरातसुद्धा आमचा तीरकमठा आमच्या बरोबर असतो.

अश्व. : मग आत्ता आणला नाहीस तो?

एक. : बंधो, आश्रमात विनीतपणं शिरायचं असतं ना? ग्या परक्या माणसानं तो आत आणायचा नसतो ना?

द्रोण. : सत्तेच्या सहवासात एवढी नम्रता क्वचितच दिसते. [ दुर्योधनाकडे पाहतात. ] श्री आणि सरस्वती कशा एका निवासात वसतच नाहीत. मी तर सरस्वतीचा श्रीवर विजय घडवायला निघालो आहे. त्याचा पुरःप्रसाद म्हणून हा आणखी एक कोवळा पण समर्थ राजकुमार माझ्या आश्रमात यायला निघाला काय? काही असो...राजपुत्रा, काय नाव म्हणालास तुझं?

एक. : आचार्य, या अज्ञान गोळ्याला एकलव्य म्हणतात.

द्रोण. : छान. एकलव्या, तुझं वागणं मला आवडलं—

अर्जुन : मित्रा,....

दुर्यो. : जरा दमानं घे अर्जुना. कसाला लावल्यावाचून कुणालाही मित्र म्हणणं क्षत्रियाला शोभत नाही.

अर्जुन : दुर्योधना, आचार्यांना ज्याचं वागणं आवडलं तो आपला अमित्र कसा असेल?

एक. : मित्रा अर्जुना, युवराजांना लावू देत ना मला कसाला. तुला–मला हृदयाचा होकार पुरेसा वाटतो. युवराजांना मस्तकाचे मानदंड लावावे वाटतात. लावू दे.

दुर्यो. : एकलव्या, मानी पुरुषांना मस्तकाचे मानदंडच उपयोगी असतात. भावनेच्या धारेला लागलेला विवेक अनर्थाच्या भोवऱ्यात कधी सापडेल याचा नेम नाही.

द्रोण. : [ दचकून ] चुकतोस सुयोधना. शहाण्या माणसानं भावना, विवेक, बुद्धी या साऱ्यांचा मेळ साधायचा असतो. मानदंड तरी कशावरून ठरतात– मूळस्वरूपी नीतीवरूनच ना? मानदंडाच्या मापाला एखादा कमी पडला तरी मूळनीतीच्या कसाला उतरला तर त्याला अव्हेरू नये. राजकुमार एकलव्या, तुझ्या येण्याचा उद्देश काय?

एक. : आचार्यांच्या पायाशी धनुर्विद्येचे धडे घ्यावेत हा.

द्रोण. : [ कडकपणे ] आधीच विचार कर. माझा शिष्य होऊन राहणं वस्तऱ्याच्या धारेवरून चालण्याइतकंच कठीण आहे.

एक. : आचार्य, आपला शिष्य व्हायला मिळत असलं तर त्या वस्तऱ्याची धार मानेवर चालवायलासुद्धा माझी तयारी आहे.

[ द्रोणांच्या मुखावर प्रसन्नता दिसते. अर्जुन कौतुकानं पाहतो. दुर्योधनावर परिणाम नाही. अश्वत्थामा वंचराशी खेळत असतो. वंचर चमकून पाहतो. ]

अर्जुन : साधु, साधु...!

दुर्यो. : साधु काय! अर्थवाद किती करावा माणसानं? वस्तऱ्याची धार मानेवर चालवल्या-वर शिष्य व्हायला हा शिक्षक तरी राहील का?

द्रोण. : सुयोधना, तुला नको त्याची काळजी. एकलव्या, धनुर्विद्येतलं तुला काय काय येतं ते तरी कळू दे.

अर्जुन : हा वंचर मघाशी सांगत होता—

दुर्यो. : उडत्या चिमणीच्या पंखाचा भेद करतो म्हणे!

वंचर : करतोच मग. वाढवून सांगतो की काय मी?

द्रोण. : वाः! कुठं शिकलास हे सारं कौशल्य?

एक. : आचार्य, शशकांची शिक्षापद्धती प्राचीन काळापासून चालत आली तशीच आहे. ज्या लक्ष्याचा वेध करायचा असेल त्याचं आम्ही चित्र काढतो. [ अश्वत्थामा कान टवकारतो. ] मग जिथं बाण लागावा असं वाटत असेल तिथं बाणाचं अग्र लावतो. असा हा भारलेला बाण सोडला की—

अर्जुन : [ एकाग्रपणे ऐकताना ] हा यातुकर्माचाच प्रकार झाला. आचार्य, हा शास्त्र-विहित नाही ना?

द्रोण. : शास्त्रविहित नाही. पण माझ्या गुरूंनी देशोदेशीचे जे प्रकार सांगितले, त्यात हाही एक होता. आपल्याला तो लाभकारक नाही; आणि एकलव्याला इथं शिकायचं असलं तर त्यालाही तो हळूहळू विसरावा लागेल.

वंचर : का रे बाबा? बाण लागल्याशी कारण. भारलेला बाण लागत असला तर तुझं काय जातं?

द्रोण. : हाच तो फरक तुमच्या-आमच्यातला! मूर्तीची उपासना करून इष्टसिद्धी करून घेणं हा ढोबळ आणि म्हणून सदोष प्रकार झाला. साऱ्या मूर्तीमधलं निखळ निर्विकल्प असं परमतत्त्व आकलन करून घेऊन त्या परम अमूर्ताची विधिवत् सेवा केल्यानं—

वंचर : बाबा, जरा समजेल असं बोल.

[ अर्जुन वंचराकडे तिरस्काराने पाहतो. दुर्योधन अस्फुट हसतो. एकलव्याला आता काय होणार याची भीती वाटते. ]

एक. : [ तीव्रपणे ] वंचरा, चूप...

द्रोण. : [ हसतात ] जाऊदेत. वंचरा, तुला नाही समजायचं ते! भल्याभल्यांना समजत नाही. समजलं असतं तर जगात अशी फरपट कशाला झाली असती? असो... पुढला कार्यभाग करू...

अर्जुन : आचार्य, प्रवेशाची परीक्षा घ्यायचीय ना याची? धनुष्यबाण घेऊन येऊ का?

दुर्यो. : संधानाचं लक्ष्य विसरशील. निशाण आण.

वंचर : धनुष्य-बाणच आण नुसता. निशाणाचं काय! त्या लिंबाचं पान म्हटलं तरी उडवून दाखवील तो तुला!

अश्व. : बाप रे! पण तुमच्या चित्रात ती इतकी पानं काढणार कधी? [ सर्वजण हसतात. ]

द्रोण. : राहूदे, अर्जुना. तुम्हा सगळ्यांना शिकवायला घेतलं तेव्हा तुमची काय तयारी होती? अरे, कोरड्या विहिरीतली विटी काढता येईना म्हणून कपाळाला हात लावून काठावर बसला होतात. त्या तुम्हाला धनुर्धर करायला घेतलं. हा सुयोधन मानदंडाचं बोलत होता. दान, विद्यादान सत्पात्रीच करावं हा मानदंड झाला. पण भोजनाचं पात्र रिकामे असलं की पोटापाण्याचा भार उचलणारं मेषपात्रसुद्धा सत्पात्रच होतं. मग त्याच्या पात्रतेचा प्रश्न येत नाही. मग तुमच्यासारख्या शंभर शंभरांना विद्या द्यायचं आव्हानपूर्वक पत्करलं जातं. [ अर्जुन–दुर्योधन यांच्या मुद्रा बदलतात. ]...कारण आत सल होता. साइखडियांकडून शरसंधान करवीन आणि खड्या सैन्याला खडे चारीन असा आत्मविश्वास होता. हा तर विनयी आहे, विद्या केलेलाही आहे. याचक होऊन आला आहे. याचकाला विन्मुख पाठवू नये, अशी नीती आहे. विद्येच्या याचकाला तर कधीच नाही. विन्मुख फिरणाऱ्या याचकाच्या यमयातना या द्रोणाचार्याला फार चांगल्या माहीत आहेत. त्या याला भोगायला लावणार नाही.

अश्व. : आचार्य, मग घ्या ना याला ठेवून. मला फार आवडला. [ त्याच्या हाताला लोंबकळतो. ] तुमची सारी अस्त्रं यालाच द्या...[ अर्जुनाचा चेहरा उतरतो. एकलव्याचा उजळतो. ]

वंचर : एकलंवा ऽ पोराचं तोंड गोड कर... [ एकलव्य अश्वत्थाम्याला आवेगाने कवटाळतो. त्याच्या डोळ्यांत आनंदाश्रू. ]

द्रोण. : तोंड मग गोड कर. एकलव्या, चल तुला विधिवत् प्रतिज्ञा देतो. संकल्प कर.

[ पडदा ]

[ छात्रनिवासाच्या चौसोपी इमारतीच्या मधल्या चौकात वेदी आहे. चारी बाजूंना स्वच्छता आहे. पाणी शिंपडले आहे. आंब्याच्या पानांच्या चारदोन माळा पण लावलेल्या आहेत. वेदीच्या जवळ सडा शिंपून बसण्यापुरती जागा केली आहे. काही विधी संपून माणसे पांगल्याच्या खुणा. उगाच कुठे तरी एक-दोन छात्र रेंगाळताहेत. अश्वत्थामा आणि एकलव्य बरोबर प्रवेश करतात. एकलव्याचा वेष आता बदललेला आहे. तो वर उघडाच आहे, पण खाली कमरेला मात्र निषादाचे कातडी पांघरूण नसून गुरुकुलातल्या छात्रांसारखेच वस्त्र आहे. कपाळाला गंध आहे. पूर्वी त्याचे केस मोकळे होते त्यांची आता माथ्यावर गाठ बांधलेली आहे. मात्र अश्वत्थाम्याच्या गळ्यात आहे तसे जानवे त्याच्या गळ्यात नाही. ते दोघे होमकुंडाजवळ येतात तेव्हा अश्वत्थामा निव्वळ सवयीने चार समिधा उचलून त्यात टाकतो. जाळ किंचित वाढतो. त्याचबरोबर तो बोलत असतो. ]

अश्व. : एका, ॐ भद्रम्... झालं म्हणून तुझं ?

एक. : [ जाळाकडे पाहात ] हो ऽ

अश्व. : तुझं पाठ पण झालं ? मोठा हुशार दिसतोस रे तू !

एक. : पाठ कुठलं होतंय रे इतक्यात ? आचार्य पुढं सांगत होते अन् मी मागं म्हणत होतो. कर्णेभिः म्हणतानाच चूक झाली. एक मुलगा तर हसलासुद्धा मोठ्यानं !

अश्व. : तो दुर्योधन असणार ! दुसरा कुणी नाही. मला मुळीच आवडत नाही. आता तू राहिलास ना इथं, की तुझी न् माझीच गट्टी हां. तुम्ही लोक वनातच राहता ना रे ?

एक. : हो तर, आमचा देश म्हणजे मोठ्ठं वनच आहे. अन् त्यात किनई खूप मोठाली झाडं आहेत, भरून वाहणाऱ्या नद्या आहेत, पिसारेदार मोर आहेत, सुळेवाले हत्ती आहेत. [ सिंहासारखा आवाज काढीत ] ऊऽऊऽम करणारे सिंह आहेत... [illegible] तीर मारून शिकार [illegible] आहेत. [illegible] कधी जाऊ नये, अपमान [illegible]



होतो. आणि म्हणतात, गुरुकुलातला स्नेह म्हणजे पाण्यावरचं तेल, एकजीव कधी होणार नाही अन् बघता बघता उडून जाणार !

एक. : छे छे. मी मात्र विसरणार नाही हं तुला. पण तुझ्या इथल्या मित्रांना आवडेल का रे आपली मैत्री ?

अश्व. : इथले रे कोण मित्र माझे ? हे सारे हस्तिनापूरचे ना ! मोठी ऐट दाखवतात. आमच्या हस्तिनापुरात असं आहे न् तसं आहे. मला तर दाखवतातच– आपसात पण दाखवतात. भीम आहे ना, तो दाखवतो दंडाची बेटकुळी, अन् म्हणतो, बघू कुणाची ताकद आहे– की दुर्योधन मारतो मांडीवर थाप ! झालं ! ताता जरा नजरेआड झाले की, बसलाच एक दुसऱ्याच्या उरावर. अन् बरं का एका, दमदाटी मात्र मला. ' अश्व्या, आचार्यांना सांगितलंस तर बघ हां. दोघं मिळून अश्व्याचा विश्व्या करून टाकू.' एका, तू माझ्या बाजूनं झालास तर चांगली जिरेल त्यांची ! [ चेहऱ्यावर उल्हास. चालता चालता पायाच्या दोन बोटांत खडा धरून तो फेकतो. ]

एक. : मी तुझ्या बाजूचा हां. आचार्य तुझ्याबरोबर मला पण शिकवतील का रे ?

अश्व. : [ चमकतो. त्याचा हात सोडतो. ] तूही एक अर्जुनच दिसतोस ! त्याचं नाही का... [ त्याचा आवाज काढीत ] ' बंधो ऽ ऽ आचार्यांनी काय शिकवलं रे रात्री ? पुरुषसूक्त का ?' – ताता काय शिकवतात ते माझ्या नाही राहात ध्यानात. अन् ते सांगा याला. तू पण...

एक. : नाही नाही. [ त्याचा हात धरतो. ] मी काही विचारणार नाही तुला. तू कसं छान नाव दिलंयस मला. मी एका, तर तू माझा धाकटा भाऊ दुका. दुका–

अश्व. : [ हात सोडवून घ्यायला लागतो. एकलव्य ' आता काय झालं ' अशा मुद्रेने पाहतो, पण हात मात्र सोडीत नाही. ]

अश्व. : मला नको धर्माजीराव... मी नाइ होणार दुका. मग तूच कशाला ? तो युधिष्ठिर आहे की. ( त्याचा आवाज काढीत ) ' बाळ अश्वत्थामन्, आंब्याच्या झाडाला दगड नको हो मारूस, त्याचा काय नेम– उलटला तर अंगावर येईल. अन् झाडालासुद्धा लागेल हो. आपला जसा जीव तसा त्याचा. आंबाच का हवाय तुला ? हा घे. छान पाडाचा आहे बघ–' तो असतो वटवाघळानं पाडलेला रात्रीचा... झालं की, लागलाच हात फिरवायला पाठीवर. तातासुद्धा इतका फिरवत नाहीत...

एक. : बरं राह्यलं ! तू म्हणशील तश्शी गट्टी करू हां आपण. आपण झाडावर चढू, मोहोळ काढू, गलोलीनं चिंचा पाडू, पिपाणीतून सूर काढू... आणखी– आणखी एक गंमत आहे...

अश्व. : काय ?

एक. : गट्टी झाली म्हण, मग सांगतो.

अश्व. : आधी सांग, मग म्हणतो.

# अंक पहिला

## प्रवेश तिसरा

[ छात्रनिवासाच्या चौसोपी इमारतीच्या मधल्या चौकात वेदी आहे. चारी बाजूंना स्वच्छता आहे. पाणी शिंपडले आहे. आंब्याच्या पानांच्या चारदोन माळा पण लावलेल्या आहेत. वेदीच्या जवळ सडा शिंपून बसण्यापुरती जागा केली आहे. काही विधी संपून माणसे पांगल्याच्या खुणा. उगाच कुठे तरी एक-दोन छात्र रेंगाळताहेत. अश्वत्थामा आणि एकलव्य बरोबर प्रवेश करतात. एकलव्याचा वेष आता बदललेला आहे. तो वर उघडाच आहे, पण खाली कमरेला मात्र निषादाचे कातडी पांघरूण नसून गुरुकुलातल्या छात्रांसारखेच वस्त्र आहे. कपाळाला गंध आहे. पूर्वी त्याचे केस मोकळे होते त्यांची आता माथ्यावर गाठ बांधलेली आहे. मात्र अश्वत्थाम्याच्या गळ्यात आहे तसे जानवे त्याच्या गळ्यात नाही. ते दोघे होमकुंडाजवळ येतात तेव्हा अश्वत्थामा निव्वळ सवयीने चार समिधा उचलून त्यात टाकतो. जाळ किंचित वाढतो. त्याचबरोबर तो बोलत असतो. ]

अश्व. : एका, ॐ भद्रम्... झालं म्हणून तुझं?

एक. : [ जाळाकडे पाहात ] होऽ

अश्व. : तुझं पाठ पण झालं? मोठा हुषार दिसतोस रे तू!

एक. : पाठ कुठलं होतंय रे इतक्यात? आचार्य पुढं सांगत होते अन् मी मागं म्हणत होतो. कर्णेभिः म्हणतानाच चूक झाली. एक मुलगा तर हसलासुद्धा मोठ्यानं!

अश्व. : तो दुर्योधन असणार! दुसरा कुणी नाही. मला मुळीच आवडत नाही. आता तू राहिलास ना इथं, की तुझी न् माझीच गट्टी हां. तुम्ही लोक वनातच राहता ना रे?

एक. : हो तर, आमचा देश म्हणजे मोठं वनच आहे. अन् त्यात किनई खूप मोठाली झाडं आहेत, भरून वाहणाऱ्या नद्या आहेत, पिसारेदार मोर आहेत, सुळेवाले हत्ती आहेत. [ सिंहासारखा आवाज काढीत ] ऊऽऊऽम करणारे सिंह आहेत... अन् आम्ही काय करतो माहिताय? पारंब्यांना झोके घेतो, तीर मारून शिकार करतो... तुला यायचंय आमच्या देशात?

अश्व. : नको रे बाबा. ताता म्हणतात : गुरुकुलातल्या मित्राकडं कधी जाऊ नये, अपमान

होतो. आणि म्हणतात, गुरुकुलातला स्नेह म्हणजे पाण्यावरचं तेल, एकजीव कधी होणार नाही अन बघता बघता उडून जाणार!

एक. : छे छे. मी मात्र विसरणार नाही हं तुला. पण तुझ्या इथल्या मित्रांना आवडेल का रे आपली मैत्री?

अश्व. : इथले रे कोण मित्र माझे? हे सारे हस्तिनापूरचे ना! मोठी ऐट दाखवतात. आमच्या हस्तिनापुरात असं आहे न् तसं आहे. मला तर दाखवतातच– आपसात पण दाखवतात. भीम आहे ना, तो दाखवतो दंडाची बेटकुळी, अन् म्हणतो, बघू कुणाची ताकद आहे– की दुर्योधन मारतो मांडीवर थाप! झालं! ताता जरा नजरेआड झाले की, बसलाच एक दुसऱ्याच्या उरावर. अन् बरं का एका, दमदाटी मात्र मला. 'अश्व्या, आचार्यांना सांगितलंस तर बघ हां. दोघं मिळून अश्व्याचा विश्व्या करून टाकू.' एका, तू माझ्या बाजूनं झालास तर चांगली जिरेल त्यांची! [ चेहऱ्यावर उल्हास. चालता चालता पायाच्या दोन बोटांत खडा धरून तो फेकतो. ]

एक. : मी तुझ्या बाजूचा हां. आचार्य तुझ्याबरोबर मला पण शिकवतील का रे?

अश्व. : [ चमकतो. त्याचा हात सोडतो. ] तूही एक अर्जुनच दिसतोस! त्याचं नाही का...[ त्याचा आवाज काढीत ] 'बंधो ऽऽ आचार्यांनी काय शिकवलं रे रात्री? पुरुषसूक्त का?' – ताता काय शिकवतात ते माझ्या नाही राहात ध्यानात. अन् ते सांगा याला. तू पण...

एक. : नाही नाही. [ त्याचा हात धरतो. ] मी काही विचारणार नाही तुला. तू कसं छान नाव दिलंयस मला. मी एका, तर तू माझा धाकटा भाऊ दुका. दुका–

अश्व. : [ हात सोडवून घ्यायला लागतो. एकलव्य 'आता काय झालं' अशा मुद्रेने पाहतो, पण हात मात्र सोडीत नाही. ]

अश्व. : मला नको धर्माजीराव...मी नाइ होणार दुका. मग तूच कशाला? तो युधिष्ठिर आहे की. (त्याचा आवाज काढीत) 'बाळ अश्वत्थामन्, आंब्याच्या झाडाला दगड नको हो मारूस, त्याचा काय नेम– उलटला तर अंगावर येईल. अन् झाडाला-सुद्धा लागेल हो. आपला जसा जीव तसा त्याचा. आंबाच का हवाय तुला? हा घे. छान पाडाचा आहे बघ–' तो असतो वटवाघळानं पाडलेला रात्रीचा...झालं की, लागलाच हात फिरवायला पाठीवर. तातासुद्धा इतका फिरवत नाहीत...

एक. : बरं राह्यलं! तू म्हणशील तश्शी गट्टी करू हां आपण. आपण झाडावर चढू, मोहोळ काढू, गलोलीनं चिंचा पाडू, पिपाणीतून सूर काढू...आणखी– आणखी एक गंमत आहे...

अश्व. : काय?

एक. : गट्टी झाली म्हण, मग सांगतो.

अश्व. : आधी सांग, मग म्हणतो.

एक. : आपण किनई, नदीवरच्या वाळूत, भूर्जाच्या खोडावर, डोंगराच्या गुहेत–[ थांबतो. अश्वत्थामा उत्सुकतेने बघतो. ] चित्रं काढू ऽ. मग, झाली का गट्टी ?

अश्व. : [ उत्साहाने ] झाऽऽली ! [ विचार करतो. ] पण काय रे, तुझ्या धनुर्विद्येतून ताता सोडतील का तुला ?

एक. : तू सांगितल्यावर सोडतील की.

अश्व. : छे. [ तेवढ्यात समोरून द्रोणाचार्य आणि इतर येताना दिसतात. ] ते बघ आलेच ते...

[ द्रोणाचार्य आणि त्यांचे चारसहा शिष्य प्रवेश करतात. वंचर त्यांच्या मागेच आहे. ]

द्रोण. : अरे वा, क्षात्र आणि ब्राह्म हातात हात घालून फिरायला लागले वाटतं ? छान. एक पुत्र, दुसरा छात्र. आम्हांला दोन्ही सारखेच. बाळ एकलव्या, आता एकटाच इकडे ये. पाय धुवून ये. चल.

[ एकलव्य पाय धुवून येतो. अर्जुनाने टाकलेल्या त्यांच्या आसनावर द्रोण बसतात. एकलव्य पण येऊन अर्जुनाने टाकलेल्या मृगाजिनावर बसतो. ]

द्रोण. : म्हण, ॐ सहनाववतु ।...

एक. : ॐ सहनाववतु ऽ। [ मग याच प्रकारे एकलव्य ॐ शान्तिः शान्तिः पर्यंत येतो. वंचर आणि इतर मुले कोंडाळे करून उभी राहतात. ]

द्रोण. : आता तुझ्या उपनयनाचा हा अंतिम चरण. हे यज्ञोपवीत तुझ्या गळ्यात आलं की संपलं. [ एकलव्य हात पुढे करून ते घेऊ लागतो. ] नाही, तसं नाही. आधी ध्यानपूर्वक संकल्प करायचा, पंचनद्या आणि सप्तसिंधूंचं पाणी या कमंडलूतल्या पाण्यात आहे. ते मग त्याच्यावर शिंपायचं आणि मग ते गळ्यात घालायचं. आलं लक्षात ?

एक. : होय आचार्य.

द्रोण. : मग म्हण. [ डोळे काहीसे मिटून सांगू लागतात. ] मी राजपुत्र एकलव्य [ एकलव्य म्हणतो. ] पुत्र हिरण्यधन्व्याचा [ एकलव्य म्हणतो. ] पौत्र... आजोबाचं नाव सांग... [ जोराचे शब्द द्रोणांच्या तोंडचे ऐकू येतात. त्यांच्या मागे एकलव्य हळू आवाजात म्हणतो ] प्रपौत्र, पणजोबाचं नाव म्हण......

प्रथमाश्रमात प्रवेश करून... [ एकलव्य त्याप्रमाणे म्हणतो. ]
अश्व–रथादि विद्या...... ,,
योगादि शास्त्रे...... ,,
राजधर्म व मानवधर्मास उपयुक्त सर्व ज्ञान...... ,,
धनु, आयु आदिकरून सर्व वेद...... ,,
अशा सर्वार्थविद्येच्या अध्ययनास...... ,,
जन्मेकरून कुलीन...... ,,

कर्मेकरून अमलीन... [ एकलव्य त्याप्रमाणे म्हणतो. ]
क्षत्रिय म्हणून... [ एकलव्य मागे म्हणत नाही. ]

द्रोण. : [ डोळे मिटूनच पूर्वीप्रमाणे सांगतात. ] क्षत्रिय म्हणून अधिकारी असल्याने

एक. : [ गप्पच राहतो. ]

द्रोण. : [ डोळे उघडून ] थांबलास का ? म्हण ना, क्षत्रिय म्हणून अधिकारा असल्याने... [ कुंडाकडे पाहून मूठभर समिधा टाकतात त्यांचा धूर होतो. गंभीर शान्तता. वंचराच्या कपाळावर आठ्या पसरतात तशाच द्रोणांच्याही. मुले अचंब्याने पाहात राहतात. भडकन जाळ होतो...पडद्याच्या आत मंद पण आनंदी संगीताचे सूर येत असतात. त्यांच्यात वीणेची तार तुटल्याने बेसूरता येते. वरून एका टिटवीचा आवाज. वंचराचे तोंड काळवंडते, एकलव्याच्या चेहऱ्यावर असहनीय ताण येतो; पण क्षणभराने त्याचे स्थायी स्मितमुख जागेवर येते...द्रोण त्रासिकपणे बघतात. ]

द्रोण. : [ करड्या आवाजात ] म्हण लवकर...

एक. : [ शान्तपणे ] आचार्य, संकल्पालाच असत्य कसं सांगू?

द्रोण. : ? ? [ त्यांच्या आणि इतरांच्याही चेहऱ्यांवर प्रश्नचिन्हांची गर्दी. कुंडातला जाळ विझत चालला आहे. तिकडे आता कुणाचे लक्ष नाही. ]

एक. : आचार्य, तुम्ही सांगता तस्सा संकल्प करण्याला मी जन्मानं अधिकारी नाही!

द्रोण. : म्हणजे ? तू राजाचा पुत्र म्हणालास ना ?

एक. : होय आचार्य, पण मी राजाचा पुत्र असलो तरी आमचं घराणं क्षत्रियांचं नव्हे.

द्रोण. : मग ?

एक. : निषादांचं आहे.

सर्व मुले : [ एकदम ] निषादांचं ?

द्रोण. : एकलव्या,... [ त्यांना बोलायचं सुचत नाही म्हणून थांबतात. ]

एक. : आचार्य...[ शान्त, पण तोही थांबतो. ]

अश्व. : पण आचार्य, राजे म्हणजेच क्षत्रिय ना ?

दुर्यो. : छट्, सगळेच क्षत्रिय जसे राजे नसतात तसे सगळेच राजेही क्षत्रिय नसतात काही!

अश्व. : पण एका, मग क्षत्रियाच्या जागी निषाद म्हणून संकल्प कर की; तो तरी असत्य नाही ना ?

एक. : [ अश्वत्थाम्यास ] आचार्यांच्या आज्ञेवाचून असं कसं करता येईल ?

वंचर : [ एकदोघांना बाजूला करून पुढे येतो. गंभीरपणे आणि खात्रीने म्हणतो : ] तेवढी गवताची दोरीच घालायची ना ? मग एकल्वा घाल ना ती. हे पाणी शिंपड– [ कमंडलू आणि जानव्याकडे वळतो. मुले उपहासाने हसतात. ]

द्रोण. : [ कपाळाला हात लावूनच पण जरबेने ] वंचरा, त्याला नको हात लावू. एकलव्या,

तू जन्मानं क्षत्रिय नसल्यानं विद्येला अधिकारी नाहीस– आणि म्हणून मी तुला घेऊ शकत नाही...[ कपाळावरचा हात लुळेपणं खाली येतो. ते भकास मुद्रेने पाहू लागतात. ]

वंचर : गुरू रे, आमच्यात क्षत्रियबित्रिय नसतातच. सारे निषादच.

युधि. : म्हणूनच तुम्ही पंचमजन, विद्येला अनधिकारी !

अर्जुन : पण निषाद असणं हा तरी दोष कसा ? कारण क्षत्रिय झाला तरी, जन्मना जायते शूद्रः...जन्माला येतो तेव्हा शूद्रच असतो म्हटलंय ना ? आणि कर्मणा जायते द्विजः– कर्मानंच जर द्विज ठरतो तर याला क्षत्रियच म्हटला पाहिजे; कारण...

दुर्यो. : [ उपरोधानं ] कारऽण आपणाला काही कळत नाही ! आता कळलं का ? मी तेव्हाच म्हणत होतो, कसाला लावल्याशिवाय कुणाला 'साधु, साधु' म्हणून शेपट्या उडवू नका म्हणून !

भीम : [ त्रासिकपणे ] पण मी म्हणतो, निषादाला जर हा अधिकार नाही, तर हा सारा घोळ घातला कशाला इतका वेळ ? सकाळपासून एक घास नाही गेला पोटात. [ वंचराला अस्फुट हसू येते. ]

दुर्यो. : हा निषाद आहे हे कुणाला माहीत होतं हो, भक्षणेश्वर ?

भीम : का बरं ? सगळं कसाला लावणारी तुमची बुद्धी कुठं गेली होती– अभक्ष्य भक्षण करायला काय ?

दुर्यो. : ए लठ्ठा, आणखी बोललास तर माझ्यासारखा वाईट नाही आं कुणी...

युधि. : भीमा, सुयोधना...इकडं धर्माधर्माचा खल चाललाय, अन् तुम्ही काय रे कळवंडताय ?

दुर्यो. : तरी याचा काळाशार रंग पाहून मला शंका आलीच होती...

भीम : बाहेरून अंग काळं आहे म्हणून तुला आली शंका त्याची ! पण आतून मनच काळं आहे म्हणून कुणाला येईल का शंका तुझी ?

दुर्यो. : [ ओरडतो. ] भीम्या,...

[ तो त्याच्या अंगावर धावून जातो. त्याला हुलकावणी देऊन आणि गुरुजींपासून दूर जाण्यासाठी, सावधच असलेला भीम वेदीपासून दूर पळतो, त्याला अंगावर घेतो आणि त्यांची मारामारी सुरू होते. काही मुलं विधीच्या गंभीर ताणातून सुटून जाण्याची ही संधी साधून त्यांच्याकडे धावतात. मारामारी मग पडद्याच्या आत जाते. द्रोण शून्य मनानं पाहात असतात. आता कुठे त्यांच्या डोक्यात घटितांचा प्रकाश पडतो. शिल्लक उभ्या असलेल्या धर्म, अर्जुन आणि वंचरांना उद्देशून ते बोलतात... ]

द्रोण. : अर्जुना, युधिष्ठिरा, सोडवा त्यांचं भांडण. जा. नाहीतर मोडतील हातपाय एकमेकांचे. तुम्हांला नाही आटपायचे ते. या वंचरालाही न्या बरोबर. जा बाबा. [ ते तिघेजण जातात. द्रोण शून्य दृष्टीने त्यांच्याकडं पाहतात. एकलव्य तसाच

अवघडून बसलेला. पडद्यातून मारामारीचे आणि सोडवल्याचे आवाज येतात.]

द्रोण. : हे ते सर्व विद्यांचे अधिकारी– कारण, जन्मानं क्षत्रिय...हुंः...आणि कर्मानं राक्षस! अहिनकुलासारखे टपून असतात एकमेकांवर! एखाद्या मेंढपाळाला लांडग्यांच्या कळपाची राखणदारी द्यावी तशी झालीय् माझी दशा! या सव्वापाच खंडी पोरांतल्या पाचजणांना जरी विद्येची खरी आवड असेल तर शपथ. पण तरी साऱ्यांना घसा खरवडून शिकवलं पाहिजे, कालांतरानं याच कमंडलूतल्या पाण्यानं राजपदाचे अभिषेक केले पाहिजेत! कुठं माझा आश्रम, कुठं या शशकांचा देश! तिथंपर्यंत नाव गेलेला मी– त्या माझे हे विद्यार्थी, अधिकारी– विद्येचे कसले माझेच! आणि हा? नुसत्या विद्येच्या नावानं, एवढ्या लांब, आपल्या पायांनी चालत माझ्या पायांशी आला आहे...तर त्याला या विद्येचा अधिकाऽर नाही! का, तर हा राजा असून क्षत्रिय नाही... [ थोडे थांबून ] पण एकलव्या, तो वंचर म्हणत होता: तुमच्यात वर्णव्यवस्थाच नाही ना?

एक. : नाही आचार्य. आमच्यात...

द्रोण. : वर्णव्यवस्थाच नाही...वर्णव्यवस्थाच नाही...आणि म्हणून विद्येचा अधिकारच नाही...वा...वा...एखाद्याला म्हणावं, तुला बोलण्याचा अधिकारच नाही, कारण तुझ्या भाषेत कवर्गादी वर्णव्यवस्थाच नाही...हे आमचं शहाणपण! क ला कठोर म्हटल्यानं त्याचा ध्वनिगुण तर बदलत नाही ना? त्या गुणावरूनच त्याला कठोर ठरवला ना? ते काही नाही. एकलव्या, मी तुमची वर्णव्यवस्था ठरवतो. चल. तू क्षत्रियाचं काम करतोस– तू क्षत्रिय आहेस...चल म्हण, मी क्षत्रिय आहे आणि म्हणून... [ धसकन् मूठभर समिधा विझत्या जाळात टाकतात. ]

वंचर : [ पडद्यातून परत येताना पहिली दोन पावलं सावकाश टाकीत असतो. पण आचार्यांची अखेरची दोनतीन वाक्यं ऐकताना जोरात येतो. त्याच्या तोंडाला लागलं आहे आणि कपड्यांवर भीम-दुर्योधनांच्या लाथांचे डाग आहेत. त्याच्या बरोबर धर्मादी छात्र. ] आणि म्हणून, तुझ्या क्षत्रियांनी हा प्रसाद दिला बघ मला. गुरू रे, मी ऐकलं तू काय म्हणालास एकल्वाला. एकल्वा, ह्या कचाटाळात सापडू नकोस. एकदा का तू क्षत्रिय म्हणून ठरलास की शशकांच्यात दोनच काय दोनशे फळ्या पडल्याच म्हणून समज. आपल्याला नको ही विद्या.

एक. : आचार्य, विद्येसाठी– तुमच्या विद्येसाठी, तुमच्या व्यवस्थेनं, मी क्षत्रियही झालो... तर हा वंचर कोण होणार?

द्रोण. : सरळ आहे. तो सेवक आहे...तो शूद्र......

एक. : वंचर शूद्र अन् मी क्षत्रिय! वंचर शूद्र...? [ डोळे भरून येतात. वंचराचा चेहरा आकसतो. ] आचार्य, तुमच्या व्यवस्थेत मी क्षत्रिय आणि हा शूद्र? मला रांगतासुद्धा येत नव्हतं तेव्हापासून माझ्या सावलीसारखा माझ्याबरोबर

राहिलेला– सावलीसुद्धा काळोखात सोडून जाते, हा कधी गेला नाही...आणि आता तुम्ही सांगता वर्णव्यवस्था देतो– आणि त्या व्यवस्थेत मी वेगळा अन् हा वेगळा...आचार्य, मला तुमची विद्या हवीय् पण तिच्यासाठी माणुसकी सोडायला नका हो लावू...[ एवढा वेळ बसलेला, आवेगानं उठून द्रोणांच्या पाया पडतो. वंचर पापण्या टिपतो...द्रोण खिन्न, गंभीर. ]

द्रोण. : ऊठ, एकलव्या. तुला विद्येचा अधिकार नाही, असं चुकीनंच बोललो मी.
[ डोळे पुसून उभा राहिलेला एकलव्य बुचकळ्यात पडून त्यांच्याकडे पाहतो. ]

युधि. : खरंच, आचार्य ?

[illegible] : एका, ऐक हं नीट.

द्रोण. : ऐक, नीट ऐक एकलव्या. परमधर्माच्या मापानं पाहिलं तर प्रत्येक प्राणिमात्राला विद्येचा अधिकार आहे. माणुसकीच्या मापानं प्रत्येक माणसाला आहे. मग तूच त्याला कसा अपवाद होशील ?
[ एकलव्याच्या चेहऱ्यावर समाधान चढत आहे. हे बोलतानाच द्रोणाचार्य दर्भाचे जानवे हातात घेऊन उठतात. ]

वंचर : मग घाल ते त्याच्या गळ्यात अन् ठेव त्याला इथं. एकल्व्या, मी निघालो रे !

द्रोण. : केवढी घाई वंचरा ! वंचरा, आमच्या नीतीच्या निबिड वनात वाट काढायचं नाही जमणार रे तुला ! सगळं बोलणं ऐकून घे माझं...[ थकून खाली बसतात. स्तब्ध राहतात. शब्द जुळवायला लागतात. ] एकलव्या, पण हा परमधर्म, हा माणुसकीचा धर्म–या वंचरासारख्या मुक्त जिवाला सहज पाळता आला तरी आमच्यासारख्यांना महाकठीण ! आम्ही बांधलेले आहोत. एका अफाट आणि अकाट्य चौकटीत जन्माला आलो. ती कोरडी आणि जुनाट असली तरी तिची पाळंमुळं खोल आहेत. ती घडायच्या आधीच कुणी तोडली असती तर तुटती...तुम्ही दोघांनी तोडलीत तशी. कारण, नंतर जो तिच्या वर डोकवायला पाहतो तो केवळ कपाळमोक्ष करून घेतो...आम्ही काय ती तोडणार ! लिंबाच्या फोडी जशा सालाच्या आत एकत्रच पण वेगवेगळ्या उपजतात तसे आम्ही निपजतो, वाढतो, पिकतो, गळतो, सुकतो आणि मातीत मिळून जातो. वेग-वेगळेच; त्या चौकटीच्या कुण्या भरीत ! अढळ मानतात त्या ध्रुवालासुद्धा गती आहे म्हणे ! आमच्या या व्यवस्थेचा संदर्भ मात्र ध्रुवापेक्षाही अढळ आहे ! आम्ही अगतिक. म्हणून मग, हे सारं बदलायचा विचारही मनात आणू शकत नाही. आणि म्हणून विद्या द्यायलाच अनधिकारी आहोत...... एकलव्या, वर्ष दोन वर्षांपूर्वी मीच शिष्यांच्या शोधात होतो. शिष्यांच्या कसला, शिधापाण्याच्या. तेव्हा माहीत असतं तर हा द्रोणाचार्य आपणहून तुझ्या नगरीत आला असता. त्यानं तुला धनुर्विद्या शिकवली असती. एवढंच नव्हे तर आपल्या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी तुला निषादातून उचलून आपल्या ब्राह्मण्याच्या

जोरावर क्षत्रियसुद्धा बनवलं असतं. एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय करणाऱ्या गुरूच्या या शिष्यानं हा उलटा पराक्रम करून दाखवला असता...त्यात तो गुरू म्हणून सुखावलाही असता...कारण, कारण– हे सारे ऐकवाहेत, ऐकू दे. गुणांचा गौरव एकदा तरी मोकळ्या मनानं करू दे; जन्मापेक्षा गुण श्रेष्ठ आहेत, हे त्यांनाही कळू दे– अरे, मातीच्या गोळ्यांना आकार देत बसण्यापेक्षा हिऱ्याला पैलू पाडण्यात अधिक आनंद नाही का? शतावधी ताऱ्यांपेक्षा एकुलत्या चन्द्रम्याच्या कला जोपासणं हितकारा नाही का?...पण हे सारं आता नुसतं बोलायचं. आमच्या या व्यवस्थेत राहायचं तर बोलायचंसुद्धा नाही, मनातच गिळायचं. माणूस म्हणून तुला विद्येचा पूर्ण अधिकार आहे... पण ते या व्यवस्थेत कुणाला पटणार नाही. आज मी तुला घेतलं– तरी तुझं काय होईल! या शताधिक द्विजांच्या मेळाव्यात तू एकलव्य नव्हे, एकला होऊन पडशील....

युधि. : नाही आचार्य, तुमचा शिष्य तो आमचाही बंधूच.

द्रोण. : ऐक जरा. एकलव्या, मी यांचा पालक, त्यामुळं, यांनी जरी माझी इच्छा म्हणून तुझा स्वीकार केला तरी माझे पालनकर्ते जे यांचे पितृपितामह, ते तुला आणि मलाही सुतराम् क्षमा करणार नाहीत. कारण, अखेर तेही, माणसांचे स्वामी असले तरी या व्यवस्थेचे दास आहेत. तू जा. [ संतापाने उठतात. एका हातात दर्भाचे जानवे आणि दुसऱ्यात कमंडलू. गडबडीत उठल्यानं त्यांचाच धक्का लागून कमंडलूतलं पाणी भडकन एकलव्याच्या डोक्यावर सांडतं. पण ते तिकडं लक्षही न देता चालू लागतात. ]

[ पडदा पडतो. ]

## अंक दुसरा
### प्रवेश पहिला

[ **काळ** : पहिल्या अंकानंतर दोनतीन दिवसांनी; **स्थळ** : वनात एका झाडाखाली. पुढे चढणीची वाट आहे. बाजूला एक खडकाळ सुळका आहे. त्या खडकाच्या भेगेतून एक पिंपळाचे झाड वर आले आहे. त्याच्या मुळखंडांची खाली जमिनीवर जाण्याची धडपड त्यांच्या आकारातून साकार होत आहे. शेजारीच पाणी ओघळत आहे, ते त्या खडकावर निसर्गतःच तयार झालेल्या सोंडेसारख्या आकृतीवरून. चालून धुळीने भरलेले एकलव्य आणि वंचर विसाव्यासाठी इथे बसलेले आहेत. रानातलीच फळे आणि विस्तवावर काही तरी भाजून खाल्ले असल्याच्या खुणा दिसत आहेत. एकलव्याने धनुष्य आणि भाता खोडाला लावून ठेवले आहेत. ]

**वंचर** : चल, दिवस कलायला लागला.

**एकलव्य** : [ पिंपळाच्या झाडाकडे पाहात आहे. ] हूं.

**वंचर** : ऊठ मग. माथ्यावर तरी पोचलं पाहिजे अंधार पडायच्या आत.

**एक.** : [ लक्ष नाही ] हूं.

**वंचर** : मग चल तर.

**एक.** : हूं. [ झाडाकडे एकटक बघत आहे. ]

**वंचर** : तीन वेळा हूं म्हणालास, उठायचं मात्र नाव नाही.

**एक.** : मला यायचं नाही.

**वंचर** : हे शंभर वेळा ऐकलं.

**एक.** : आताचं शेवटचंच. तू जा.

**वंचर** : तुझ्या बापाला काय सांगू ?

**एक.** : सांग, एकल्व्या राह्यला.

**वंचर** : कुठं ?

**एक.** : इथंच.

**वंचर** : कशाला ?

**एक.** : दुसरं कशाला ? विद्या शिकायला.

**वंचर** : येड लागलंय का ?

**एक.** : तसं म्हण पाहिजे तर !

वंचर : झालं तेवढं पुरे नाही का झालं ?
एक. : झालं ते गेलं !
वंचर : तुझं येड तेवढं नाही गेलं.
एक. : कारण ते येड नाहीच आहे.
वंचर : मग काय भूत लागलंय का काय ?
एक. : भूत नाही, भविष्य.
वंचर : असा कोडं घातल्यागत बोलू नको. मला कळत नाही.
एक. : तेच म्हणतोय मी.
वंचर : आजवर नाही म्हणालास ?
एक. : आजवर पुसलंस कुठं ? तीन वार चाल्लो येताना. सगळ्या गावाच्या नकला करीत आलास.
वंचर : तुझी करमणूक व्हावी म्हणून. मला पण विरंगुळा पायजे होता. मला वाटलं, तो घेईल ठिवून तुला; मग पुन्हा कशाचा भेटतोयस लवकर. [ आवाज रुद्ध होतो. ] त्याच्या हातात नव्हतं तुला शिकवायचं. पण म ऽ ऽ ग आता कशाला थांबतोयस हितं ?
एक. : विद्या शिकायला.
वंचर : ऊठ रं चिंधा, एकच धंदा ! विद्या तरी कसली शिकायचीय तुला ?
एक. : येरं माझ्या मागल्या, ताक कण्या चांगल्या ! येतंय तरी काय आपल्याला ?
वंचर : नुसतं तोंडानं सांगितलं तुझं कौसाल तर म्हातारासुधा अचंब्रा करायला लागला. अन् तू म्हणतोस येतंय तरी काय आपल्याला ?
एक. : ससक शोभलास खरा ! तुला मारे वाटतंय तिरंदाजीत माझ्यापुढं कुणी उभा नाही राहायचा ! पण विचार कर. कुणावर लागू पडतात आपले बाण ? आभाळात उडणारे चित्तर, विहिरीत घुमणारे पारवे, कोंबड्या पळवणारे कोल्हे, गायीगुरांच्या रक्ताला चटावलेले वाघ, वाघसिंहसुद्धा. पण सारे रानचे प्राणी. माणसावर कधी बाण मारलायस ?
वंचर : खरंच येड लागलंय का काय तुला ? माणसाला बाण मारतात होय रे ?
एक. : ससकांच्यात नाहीत ना मारीत ! अगदी अनावर वादावादी झाली तर कुस्ती खेळून निकाल करणारे आपण ! पण असं किती दिवस चालणार ? आपल्याला नको असलं तरी लढाया खेळणारे लोक आहेत ना जगात ?
वंचर : आपण काय त्यांचं घोडं मारलंय ?
एक. : घोडी मारतात त्यांचे तेच. मारामारी मात्र आपल्याशी. काळ्या कानाच्या घोड्याबरोबर मागं नव्हत्या का आल्या झुंडीच्या झुंडी ! खास लढाईसाठीच तर तयार करतात त्या क्षत्रियांना.
वंचर : मग लढू देत त्यांना आपसात अन् मरू देत.

एक. : ते बरे मरतील ! मारता मारता मरावे अशी तर त्यांची रीत ! तुला मला मारतील अन् स्वतः मार्ग उरतील ! अन् निमित्तसुद्धा काहीही पुरेल त्यांना. मागं नाही का, कोणी शिकारीला आले अन् तरणीसाठी पोरच घेऊन गेले...मधे पडतास तर तुझीच शिकार.

वंचर : भविष्य सांगत होतास ते हेच वाटतं ? मग तोडगा काय काढलायस सांग तरी.

एक. : सडकांच्या बाणावर बाण सोडणारं कोणी नव्हतं ते हे होणार ! मग त्यांची विद्या त्यांच्याकडून नको का घ्यायला ?

वंचर : वैऱ्याला देणार आहेत होय ते ?

एक. : आपण कुठं त्यांचे वैरी आहोत ? आणि यांच्यातल्याच एका कच म्हणून पोराची गोष्ट सांगतात की, तो राक्षसांच्या गुरूच्या पोटात शिरून विद्या शिकून आला !

वंचर : पोटात् बरं नाही दुखलं त्या गुरूच्या.

एक. : गुरूच्या नाही, शिष्यांच्या मात्र दुखलं.

वंचर : बरं पण, तू हे सांगतोस कशासाठी सारं ? तू शिरणार आहेस का त्या द्रोणगुरूच्या पोटात ? तो तर म्हणाला [ तोंड वेडंवाकडं करीत ] " जा... "

एक. : [ अवघडलं हसून ] पोटात नाही शिरणार ! [ भरल्या आवाजात ] मनात तर भरलो ना ! विद्या देईल तर हाच गुरू...विद्या घेईन तर याच्याचकडून...

वंचर : त्यालाच काय सोनं लागलंय ?

एक. : सोनं-नाणं कधीपासून मोजायला लागलास ? त्याच्या माणुसकीची आठवण कर ! माझ्यासाठी किती तडफडला, बघितलंस ना ! [ सद्गदित ] " छान, एकलव्या, तुझं वागणं मला आवडलं...एक पुत्र, दुसरा छात्र; आम्हांला दोन्ही सारखेच... नुसत्या विद्येच्या नावानं आपल्या पायानं चालत माझ्या पायाशी आला आहे... तू क्षत्रियाचं काम करतोस– चल म्हण, मी क्षत्रिय आहे...तुला विद्येचा अधिकार नाही असं चुकूनच बोललो...आम्ही बांधलेले आहोत !...माणूस म्हणून तुला विद्येचा पूर्ण अधिकार आहे...पण माझे पालनकर्ते...माणसांचे स्वामी असले तरी या व्यवस्थेचे दासच आहेत... " वंचरा, हे सारं सांगणाऱ्या गुरूहून आणिक कोण शोधायला जाऊ ?

वंचर : त्यानं अखेर तुला काढूनच लावलं ना ?

एक. : पण कसं ? अभिषेक करून ! अजून केस ओले वाटतायत ! काढून लावलं...पण काळजाचा दगड करावा लागला त्याला.

वंचर : अन् आता तू त्या दगडावर बी टाकून पीक काढणार !

एक. : [ पिंपळाकडं बोट दाखवीत ] तो बघ...काळ्या खडकाच्या शिरेत कसा वाढतोय. बघ त्याची मुळं. तो जसा वर जातोय तशी ती खाली जातायत. आणि तो काळा पाषाण त्यांना कवटाळून धरतोय...ती बघ पाण्याची धार...कुठून कुठून घेऊन त्याचं पालन करतेय...त्या बघ कसल्या कसल्या मूर्ती– खडकावरच वाढल्या

ना? माझा गुरू या खडकाहूनही कठीण आहे का रे?...आल्याबरोबरच हा पिंपळ दिसला अन् माझं ठरलं.

वंचर : पिंपळ नसता तर वड दिसला असता एखादा तुला.

एक. : तेही खरं आहे म्हणा तुझं! जेव्हा जे मनात असतं ना तेव्हा तेच बाहेरसुद्धा दिसत असतं. आपण येत होतो तेव्हा मनात एकच : ह्या आर्यांची विद्या काहीही करून मिळवलीच पाहिजे. ससकांनी आर्यांना तोंड दिलंच पाहिजे... तेव्हा काय आठवायचं सांगू? आपल्या मूळपुरुषाची कथा. त्याचा एक ससा होता. एक दिवस त्याच्या कुत्र्याची अन् सशाची कलागत झाली. अन् या सशानं जो कुत्र्याचा पाठलाग केलाय म्हणतोस! आपल्या मूळपुरुषाला एवढं कौतुक वाटलं त्याचं की कुळाचं नावच त्यानं ससक ठेवून घेतलं. तर, येताना साऱ्या रानात मला तो ससा धावताना दिसायचा. आता परत येताना–

वंचर : कुत्रं उलटलं असेल सशावर!

एक. : ससा विसरला, कुतरा विसरला...लक्षात राहिला तेवढा गुरू अन् माझा विद्येचा निश्चय. ती मिळेल अशी खात्री होती ना तोवर तिचं काय करायचं हेच चिंतीत होतो. मिळत नाही म्हणल्यावर तिच्याच विचारानं डोकं भरून गेलं. मग झाडंझुडपंसुद्धा सांगायला लागली, ' तू विद्येचा अधिकारी आहेस!' काय करावं ते मात्र समजत नव्हतं. दोन दिवस चालणं झाल्यावर आज त्या पिंपळानं, त्या झऱ्यानं, त्या पुतळ्यानं एका क्षणात रस्ता दाखवला.

वंचर : रस्ता दाखवला कुठला बाबा, बंद करून टाकला. आता डोळे उघडे असले तरी परत जायचा रस्ता दिसेनासा झाला! एकलव्या, इतका आंधळा नको होऊस!

एक. : आंधळा? अरे, डोळस माणसानं डोळे मिटून आत पाह्यलं की त्याला उजेडाचा लोळ दिसायला लागतो... मनातल्या गुरूबरोबर त्या उजेडात चालायला लागलं की कुठल्याही विद्येपर्यंत पोचायला काय वेळ?

वंचर : तू लागलास तुझ्या लाडक्या गुरूसारखा बोलायला. चौकटीच्या वर डोकं केलं की त्याच्या कपाळाला टेंगूळ येतं, अन् पापण्या मिटल्या की तुला चांदण्या दिसायला लागतात. मनातला गुरू म्हणे. जनातला गुरू लावतो हाकून–!

एक. : वंचरा, अरे मनातल्या गुरूचा तुला तरी विश्वास पाहिजे! तुझ्या आजाची गोष्ट माहीत आहे का तुला? बाबाच्या वडलाचा उजवा हात तो! एकाला चिमटा बसला तर दुसऱ्याच्या डोळ्याला पाणी यायचं! बाबाचा बाप फार आजारी झाला म्हणून तुझा आजा वनस्पती आणायला रानात गेला. हा इकडं वारला तर तो तिकडं रानात कोसळला. वनस्पतीच्या बुंधालाच वारला. मनातल्या राजाची सांगी नसती तर कसं कळलं असतं रे त्याला?

वंचर : माझा आजा, तुझा आजा, गोष्टीसुधा बऱ्या माहीत तुला! तू काय मला आवरायचायस बाबा. हिंड तुझ्या मनातल्या गुरूला बरोबर घेऊन.

एक. : [ हसून ] हिंडायचा नाही. इथंच बसून राहणार. मनातल्या गुरूला समोर बसवणार अन् सांगणार 'आचार्य, मी एकलव्य...'

वंचर : [ द्रोणांसारखा आवाज काढीत ] पोरगा हिरंधनूचा, नातू...आजाचं नाव म्हऽण...

एक. : वंचरा, वंचरा... ऐक तरी जरा.

वंचर : ऐकतोय– सांग ! गुरूला समोर कसा बसवणार ? पिंपळाच्या झाडावर का ?

एक. : नाही, पण पिंपळानंच दाखवलं कसं ते. तोऽ बघ खडकावर पांढरा पुतळा ! मला असं वाटलं, हा पिंपळ त्या पुतळ्याकडूनच शिकला दगडाच्या आधारानं कसं रहावं ते ! मग मीही ठरवलं...

वंचर : गुरूचा पुतळा करायचा ! कुठून काय शिकशील नेम नाही ! शिकशील बाबा, पुतळ्याकडूनसुद्धा विद्या शिकशील... [ एकलव्य धावतच जणू झऱ्याकडे निघतो. ] आत्ताशी जीव आला होय तुझ्या पायात ! इतका वेळ पडला होतास कापसाच्या भोतासारखा !

[ एकलव्याचं त्याच्याकडे लक्ष नाही. तो झऱ्याकाठच्या ओल्या मातीचा मोठा गोळा बनवतो आणि दोन्ही हातांनी उचलून घेऊन येतो. ]

एक. : तू बोललास– चांगला शकुन झाला. म्हणलं तातडतोब सुरुवात करावी. [ बसतो. गोळे बनवतो. ] दोनचार काटक्या आण ना. [ वंचर निरुपायानं पण कुरकुरत उठतो. ]

वंचर : कशाला हव्या होत्या ? [ काटक्या टाकतो. ] घे ह्या.

एक. : [ उत्साहानं पुतळा बनवायला लागतो. ] 'अरे, मातीच्या गोळ्यांना आकार देत बसण्यापेक्षा हिऱ्याला पैलू पाडणं अधिक आनंदाचं नाही का ?' असेलसुद्धा. पण मातीच्या गोळ्यासारखी गोलाई देता यायची नाही. या गोळ्याला हवा तो आकार देता येईल. हिऱ्याचे पैलू त्याच्या धारा-कोरांना रुचतील पचतील तेवढेच. हिऱ्याच्या भयंकर कठीण अंगावर डोळे नाही कोरता यायचे. खरंच [ वंचराकडं न बघताच हाक मारतो ] वंचरा, एक सांगतोस का ?

वंचर : आता काय राहलं ? मी दीग सांगतोय परवापासून, तू ऐकलं पाहिजेस ना ?

एक. : वा वा ! शेवटी तुझंच ऐकलं म्हणून तर हा पुतळा करायला बसलो ना ! त्याच्याचसाठी तर तुझी मसलत हवीय–

वंचर : [ सुस्कारा टाकतो. ] हूं ऽऽ

एक. : गुरूचा चेहरा कसा घडवू सांगतोस का ?

वंचर : हातानं थाप, काटकीनं कोर अन् पाण्यानं सारव.

एक. : तसं नाही रे ! म्हणजे ऽ तो चेहरा दिसावा कसा ?

वंचर : मला न समजलेलं काही बोलत होता ना निखळ मूर्तीबिर्तीचं–

एक. : हां हां... साऱ्या मूर्तीमधलं निखळ अमूर्त...

वंचर : तेव्हा कसा केला होता तसा कोर कडू इंद्रायणाचा काढा प्याल्यासारखा !

एक. : [ तुटकपणे ] वंचरा...

वंचर : मला, वाटलंच... मुद्दामच सांगितलं, मंजे म्हणलं, दोनच दिवसांत निघशील इथून त्याला भिऊन !

एक. : [ हसतो. ] ते आता नावच सोडून दे. आता सांग नीट.

वंचर : सरड्याचा रंग न् माणसाचा चेहरा पापणी लवता लवता पालटतोय– कोणचा म्हणून सांगू ?

एक. : अरे सांग चांगला, मला सोबत करील असा... [ एकदमच भरून येतो. ] आता तूसुद्धा नसणार इथं. तिथं कसा निघाला होतास. 'गुरु रे, संभाळ याला' म्हणत... तसं म्हणता आलं पाहिजे याच्याकडं बघून तुला.

वंचर : [ भरल्या गळ्यानं ] बास बास एकलव्या... असं अवघड मानून जायला नको लावूस मला. माझ्यासारखी सोबत करणारा असता तर हाकून का लावता तुला ? ज्जा म्हणाला ना ?

एक. : म्हणाला रे ! पण आतून बाहेरून कसा खदखदत होता पाहिलंस ना ! पोटात माया जाळीत असल्याशिवाय का असा तडफडला ? असं काय दिसलं त्याला माझ्यात ? रंग का रूप ? रंगरूपाकडं तर बघायलासुद्धा तयार नव्हता ! मग ? विद्येसाठी आलो म्हणताच हरखला– कशाला हवी म्हणून पुसत नाही बसला ! आपल्या चेल्यांनासुद्धा कातवला... का ? मी काय सगा होतो का ? मग ? विद्येसाठी आलो म्हणून. जा म्हणाला म्हणजे काय ?... म्हणाला, "इथं माणसाला माणूस म्हणत नाहीत; क्षत्रिय म्हणतात, शूद्र म्हणतात .. इथं नको राहूस. माणूस म्हणून विद्येचा अधिकार तुला वापरता येईल तिथं जा अन् हवी ती विद्या मिळव." इथं बघ, मी कसा एकटा राहीन; या झाडाझुडपात, दगड-धोंड्यात, जीवजिवाणूत, मी एकुलता एक माणूस : माणूस म्हणून राहीन... ना क्षत्रिय, ना शूद्र, ना निषाद, ना ससकसुद्धा. फक्त माणूस. आणि मग मिळवीन, ती, विद्या ! आणि ती, घ्या गुरुपासून... [ बोट पुतळ्याकडे. ]

वंचर : आता विचारू नकोस, विचारसुधा करू नकोस. तोऽ चेहरा कर, कोणता ? 'माणूस म्हणून तुला या विद्येचा पूर्ण अधिकार आहे' म्हणाला ना, तेव्हाचा.

[ पडदा ]

## अंक दुसरा
### प्रवेश दुसरा

[ काळ : पहिल्या अंकानंतर चारसहा महिन्यांतला. वद्य पक्षातली अष्टमीची रात्र. द्रोणांची कुटी. दिवा जळत आहे. द्रोण आसन घालून चिंतन करीत बसले आहेत. अश्वत्थामा रात्रीच्या शिकवणीसाठी येत आहे. दारातून तो सावकाश शिरतो. आपलं आसन घेऊन आचार्यांच्या शेजारीच ते टाकतो. नसता बसताच बोलतो. ]

**अश्वत्थामा :** [ तक्रारीच्या सुरात ] ताता, पाणी भरायला मला आता घडा नको.

**द्रोणाचार्य :** [ लक्ष नाही. ] हूं.

**अश्व. :** घडा नसला तरी होईल माझं लवकर.

**द्रोण. :** हूं.

**अश्व. :** कमंडलू द्या मला.

**द्रोण. :** [ कडवटपणं ] द्यायला कशाला पाहिजे ? तो पाचवीलाच पुजलाय !

**अश्व. :** मग उद्यापासून मला कमंडलूच द्याल ना ? पाणी भरायला.

**द्रोण. :** [ त्रासून ] अरे, पण घडा दिलाय ना तुला ?

**अश्व. :** [ कौतुकाची वार्ता सांगितल्यासारखं ] तो फुटला आज ! मी खांद्यावर घेऊन चाललो होतो तर कुणी तरी दगड मारला मागून ! [ कुरकुरत ] आंघोळ झाली मला ! अन् वर सगळे हसायला लागले...म्हणाले, 'गुरुजींचा पोरू– घागर कशी मरू ' अन् माझ्याभवती फेर धरून नाचले.

**द्रोण :** [ मधेच ] अश्वत्था, तुला कितीदा सांगितलं की बरोबरीच्या विद्यार्थ्यांच्या चुगल्या करायच्या नाहीत म्हणून.

**अश्व. :** तुम्हीच विचारलं म्हणून सांगितलं. त्या घड्यानं एक फेरी तेवढी वाचायची– पण आमाला सगळे काय काय बोलायचे. गवळण बाजाराला निघाली म्हणायचे ! बाई बाई बाई बाई करायचे. तुम्ही म्हणता बरोबरीचे. माझ्या बरोबरीचं कोण आहे त्यांच्यात. सगळे माझ्याहून मोठे. अन् पुन्हा एवढाले दांडगे. मला अगदी नको झालंय इथं राह्यला.

**द्रोण. :** [ तीव्रपणे ] असंच असतं. चणे आहेत तिथं दात नाहीत. बापाचं नाव ऐकून सातासमुद्रापारचे लोक इथं येतात– आणि मुलगा म्हणतो, इथं नको राह्यला.

[ मवाळत ] अरे अश्वस्था, हे चालायचंच. विद्या करायची म्हणजे काही ना काही त्रास भोगायलाच लागतो ना! चल! बस आता शिकायला [ दोघे काट-कोनात आसनमांडी घालून बसतात. अश्वत्थाम्याचं तोंड दाराकडं आहे. पाठीमागच्या दिव्याच्या उजेडात त्याची सावली दारापर्यंत पोचते. बाहेरच्या काळोखात एखादी चांदणी मात्र त्याला दिसते. ] मागच्या वेळेला कुठवर आलो होतो आपण ?

अश्व. : ते काय बरं तुम्ही सांगितलंत? शत्रूला आपलं सैन्य दिसू नाही म्हणून कसले कसले रंग लावायचे सगळ्या ह्याला...

द्रोण. : छान! पण तो मागंच झालेला भाग. ते मायावरण. शत्रूला फसवण्यासाठी घालतो ना, ते आवरण! पण त्यानंतर काही तरी आणखी सांगितलं होतं ना ?

अश्व. : ते ऽ तुम्ही काय म्हणत होता ना! स्वच्छ पांढरा धूर ... निळा धूर, लालसर धूर, जांभळा धूर, पार शेवटी काळा धूर...काय ते एकावर एक रचल्या-सारखा...चळथी म्हणालात तुम्ही.

द्रोण. : वेड्या, ते धूमास्त्र. त्याचा जप पण सांगितला होता ना. म्हण बघू...

अश्व. : [ चेहरा पडतो. ] अग्नये स्वाहा!... [ गप्प... प्रयत्नपूर्वक ] अग्निमीळे पुरोहितम्... [ गप्प... सकंप ] ताता, ते मला नाही आठवतय. [ मुद्रा अपराधी. ]

द्रोण. : [ अतिशय खिन्न ] यस्य नास्ति स्वयंप्रज्ञा शास्त्रं तस्य करोति किम् ।... विद्या वा नाल्पमेधसे ।

अश्व. : [ नुसताच त्यांच्या तोंडाकडे पाहतो. ]

द्रोण. : [ संयमाने खिन्नता घालवून, ओढून आणलेली हास्यमुद्रा वागवतात. ] ठीऽक. धूमाचा नाही तर अग्नीचा तरी मंत्र आठवला तुला. काही हरकत नाही. अग्नी प्रज्वलित करताना धूर हा होणारच. अर्धाच मंत्र म्हणालास की त्याचं ज्वलन अर्धेच होईल. मग धूरच धूर. आपण पुन्हा त्याची उजळणी करू. [ अश्वत्थाम्याचा चेहरा पूर्ववत्. ] आज काय शिकू या ?

अश्व. : काही पण.

द्रोण. : काही पण नाही. मी आज फार छान विषय मनाशी योजलाय. [ त्याच्याकडे उत्साहाने पाहतात. ]

अश्व. : [ त्यांच्या उत्साहात तेवढा सहभागी नाही. ]

द्रोण. : पाऊस कसा पडतो ?

अश्व. : पाऊस ? आधी वारा सुटतो– असा धुरळा उडतो! काही दिसेनासं होतं. अन् मग आभाळात ढग जमा व्हायला लागतात. काय पळत असतात! कुणी उंटा-सारखे तर कुणी हत्तीसारखे. काही तर झाडासारखे. एकावर एक खवले त्यांचे... अन् गड गड गड गड करायला लागले की भीतीच वाटायला लागते.

द्रोण. : मग अशीच भीती आपल्या शत्रूलासुद्धा वाटत असेल की नाही? मी आता शिकवणार ना– ते शत्रूला भिवबून टाकण्यासाठी.

अश्व. : ताता, वीज चमकल्यावर तर फारच भीती वाटते! कड कड कड कडाड् करून वाजते ना– आपल्या तर बुवा पोटात कळच येते. कुणाला भीती दाखवायची असेल ना तर वीज पाहिजेच!

द्रोण. : विजेचंसुद्धा अस्त्र त्यातच येतं. तेच तर आज शिकवणार आहे. चल, गायत्री मंत्राचा जप कर म्हणजे अस्त्राचा मंत्र सांगायला येईल. [ दोघे डोळे मिटून जप करायला लागतात. थोडया वेळानं, जप संपल्यावरच म्हणायचं, अश्वत्थामा डोळे उघडतो. द्रोणांचे डोळे मिटलेलेच आहेत. ते व्याख्यान सुरू करतात. ] बरं का अश्वस्था, मी मागंच सांगितलं ना तुला समजावून? एकेका गोष्टीची एकेक देवता असते. उजेडाची किंवा तेजाची देवता सूर्य. आगीची देवता स्वतः अग्नीच. पावसाची देवता इंद्र किंवा वरुण. पाऊस पडतो म्हणजे काय, इंद्राची किंवा वरुणाची आपल्यावर कृपा होते. आपली कशी उन्हाळ्यानं लाही होत असते. सारखा घाम येत असतो. झाडं सुकून जातात. सगळीजणं मग म्हणायला लागतातः ये रे ये रे पावसा! पण असं नुसतं आणि कुणी तरी म्हणून थोडाच पाऊस येणार? मग तर काय, प्रत्येकजण स्वतःच इंद्र होईल. देवतांची प्रार्थना करावी लागते. तीही त्यांना समजेल अशा भाषेत; म्हणून वेदातले मंत्र म्हणायचे. तेसुद्धा अगदी नेमके. एक शब्द नीट नाही म्हटला तर अर्थाचा अनर्थ होऊन जातो. मी ती गोष्ट सांगितली होती ना तुम्हाला. वृत्र शब्दावर नेमका जोर दिला नाही तर त्या म्हणणाराचा बाण वृत्राला लागायचा तो इंद्राला लागला. तेव्हा तुम्ही मंत्रोच्चारण शुद्ध ठेवा. शत्रूवर अस्त्र सोडायचं म्हणजे दुहेरी दायित्व असतं आपल्यावर...[ समोर एकटा अश्वत्थामा आहे हे विसरतात...कुटीच्या मागं खजबज ] कोण गडबड करतंय ते? अश्वत्थामा, तुझं लक्ष नाही वाटतं? [ अश्वत्थामा दचकतो. मग सावरून बसतो. द्रोण आता व्याख्यानरूपानं बोलतात. ] अस्त्र हे पवित्र, गोपनीय आणि अत्यंत विरळा उपयोज्य असतं. अस्त्राचा वापर अप्रशस्त उद्देशानं करायचा नसतो. प्रकृतीच्या नियमांना डावलून प्राकृतिक विधा ही अस्त्रे घडवून आणतात. म्हणून प्रतिप्रकृती होऊ पाहणाऱ्याचे मन शुद्ध, विचार मंगल आणि उद्देश सर्वहितकर असले पाहिजेत. अशा प्रकारे मन शुद्ध, शान्त आणि सम करून पर्जन्यास्त्राची संथा घ्यावी.

[ बाहेर काळोख दाटत चालला आहे. वारा पार पडला आहे. ढगांची गर्दी वाढत आहे. केव्हा तरी मंद असा ढगांच्या गडगडण्याचा आवाज येत आहे. आता बाहेर काहीच दिसत नसल्याने अश्वत्थामा वडिलांच्या तोंडाकडे पाहात आहे. 'संथा घ्यावी' हे शब्द ऐकल्याबरोबर तो बसल्या जागीच सावरून बसतो. द्रोणांचे व्याख्यान चालू. ]

हे अस्त्र शत्रूला जागच्या जागी खिळवून टाकण्यासाठी उपयोगात आणतात. नदी, तडाग किंवा अन्य जलाशय भरलेले असतील तर याचा उपयोग फोल होय. कोरडे असतील तर विहित होय. शत्रूच्या दमनाबरोबर सामान्यजनांचं तृषाशमनही अशा रीतीनं साधू शकतं. [ढगांचा गडगडाट वाढतो.] धूमास्त्र, वाय्वस्त्र, सौदामिनी अर्थात विद्युत् अस्त्र ही याची पूरक किंवा साह्यकारी होत. [वीज चमकून जाते. वारा वाहू लागतो.] मोहाने, प्रमादाने किंवा केवळ नियंत्रण सामर्थ्याच्या अभावाने अस्त्र आपल्या आज्ञेबाहेर वागू लागले तर अग्न्यस्त्राचा उपयोग हा शामक आणि वरुणाची प्रार्थना हा दामक उपाय होतो. [पावसाचे थेंब टपटप पडतात. भिजल्या मातीचा खरपूस वास पसरतो. अश्वत्थामा त्या वासाचे श्वास नाक भरून घेऊ लागतो.]

अश्व. : ताता, पाऊस यायला लागला; गारा पण पडायला लागल्या वाटतं.

द्रोण. : [अश्वत्थाम्याच्या बोलण्याकडे लक्ष नाही.] अशा प्रकारे अस्त्राची समग्र पीठिका कळल्यावर मग ते समजून घ्यावं. ते बाल, स्त्रिया, शूद्र किंवा पंचमजनांच्यासाठी नाही. अनधिकाराने घेऊ नये. चोरून ऐकू नये. निष्ठेविना मागू नये. याचकास देऊ नये. याप्रमाणे शास्त्र आहे. आता एकाग्र मनाने त्याची संथा घ्यावी... [ढगांच्या प्रचंड गडगडाटाने त्यांचे शब्द ऐकू येत नाहीत. त्यांचे ओठ तेवढे हालताना दिसतात. अश्वत्थाम्याचेही डोळे आता अर्धे मिटलेले आहेत. संथा संपलेली असावी, कारण तो डोळे उघडतो. द्रोणांची तंद्री किंचित उतरली आहे. दारात पावलांचा धावल्यासारखा आवाज येतो. तेवढ्यात वीज चमकते.]

अश्व. : [जवळ जवळ ओरडतोच.] ताता, अर्जुन–

द्रोण. : [डोळे उघडतात.] काय म्हणालास? अर्जुन? कुठं आहे तो?

अश्व. : [उत्साहाने मांडी मोडून उठत] तो काय, आत्ता गेला... कुटीच्या दारावरून पळत होता.

द्रोण. : [पावसाचा आवाज ऐकत] पाऊस पडतोय वाटतं... असल्या पावसात हे पोर, कुंती काय म्हणेल मला– [लगबगीने उठतात. दाराशी जात] कोण आहे ते? अर्जुना, इकडे ये पाहू. [त्यांचा चेहरा चिंतातुर दिसू लागतो. दहापाच पावलांवरून दिव्याच्या कवडशाच्या अनुरोधाने अर्जुन मान खाली घालून द्रोणांकडे येतो. डोक्यातून पाणी ओघळत आहे. कपडे भिजलेले आहेत. डोळ्यांतून आसवे ओघळतील असे वाटण्याइतका चेहरा रडवेला आहे.] अर्जुना, अरे किती भिजलास! [आपल्या अंगावरील वस्त्रानं त्याचं डोकं पुसू लागतात.] एवढ्या अंधारात, पावसात कशाला आला होतास इकडे?

अश्व. : ताता, त्याचा पंचा पार भिजलाय बघा, माझा देऊ? थंडी होते ना ओले कपडे अंगावर असल्यावर?

द्रोण. : ये आत. पंचा बदलून घे. [अर्जुन आत येतो. अजून मान खालीच आहे.]

का रे, असा कष्टी का? तुला काही होतंय का? काय सांगायला आला होतास? तुला सुयोधन काही म्हणाला का? जरा अरेराव आहे तो!

अर्जुन : [इतका वेळ दाबून ठेवलेला हुंदका बाहेर पडतो.] आचार्य, मला क्षमा करा... [खाली वाकून त्यांचे पाय धरतो. दोनचार क्षण तसाच पाय धरून राहतो.]

द्रोण. : [गोंधळून पण प्रेमाने] अरे, तुला झालंय काय,– अन् क्षमा कसली मागतोस? ऊठ. वेडा कुठला. [त्याला उठवतात. तो डोळे पुशीत उभा राहतो.] हं, नीट सांग बघू काय झालं ते? [अश्वत्थामा कुतूहलाने पाहात आहे.]

अर्जुन : आचार्य, मी अपराधी आहे. पातकी आहे. तुमचा शिष्य व्हायला नालायक आहे.

द्रोण. : [सात्त्विक चिडीनं] असं केलंस तरी काय न? तू काय घातकी आहेस, की चोर आहेस, की...

अर्जुन : [त्यांच्या शब्दांनी त्याच्या विचारात स्पष्टता येते. आता तो धीराने बोलतो] आचार्य, मी चोर आहे.

अश्व. : तू चोर?

द्रोण. : [शान्तपणे] काय चोरलंस? कुणाचं अन् कधी?

अर्जुन : [पुन्हा गोंधळतो. कसे सांगावे याचा विचार करतो.] आचार्य, मला क्षमा करा. मी तुमची शंका घेतली; पण खरंच, माझ्या मनात तसलं काही नव्हतं.

द्रोण. : अर्जुना, मला वाटत होतं, तू त्यातल्या त्यात शहाणा मुलगा आहेस. तसं काही दिसत नाही. वेड्या, काय झालं ते नीट सांगायचं सोडून असा काय, करतोस बावचळल्यासारखा?

अर्जुन : [गप्पच.]

अश्व. : अर्जुना, अरे सांग. ताता काही तुला मारायचे नाहीत.

अर्जुन : [त्यांचा हात आधाराला घेऊन बोलायचा प्रयत्न करतो.] आचार्य, मी तुमची, माझ्या गुरूंची शंका घेतली. [द्रोणांना कळत नाही.] तुम्ही म्हणाला होतात, अश्वत्थाम्याला रात्री ब्रह्मकर्म शिकवतो म्हणून. [द्रोणांचा चेहरा पडतो. ते अर्जुनाकडे न पाहता त्याच्या डोक्यावरून दूर अवकाशात पाहायला लागतात. अश्वत्थामा पागोळीच्या पाण्याशी खेळत आहे. पुढे तो कधी दाराबाहेर, कधी आत असा इकडे तिकडे करीत असतो. अर्जुन खाली बघतच बोलत आहे.] पण एक दिवस दुर्योधन म्हणाला– [द्रोणांच्या चेहऱ्यावर रोष] तुम्ही अश्वत्थाम्याला अस्त्रं शिकवता म्हणून. [द्रोणांचा चेहरा ताणलेला. तेवढ्यात अर्जुन वर बघतो. त्यांचा चेहरा पाहून भिऊन पुन्हा खाली पाहतो.] मी त्याचं ऐकायला नको होतं.

द्रोण. : पण त्याचा इथं काय संबंध?

अर्जुन : मला ते खरं वाटलं. एकदा रात्री उठून मी अश्वत्थाम्याच्या मागं मागं आलो,

आणि इथंच कुटीच्या बाजूला बसून तुमचं निरूपण ऐकलं. . .मला क्षमा करा.

द्रोण. : क्षमा कसली ?

अर्जुन : निरूपण ऐकल्याची नाही. ते ऐकल्यावर दुर्योधन खरंच बोलला असं मला वाटलं. [ हुंदका. ]

द्रोण. : मग त्यात खोटं काय होतं ? म्हणजे तुला वाटलं त्यात तुझी चूक काय ?

अर्जुन : आचार्यांच्याविषयी किंतू मनात आल्यावर माझी निष्ठा कमी पडणार, आणि मला विद्या मिळणारच नाही असं मला वाटलं. . .तसं झालं तर काय उपयोग तुमच्या शिकवण्याचा !

द्रोण. : मग तुझा किंतू घालवला नाहीस तो !

अर्जुन : मग मी मनाशी ठरवलं, दुर्योधन तो दुर्योधन. आचार्य करतील तोच धर्म. धर्माधर्माची भानगड सोडून दिली अन् माझ्या आवडत्या विद्येच्या मागं लागलो. आचार्यांबद्दल शंका घेण्यापेक्षा त्यांच्यावर आणखी निष्ठा ठेवली तर झाल्या-गेल्या पापाचं निराकरण होईल असं मानलं, आणि मग रोजच तुमच्या नकळत इथं यायला लागलो, विद्या शिकायला.

द्रोण. : [ हसून ] म्हणजे अनिष्ठेचं विष चोरीच्या जहरानं उतरवलंस तर !

अर्जुन : म्हणून तर मी म्हणालो– मी चोर आहे. पण काय करू मी ? या धनुर्विद्येचा अंगात चळ भरलाय. कुठं कुणी काय सांगत असला की कान टवकारतात. डोळे सारखे धनुष्यबाण पाहतात. वाटेनं चालताना बोरीचं झुडूप वाकून कमानदार झालेलं दिसलं की त्याच्यावर दोरी चढवावीशी वाटते. पायात मोडलेला काटा हातानं काढला की वाटतं, बाणाच्या टोकात हा बसवला तर कुणाचा तरी पाय उडवायला उपयोगी पडेल काय ? नुसता उभा राहिलो तर पायाच्या अंगठ्यानं मातीत महिरपी आकार काढतो. कुणाला काय विचारून घ्यावं याचा तर ताळ रहात नाही. अश्वत्थाम्याला पाणी भरू लागतो; का तर त्याला विचारून काही अस्त्रंशस्त्रं मिळाली तर बघावीत म्हणून. तो म्हणतो मला काही कळतच नाही; पण माझी सवय जात नाही. मागं एकदा तो निषादकुमार आला होता– माझ्या किती मनात होतं त्याचं यातुकर्म शिकून घ्यावं म्हणून. पण तो राहिलाच नाही.

द्रोण. : [ आठवून ] शिष्यत्वाची मूर्तीच होता तो ! अशी ओढ हवी विद्येची.

अर्जुन : [ एकलव्याच्या स्तुतीनं त्याचा बालिश अहंकार दुखावतो. ] मलाही तसंच वाटलं. ओढ असली म्हणजे अडचणीवर उपायही सुचतो, नाही का आचार्य ? किती दिवस मला वाटायचं, अंधारात कसा लक्ष्यवेध करतात ? एक दिवस काय झालं, नंदादीपाच्या उजेडात जेवत होतो. तेवढ्यात वारा सुटला आणि दीप विझला; जेवण मात्र चालूच राहिलं. झालं, माझ्या एकदम लक्षात आलं– अभ्यासामुळं या हाताला एवढी सवय झाली आहे की अंधारातसुद्धा नेमका

तोंडातच जातो. अन् त्यावरुन मी अंधारातसुद्धा अभ्यास करायला लागलो. आता काळोखातला शब्दवेध जमायला लागलाय मला.

द्रोण. : काळोखात शब्द पकडायला पण शिकलायस ना ! कळलं ! कसा चमत्कार आहे पहा. मी विद्येचं ताट घेऊन या अश्वत्थाम्याच्या मागं लागलो आहे तर त्याला भूकच नाही. त्या निषादाला भूक होती तर ताट विटाळेल म्हणून त्याला हेटाळून लावावं लागलं आणि इथं इच्छाभोजनाचा अधिकारी, अष्टमीच्या अंधारातला भिकारी होऊन, त्या ताटातला घास ओढायला बघतो आहे. [ थांबतात. ] बरसा अर्जुना, [ अर्जुन बुचकळ्यात पडलेला ] यापुढं मी असं होऊ देणार नाही. तळं वाहिलं नाही तर डबकं होऊन जाईल. गाईनं पान्हा दिला नाही तर कास फुगून, तिची दशादशा होईल. सत्‌शिष्याला विद्या न देणाऱ्या गुरूची सेवा म्हणजे भाकड गुराला वासरानं मारलेल्या ढुशाच ! [ अश्वत्थामा आत येत असतो ] ह्या रडतराऊला अश्वस्था म्हणून घोड्यावर बसवण्यापेक्षा तुझ्यासारख्या ऋजुवृत्तीच्या क्षत्रियाला धनुर्विद्या दिली तर माझ्या विद्येचं सार्थक तरी होईल आणि मी कर्तव्याला तरी जागेन. अर्जुना, खंत कसली करतोस ! तू असला चोर आहेस म्हणूनच शिक्षापात्र आहेस !

अश्व. : कसली शिक्षा देणार ताता ह्याला ?

द्रोण. : सगळीच्या सगळी शिक्षा देणार याला. तुला मग.

अर्जुन : द्याल ती शिक्षा भोगीन मी आचार्य.

द्रोण. : [ हसतात. ] अरे, शिक्षा म्हणजे काय ? दंड नव्हे ! विद्या !

अर्जुन : [ सद्‌गदित ] आचार्य, मला अश्वत्थाम्याच्या बरोबरीनं...

द्रोण. : छे, छे. अर्जुना, शिक्षकाला विद्याग्राही शिष्य हा पोटच्या पोराहूनही प्रिय असतो. कारण पोटचा पोर काय, फार तर परलोकातलं तर्पण करील. इहलोकातलं तर्पण चांगला प्रवीण शिष्यच करू शकेल. तेव्हा आता अश्वत्थाम्याच्या जागी तूच...

अश्व. : म्हणजे मी उद्यापासून यायचं नाही ताता ?

द्रोण. : [ हसतात. त्याच्या खांद्यावर हात ठेवून ] नाही बरं अश्वस्था. या तुझ्या कोवळ्या खांद्यावर उगाचच एवढं मोठं ओझं देत होतो मी.

अश्व. : [ टाळी वाजवतो. त्याला चंद्र उगवताना दिसतो. ] ताता, तो बघा चांदोबा भागतोय !

द्रोण. : ईश्वराचा चक्षूच अमृताचा वर्षाव करतोय. तमसो मा ज्योतिर्गमय । या अर्जुना, अश्वस्था, त्या शीतल भगवानाला नमस्कार करू या. आपण सूर्याला विद्येची देवता मानतो. म्हणूनच वाटतं आपलं ज्ञान कोरडं, दाहक अन् तापदायक होतं. या चंद्राला मागू या– तू जसा उगवल्यापासून मावळेपर्यंत सारखा प्रकाशच देतोस, ताप मात्र कधीच देत नाहीस, तसंच आमचं ज्ञान-ध्यान-वचन असू दे; तेजस्वी पण शीतल !

[ पडदा ]

अंक दुसरा
प्रवेश तिसरा

[ स्थळ : एकलव्याचे विद्यास्थान. वेळ : सकाळची. हरणाचे कातडे कमरेला लावलेला एकलव्य गुरूच्या पुतळ्यासमोर बसून, एका निसण्याच्या दगडावर बाणाचं टोक घाशीत आहे. मधूनमधून ते वर घेऊन पाहतो. ]

एकलव्य : आता उजळलास! एवढा घासला तेव्हा. विद्येचा प्रतीकच तू! सारखा घासून-पुसून लख्ख ठेवलास तरच कामाचा. जरा पडून राहिलास की गंजाची पुटं चढणार तुझ्यावर. तुला मागं पंख हवा. विद्येलाही कल्पनेचे पंख लागतात! तिच्यासारखाच तूही सन्मार्गी, एकमार्गी! दोघंही दृष्टाचा आणि अदृष्टाचा वेध घेण्यात सारखीच! तुला धनुष्य हवं. या विद्येला शरीराचा कमठा करावा लागतो अन् बुद्धीच्या दोरीनं कसावा लागतो... निष्ठेच्या अंगठ्यानं ती दोरी खेचावी लागते... आणि धनुष्याचा टणत्कार झाला की इकडे मोठा चमत्कार होतो. हा विद्येचा बाण आपल्या मनःकोशावर उलटून येतो आणि त्याचा भेद करतो! बाणा! तुलाच वंदन. [ कमाळाला लावतो. दृष्टी वर झाल्यावर पुतळ्याच्या बाजूला असलेल्या एका खड्यांच्या ढिगाकडे जाते. ] ढीग दिसतो मोठा, पण वर्ष एकच झालंय. असे आणखी अकरा ढीग व्हायला हवेत. एकेक खडा म्हणजे विद्येनं एकेका दिवशी दिलेला प्रसादच जणू. [ हाती बाण धरून त्या ढिगा-जवळ जातो. दोन-चार खडे उचलतो. ] खडे तरी कसे पहा! हा गारेचा. पांढरा पण कठीण, कर्कश! त्या दिवशी डोक्यात काही शिरलेलं नसणार! हा काळा-कुळकुळीत पण पाण्यानं झालाय गुळगुळीत. सरळ मनाच्या निषादासारखा! याचं तोंड कसं वेडंवाकडं झालंय! विद्या-माई, माझी गुरु-माउली अप्रसन्न असणार त्या दिवशी! हो वाटतं... त्याच दिवशी ती खळबळ झाली. गुरूला साकडं घालून बसलो होतो पंधरा दिवस. तुझ्या ध्यानानं नि प्रसादानं जर विद्या मिळायची तर रोजच्या रोज हे बाण घासा कशाला न् दोरीला लावा कशाला. पंधरा दिवस अशा अडेलपणानं काढले. अन् त्या दिवशी झाडऱ्या ध्यानाचा प्रयोग करून बाण सोडला त्या झाडाच्या खोडावर! चिंचेचं पान टिपून उडवायचा मी... त्या दिवशी खोडाला नाही लागला बाण! म ऽ ग प्रकाश पडला— नव्हे गुरूंनी प्रकाश पाडला : अरे वेड्या, एका पंखानं उडायला बघणारा गरुड

आहेस तू! नुसत्या ध्यानानं धनुर्विद्या साधती तर दगडधोंड्यांनी बाणांचा पाऊस पाडला असता. ते तर जन्मभर ध्यानस्थ! सगळाच्या सगळा माणूस कारणी लावला पाहिजे. कान-डोळ्यापासून हातापायापर्यंत, सारे दिसणारे अवयव... हृदया-पोटापासून मना-मेंदूपर्यंत सारे न दिसणारे अवयव, सगळे त्या विद्येच्या कारणी लाव... [ खडा खाली टाकतो. ] ह्या आठवणी पुरेत... चला... [ पुन्हा बाण घासू लागतो. हळूहळू त्याच्यावर प्रकाश मंदावत जातो. पड्या-आत कालप्रवाह संथ पण द्रुतगतीनं वाहत असल्याचं सुचवणारं संगीत. परत, रंगमंच अंधारातून उजेडात येतो. एकलव्य तसाच बाणाला धार लावीत बसलेला आहे. समोर खड्यांचे ढीग एकाऐवजी तीनचार झाले आहेत. एकलव्याच्या चेहऱ्यावर आधी लव दिसत होती तिथं आता दाढी वाढली आहे. बाकी जसंच्या तसं. आता एक खार त्याच्यासमोर शेपटीचा गोंडा वर करून टक लावून बघत बसली आहे. आणि एक चिमणी खांद्यावर बसली आहे. ] आलास होत! सुरेख चमकायला लागलास! अरे वा! आज आपल्या मैत्रिणी पण तुझ्या आत दिसायला लागल्या! [ बाणाकडंच पहात ] वा, खारुताई! काय पण ऐट तुझी. शेपटीचा गोंडा अगदी ध्वजासारखा उंच केलाय! आमच्याच सैन्याचा ना? कारण हा बाण तर शत्रूच्या ध्वजाच्या पोटात घुसणार. त्यात त्याचं प्रतिबिंब कुठलं? [ तिच्याकडं बघतो. गंभीरपणं ] शत्रू? मला कुठाय शत्रू! हा एवढासा जीव इतक्या धिटाईनं माझ्या समोर उभा आहे! या जिवाला तर एका क्षणात कळलं असतं मी त्याचा शत्रू आहे म्हणून. मला कुणी शत्रू मानीत नाही तर मी तरी कुणाला शत्रू का मानावं? [ खांद्यावरच्या चिमणीला हातात घेतो. ] काय चिऊताई, खरं की नाही? [ तिच्या चिवचिव करण्याचा आवाज. ] चि ची... चि ची! छे, छे, छे, छे म्हणतेस काय? तुझंही बरोबर असेल; मनानं आपण कुणाचं शत्रू नसलं तरी लढायला उभं रहावं लागेल कधी तरी! नाही निदान कुणी लढण्याची पाळी आणू नये म्हणून बलवंत होऊन रहायला हवं! म्हणून त्यांची शस्त्रं हवी– अस्त्रं हवी... पण म्हणजे काय? स्वतःची तयारी मोठी हवी, वाढवायला हवी. अखेर आपणच आपला मित्र! कळलं चिऊताई– लहान जीव तू– पण ज्ञानाची मोठीच ग ठेव तुझी... बरं जा आता हां, बाण तल्लख ठेवले पाहिजेत... [ पुन्हा प्रकाश मंद होत जातो. कालप्रवाहवाचक संगीत चालू होते. परत रंगमंच अंधारातून उजेडात येतो तेव्हा खड्यांचे ढीग आठ नऊ. ढगांनी अंधारलेले आकाश ... टपटप थेंब पडल्याचा आवाज. एकलव्य बाण घासताना लगबगीनं उठतो. पुतळ्याच्या वर निवारा करण्यासाठी लाकडं, पानांच्या चटया वगैरे लावतो. ] वा, वा! काय खरपूस वास सुटला आहे. गंधाचं राज्य आहे माझ्या या घरकुलात. माझ्या या गुरुकुलात. विद्येचा गंध असाच असतो का? असावा; कारण इतक्या

विस्तीर्ण आसमंताला भरून टाकणाऱ्या या व्यापक गंधाशीच विद्येच्या गंधाची तुलना करता येईऽ. आणि त्या वासाचा विधाता माझा गुरू..., गुरुजी, तुमचं हे चन्द्रमौळी छप्पर आवडतं का तुम्हांला? तुमची तिथली कुटी पण अशीच होती... पावसा, जरा थांब. आचार्यांना भिजवू नकोस. तू ये तुला हवा तसा... [ वीज चमकते. ] पहा, तुझे पलिते तुझ्या स्वारीच्या पुढं धाडलेस काय? काय पण चमकली– आंतरकोशात साक्षात्काराची ठिणगी पडावी तशी! मला त्या ठिणगीचा कितीदा तरी अनुभव आलाय. वीजबाई, चमक; मला तुझी अगदी भीती नाही– उलट या अंधारात तू भली वाट दाखवणारी होतेस... [ गडगडाट ] अहाहा... हृदयाच्या गाभाऱ्यात विद्या-विद्या असा पुकारा करावा, त्याचे सात ध्वनी मस्तकाच्या घुमटातून उमटावेत तसं वाटलं... [ पाऊस जोरात पडतो. केसांतून पाणी गळू लागते. ] आनंद! आनंद! अजून केस ओले लागताहेत. त्या कमंडलूतल्या पाण्याचाच अभिषेक! थेंबानो, पाची नद्यांचं आणि साती समुद्रांचं पाणी पिऊनच आलात ना रे! मला पुन्हा सांगायला ना! माणूस म्हणून विद्येचा अधिकार कसा पुरवून घेतोय ते ,हायला ना! पण मी परीक्षेत उतरेनच, होय ना आचार्य! [ तंद्रीत जातो. थोड्या वेळानं पाऊस थांबतो. तंद्री उतरते. ] इथं येऊन गेले! मला समजावून गेले! आजच कसे? किती वर्षांनी! समजलो... त्यांना आवडणारी हाक मारली ना! तिनं हरखले. आता मला कळलं– माझ्या गुरूला आचार्यपदाचा केवढा अभिमान, केवढी अस्मिता! ते केवळ आचार्य, मी केवळ शिष्य– जगातली सारी नाती तोडून केवळ गुरुशिष्याच्या बंधनानं आम्ही बांधलो आहोत. आई जवळ यायला मुलानं हाक मारावी लागते ती 'आई' म्हणून! तशीच त्यांनी जवळ यावं म्हणून मी त्यांना हाकारलं पाहिजे... 'आचार्य!' ... [ तंद्रीत. ]

[ प्रकाश मंद होत जातो. कालप्रवाहाचं संगीत चालू होतं. पुन्हा एकलव्य दिसतो तो पुतळ्यासमोर आसन घालून बसलेला. पुतळ्यावर पानाफुलांचे हार आहेत. सारी रानफुलं, लहानमोठी पानं, गवतानं काड्यांनी वगैरे बांधलेली. शेजारी खड्यांचे ढीग आता बारापर्यंत गेले आहेत. ]

ॐ भद्रं कर्णेभिः श्रुणुयाम देवाः... हा शिष्य एकलव्य पाठासाठी बसला आहे. धौत आहे, विनीत आहे. आचार्य, [ थांबतो; थोड्याच वेळात तंद्रीत जातो. यापुढचे "आचार्य," या आवाहनानंतरचे, आचार्यांचे म्हणून असलेले सर्व बोलणे एकलव्याच्याच आवाजात पण आकाशभाषिताच्या स्वरूपात येते. हे त्यालाच प्रतीत झालेले ज्ञान आचार्यांच्याकडून चहू बाजूंनी प्राप्त होत आहे अशी त्याची धारणा यातून व्यक्त झाली पाहिजे. ] ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः। मी प्रसन्न आहे. शस्त्रविद्या अस्त्रविद्या अभ्यासून झाल्याच आहेत. पण त्या, नाही म्हटलं तरी अंगावरच्या पांघरुणासारख्या आहेत. शस्त्रविद्या त्यात बाहेरची. अस्त्रविद्या

आणखी आतली; तरी सात्म झालेली नव्हे. दोन्ही विद्यांच्या प्रत्यक्ष आचारानं साऱ्या इंद्रियांनाही वळण लागलं असलं तरीही त्या सात्म विद्या नव्हत. अशी सात्म होणारी, म्हणून सर्व विद्यांची विद्या असलेली परमगुह्य विद्या आता ऐकावी. ती सांगणारानं सांगून, बाहेरून येत नाही. ऐकणाराला ऐकता किंवा न ऐकताही ती आतूनच उमटते... धरित्रीच्या पोटातून झरणाऱ्या मधुर आणि निर्मळ धारे-सारखी. मग गुरू काय करतो? फटीफटीतून साचणारा मालिन्याचा कचरा दूर करतो. या विद्येचं नाव ध्यान. ते कोणत्याही अभ्यासाला जोडल्यावाचून तो पुरा होत नाही आणि झाला तरी सफळ होत नाही म्हणून याला ध्यानयोग म्हणतात. आत्मशक्तीचे भान रहावे. अभ्यासाला प्रवृत्त होण्याआधी शंकांचे निरसन व्हावे! [ आता, तंद्री उतरलेला एकलव्य स्वतःच बोलू लागतो. तंद्रीनंतरचे त्याचे बोलणे स्वतःचे, स्वतःच्या तोंडचे. ] हा साऱ्या विद्यांचा पाया असताना आधीच का कळला नाही! कळता तर एवढी विद्या कितीतरी अल्प काळात नसती का लाभली आचार्य? [ तंद्रीत : आकाशभाषित ] शंका चांगली आहे. योग्यही आहे. वस्त्रातल्या धाग्यासारखा इतर विद्यांच्या अभ्यासात हा गुंफलेला होताच. आणि त्या मिळता मिळतानाच याच्याही लाभाची तयारी होत असते. पण आता तो शिकायचा तो साधन म्हणून नाही, साध्य म्हणून. अन्य विद्येसाठी नाही, त्याच्याचसाठी तो! [ तंद्री उतरते. स्वतः बोलू लागतो. ] मग हा एकटाच एक आधीपासून का सांगितला नाही आचार्य? [ तंद्रीत : आकाशभाषित ] सामान्य व्यवहारात, आधी कळस मग पाया असे करून चालणार नाही; कारण ते प्रकृतीच्या नियमांना विरोधी होईल. अंतरीच्या व्यापारात याच्या उलट वागावे लागते. शिकताना तर हे आणखीच खरे असते. एका अवस्थेचा कळस हा दुसरीचा पाया असतो आणि या दुसरीच्या खांबावरून सुटलेले काही दोर पहिलीला आधार देत असतात. पहिली मूर्ताची. मूर्त तितके कळायला सुलभ असते. अशा नाना मूर्तांचा अभ्यास केल्यावर त्यांच्यातले साधारण तत्त्व सहज कळते. ते तर अमूर्त! उदाहरण घेऊ: ध्वनी हे अमूर्त तत्त्व आहे. मंद आणि तीव्र, हसण्याचा आणि रडण्याचा, स्पंदनाचा आणि क्रंदनाचा अशा बहुविध ध्वनींचे अध्ययन झाल्यावर ध्वनी या तत्त्वाचे आकलन सहज होते. म्हणून, [ दूर भुंकणाऱ्या कुत्र्यांचा 'भो' आवाज आकाशभाषितातल्या 'भो'शी एकरूप असतो. तसेच यापुढील सर्व ठळक भाषणात ] **भो** एकलव्य, ध्यानयोगाचे बी पेरण्यासाठी धनुरादी विद्यांच्या अभ्यासानं मनाची **भू भू** भूमी निर्वाळावी लागली! ही सारी साधना! साध्य काय? परिचित विद्येच्या रूपानं सांगायचं तर ध्यान हे धनुष्य, आपण स्वतः बाण, सारे विश्व त्याचे लक्ष्य...! **भो भो** एकलव्या,... [ स्वतः बोलतो ] या परमानंदाच्या वेळी **भो भो** म्हणून जागवण कशाला? का ही अतिगुह्य विद्या म्हणून सावधान करण्यासाठी हळी? काय

आहे हे आचार्य ? [ तंद्रीत : आकाशभाषित ] **भो भो** एकलव्या, तशी **भु भु**... भूमिका नाही. **भो भो** म्हणून हाकारे करण्याची गरज काय ? **भ...भ...** भग्वान **भा भा** भास्कराला **भी भी** भीती दाखवावी लागत नाही किंवा **भु भु भु**... भूमींवरच्या जीवांना हाक मारून जागे करावे लागत नाही. **भो भो** भोगांच्या **भो भो** भोवऱ्यात किंवा **भौ भौ** भौतिकाच्या फेऱ्यात **भा भा** भान विसरून पडलेले जीवसुद्धा **आ आ** आपोआपच जागे हो **ऊ ऊ** ऊन... [ डोळे उघडतो. ] का असे अंतराय येतात ? ज्ञाताच्या आणि अज्ञाताच्या शिवेवर आहे तरी कुठं मी ? कां माझी पारध चालली आहे ? [ दूर अंतरावरचं भुंकणं जवळजवळ यायला लागतं !... कुत्रं तावानं भुंकतच राहतं... आवाज आणखी जवळ येतो. एकलव्य कान देऊन ऐकतो... ] अस्सं ! अनाहताच्या नादात या अनाहूताचा ध्वनी मिसळत होता तर ! [ कुत्र्याच्या भुंकण्यात खंड नाही. ] सरमेच्या सुपुत्रा, तुझं हे संगीत आत्ता ऐकायची माझी इच्छा नाही. नाही बरं. गप्प वाटेनं जा भला. एवढी विशाल पृथ्वी तुला मोकळी आहे. ती टाकून माझ्याच वाटेला येतोस कशाला ? तू तर माणसाचा फार फार जुना मित्र ! तुला नुसत्या शब्दानं-सुद्धा सांगून पुरेल नाही का ? [ भुंकणे अखंडित. ] ऐक ! तुझी ही भुकभुक बऱ्या बोलानं थांबली नाही तर मला रागवावं लागेल. मुकाट्यानं जा बघू. [ भुंकणे पुढे चालू. ] थांब तर : तुझी वटवट आता कायमचीच थांबवतो– बघ ! [ धनुष्याला हात घालतो. ] शुना, नीटपणानं ऐकत नाहीस तर आता एकदा अखेरचं भुंकून घे. [ कुत्रं भो ऽ ऽ करतं. ] हा बघ निघाला बाण. माझ्या गुरूचं स्मरण करून सोडलेला हा बाण तुझी कंठनाल छेदून गेला नाही, तर... आचार्य ! [ तंद्रीत : आकाशभाषित ] थांब एकलव्या– थांब. नुसत्या भुंकण्या-साठी देहांताची शिक्षा ? जगू देत त्याला. तो भुंकतोय ते काय तुझ्या ध्यानात अंतराय आणायला ? ती तर त्याची प्रकृतीच आहे. तो त्याचा धर्मच आहे. पण भुंकणं म्हणजे कुतरा नव्हे. तेवढं नको असलं तर ते असं बंद कर. [ तंद्रीतच सात बाण सोडतो. पहिल्या बाणापासूनच भुंकणं विरळ होत जातं. नंतर वु–आ–वू... असं रडणं ऐकू येतं. सातव्यानंतर चिडीचिप. स्वतः बोलतो ] आता कसं शांत झालंय सारं ! ध्यानयोगाचा अभ्यास चालला होता... आचार्य !... [ तंद्रीत... ]

[ पडदा ]

## अंक तिसरा
### प्रवेश पहिला

[ स्थळ : मृगयावन. पार्श्वभूमीवर शिकारीचे शिबिर दिसत आहे. पात्रे : अर्जुन (२६), दुर्योधन (२८), अश्वत्थामा (२३) आणि शिकारी सेवक बाहुक. पैकी दुर्योधन सोडून बाकीचे गडबडीनं निघाले आहेत. ]

अर्जुन : बाहुका, धनुर्विद्येतला एवढा मोठा चमत्कार पाहिलास आणि तो कुणी घडवला हे मात्र तुला माहीत नाही ?

बाहुक : नाही महाराज. आम्ही चाललो होतो हाके घालीत अन् रान उठवत. हा एकच कुत्रा थोडा पुढं गेला होता. आम्ही त्याच्या मागानं चाललो होतो. मधेच त्याचं भुंकणं थांबल्यासारखं वाटलं. पुढं जाऊन पाहतो तो याचं तोंड हे असं...

दुर्यो. : [ गडबडीने मागून येत ] बाहुका,... [ सगळेच थांबतात. ] ही काय गडबड आहे ?

बाहुक : महाराज, आपल्याला वनात गेलं पाहिजे– म्हणून सारेजण निघाले आहेत.

दुर्यो. : आणि मला न सांगताच ?

बाहुक : अर्जुनमहाराज म्हणाले– 'जाऊनच बघू या. रस्ता दाखव.' म्हणून मग निघालो.

दुर्यो. : पण तू सेवक कुणाचा ? माझा की अर्जुनाचा ? [ अर्जुनाच्या कपाळावर तिरस्काराच्या आठ्या. ] आता गप्प का ? अन् अशी काय बला आली होती की तुम्ही शूर वीर [ अर्जुनाकडं सहजच एक कटाक्ष टाकून घेतो ] हातातला घास ताटात टाकून रानात निघालात रे ? ॐ ? अश्वत्थामा, तू तरी म्हणायचंस मला !

अश्व. : युवराज, यानं आणलेली वार्ताच अशी चमत्कारिक होती की...

दुर्यो. : बाहुका, काय झालं हे मात्र तू अजून सांगितलं नाहीस ! प्रत्यक्ष युवराजाला तू राज्यातली घटना सांगत नाहीस याचा अर्थ काय ?

बाहुक : क्षमा असावी महाराज. आज हाके घालायला गेलो तर कुणीतरी आमच्या सगळ्यांत चपळ कुत्र्याचं तोंडच बंद केलं बाणांनी !

दुर्यो. : बाणांनी ? कुरूंच्या भूमीवर कुरूंच्या कुत्र्याचं तोंड बाणांनी बंद करायला कोण धजावला ? परक्या देशातला असेल...आणि ही वार्ता तू युवराजाला मात्र सांगितली नाहीस ?

अश्व. : मला काय ठाऊक हा युवराजांना न सांगताच इकडंतिकडं फिरतोय म्हणून ! तरी

एकदा मी याला म्हटलंसुद्धा–
[ सेवक नकळत ओठ चावतो. ]

दुर्यो. : बरं, आता सांग काय झालं ते. पुन्हा अशी चूक करू नकोस.

बाहुक : महाराज आम्ही चाललो होतो हाके घालीत. हा एकच कुत्रा जरा पुढं गेला होता. मधेच त्याचं भुंकणं थांबल्यासारखं वाटलं, म्हणून पुढं जाऊन पाहतो तर याचं तोंड हे असं...

दुर्यो. : [ उपरोधानं ] आणि तुझं तोंड हे असं. [ बाहुकाचा चेहरा उतरतो. ] पाहिला मी तो येता येता. कुणी मारले हे बाण ?

अश्व. : तेच तर माहीत नाहीये याला.

दुर्यो. : [ अश्वत्थाम्याकडे दुर्लक्ष करून ] काय रे, तुला जाऊन पाहता नाही आलं का ?

बाहुक : सात दिशांनी सात बाण लागलेत महाराज. कुठून आले कळेच ना.. कुत्रा तर पुढं पाऊल उचलायला तयार नव्हता. दुपार व्हायला आलेली. म्हटलं हा चमत्कार महाराजांना आणि अर्जुनराजांना तरी दाखवावा.

दुर्यो. : अन् म्हणून तुला माझ्याकडं यायचं भान राहिलं नाही ! लुच्चा कुठला. चला आता. वाट दाखव. हो पुढं.
[ ते चालू लागतात. एक पडदा जाऊन दुसरा येतो. ]

अर्जुन : बाहुका, बाणांच्या दिशा आणि त्यांची रोवणी पाहिली मी...बाण मारणारा कुत्र्यापासून पाव कोसाच्या आतच असावा.

अश्व. : युवराज म्हणतात तसा परकाच कुणी असला तर त्याचं सैन्यसुद्धा असेल की !

बाहुक : नाही कुमार, सैन्याचे माग नसने का दिसले ? हे बघा आलो आपण. या इथंच होता तो कुतरा...

दुर्यो. : बाहुका, दूतकर्मातसुद्धा अगदीच कच्चा वाटतोस तू मला. कुत्रा या इथं होता एवढंच ढोबळ म्हणून कसं चालेल ? त्याचं तोंड कोणत्या दिशेला होतं ते कळल्यावाचून माग तो काय काढणार ?

बाहुक : महाराज, कुत्र्याची जात ती ! आम्ही येईपर्यंत दहा वेळा शेपटीभोवती फिरलेलं असणार ! त्याच्या तोंडाची दिशा कोण सांगणार ? [ तोंडावर स्मित चमकून जातं. ]

अर्जुन : मला वाटतं, या इकडून गेलं तर तो धनुर्धर सापडेल आपल्याला. [ बाकीचे नकळत त्याचा अधिकार मान्य करून त्याच्या मागं जातात. ]
[ हे सर्वजण आत जातात तेवढ्यात पडदा हळूहळू वर जातो. रंगभूमीवर एकलव्याची ध्यानस्थली दिसू लागते. एकलव्य मूर्तीसमोर ध्यानस्थ. काही निर्माल्य झालेल्या आणि काही ताज्या हारांनी, पानाफुलांनी वगैरे मूर्ती झाकलेली. पलीकडे त्याचे धनुष्य आणि भाता. त्यांच्याशेजारी निसण्यावर घासून पडलेला एक बाण. ]

एक. : [ उतरत्या तंद्रीत ] अहाहा, आज मी आनंदवनात आहे. सद्‌गंधाच्या आवरणात.

मोहरलेल्या आंबराईत, मोगऱ्यांच्या ताटव्यात, केतकीच्या बनात वावरत आहे. सारे सुखद गंध मला भासत आहेत... आज मी दुधामधाच्या सागरात पोहत आहे. पाकळीसारखा तरंगतो, माशासारखा सूर मारतो, कासवासारखा थिरावतो... आज भोवती सारा प्रकाश, किती किती छटांचा, निळा, पिवळा, हिरवा, जांभळा – आभाळातल्या धनुकलीसारखा, बघतच राहावासा वाटणारा... आज किती किती रूपं बघतो आहे. गोड, सानुली, प्रचंड, प्रसन्न.... मी जणू अंतराळात आहे... साऱ्या विश्वाचं विराट दर्शन घेतो आहे. तरी भीतीचा लवलेश नाही. नुसता स्नेह. सारे माझे सोयरे झाले आहेत... माझ्या नाभिकमलाचा देठ या विश्वाच्या आत–आत–आत कुठंतरी रोवून बसला आहे आणि उलट त्या साऱ्याचा देठ माझ्या नाभीतून वर येताना मला दिसत आहे. मी साऱ्यांचा, सारेजण माझे... माझ्या प्राणाहून प्रिय अशा धनुष्यातले बाणही आता फुलांसारखे माझ्या लक्ष्यांवर जाऊन पडतील. त्यांचा प्राण घ्यायचा झाला तरी डेखातला मध भुंग्यांनी चोखावा तसे शोषून घेतील. अहाहा, कुणाची माझ्यावर एवढी परमकृपा, की ह्या सोनियाचा दिवस आनंदे नाहाला – मजसी पाहाला सऽहजीच... दुसऱ्या कुणाची, तुमचीच. तुमचीया पाया, माझे दंडवत... आचार्य! [ पुन्हा आपल्या तंद्रीत जातो आणि दंडवत घालून पडून राहतो. ]
[ शोध घेत आलेले अर्जुनादी युवक तिथं पोचतात. एकलव्य तंद्रीतच पडलेला. ]

बाहुक : महाराज, हा बघा इथं कोण पडलाय. ऊठ रे. [ त्याला पायाच्या अंगठ्यानं उठवतो. ]

भम. : बाहुका, लाथ काय मारतोस त्याला? पूजा करतोय वाटतं बघ तो.

दुर्यो. : अन् वाटेल त्या मत्कुणाला उठवून उपयोग तरी काय? चल पुढं. [ एकलव्य मात्र आपल्याच नादात उठून उभा राहतो. मूर्तीसमोर डोळे मिटून चिंतनात मग्न होतो. ]

अर्जुन : बाहुका, थांब. हे बघ इथं काय! [ एकलव्याच्या धनुष्याजवळ जातो. ] दिसतंय तर साधंच. शरांचं अवस्थान मात्र विलक्षण! काय किमया असेल बरं? या दोरीची का त्या बोटांची! [ धनुष्य हातात घेतो. बाकीचे एकलव्यापाशीच उभे राहतात आणि तिथूनच धनुष्यबाण बघतात. ]

बाहुक : काय? धनुष्य! ह्या काळपटाला धनुष्य उभं तरी करता येत असेल का?

दुर्यो. : बाहुका, शत्रूचा शोध घेताना ससाण्यासारखी नजर असावी लागते माणसाची.

अर्जुन : [ स्वतःशीच ] धनुर्विशेषा, तुझ्यातूनच सुटलेले बाण होते हं ते. शाब्बास!... पण,... पण माझ्या या धनूपेक्षा [ स्वतःचं सावरतो. ] मोठं व्हायचा विचार सोडून दे... नाहीतर माझ्या एकाच बाणानं तुझी कंबर मला कधीतरी मोडायला लागेल!

दुर्यो. : [ एकलव्याला ] कोण रे तू?

एक. : [ मूर्तीशीच ] मी आनंदाचा यात्री... माझी माय धरित्री... वृक्षवल्ली सोयरी... प्रेम करतो चराचरी...

दुर्यो. : ते नंतर कर. आधी नीट बोल. [ त्याला धनुष्याच्या टोकानं ढोसतो. ] नाव सांग तुझं. इथं काय करतोयस ?

एक. : भाऊ, आपल्या वाटेनं जा कसा. का माझ्या ध्यानात खीळ पाडतोस ?

अश्व. : कृष्णांगा, तू कुणाशी बोलतोयस तुला कळतं का ?

एक. : भाऊ, तुम्ही कुणीही असा. मला काय ?... अतिथी म्हणून तुमचा सत्कार करायला पाहिजे. पण मी हा असा निसंग. तुम्हाला द्यायला रानची फळंसुद्धा नाहीत माझ्याजवळ. किती वर्षं हे असं चाललंय् ! आज पहिल्यांदा तुमच्यासारखी नागर माणसं दिसली. [ अर्जुनाकडं नजर जाते. चमकून ] भाऊ, ते तेवढं खाली ठेव बघू [ जवळ जाऊन त्याच्याकडून घेतो. ] हा तर माझा बाहेरचा प्राण. याच्याचसाठी तर इथं राहिलो, इतकी वर्षं साधना केली ! [ अर्जुन लक्षपूर्वक ऐकतो. पडद्यात हाकारी कुत्र्यांचा गलबला ऐकू येतो. ] आजकाल या कुत्र्यांचा एक उपद्रव झालाय. सकाळी असंच एक भू भू भुंकत होतं. कुठून कुणास ठाऊक. कित्ती समजावलं तरी थांबेच ना. अखेर बाणांनी तोंड बंद करावं लागलं त्याचं. [ सगळेजण प्रश्नमुद्रेनं त्याच्याकडे पाहू लागतात. ]

बाहुक : तूच मारलेस तर ते बाण आमच्या कुत्र्याला ! महाराज, आपण होऊन सापडला बघा; आपल्या मृगयावनात राहून याला आपल्या कुत्र्याचा त्रास व्हायला लागला.

अर्जुन : खूप वर्षं राहिलायस इथं ! म्हणजे, [ इतरांना ] आपण गुरुकुलात आल्यापासूनच की ! काय करतोयस रे इतकी वर्षं– धनुर्बाणाची साधना ? तू तसं म्हणालास वाटतं ना ?

दुर्यो. : अन् त्या साधनेचा उपयोग केलास कुत्री-मांजरं मारायला. हात तुझी. कुत्र्याचं तोंड बंद करायचं अगदी साधं अस्त्र तुला माहीत नाही ?

अश्व. : कोणतं बरं ते युवराज ?

दुर्यो. : अरे, भाकरीचा तुकडा ! विश्वभुंकार करणारा श्वानसुद्धा चतकोर भाकरीचा तुकडा पाहिला की गोंडा घोळायला लागतो.

एक. : तो थोराघरचा श्वान आहे हे मला माहीत नव्हतं ! पण त्याला दुखापत नक्कीच झालेली नसणार. माझ्या गुरूचा प्रसाद वाया जायचा नाही.

अर्जुन : तुझा गुरू ? कोण तुझा गुरू ?

एक. : भाऊ, तो काय ! पानाफुलांच्या आवरणाखाली दडलेला.

अर्जुन : म्हणजे ती मूर्ती ?

एक. : होय. म्हणजेच तो मूर्तिमंत सद्‌गुरू.

अर्जुन : त्याच्याकडून तू शिकलास ?

एक. : त्यात तुला नवल का वाटतं ?

अर्जुन : नाही, म्हणजे तुझा मानवी गुरू कोणी नाही ?

एक. : ही मातीची मूर्ती, ती हाडामासाची मूर्ती. मानवीच गुरू कशाला पाहिजे ? मानीव गुरूसुद्धा पुरतो.

अश्व. : अन् ही मातीची मूर्ती बोलते म्हणतोस तुझ्याशी ?

एक. : होऽ ! आम्ही लोकं रानांत गेलो तर तिथली झाडं, ओढे आमच्याशी बोलतात. दगड-गोटे हितगुज करतात. वारा कानाशी गुणगुणतो...मग ही मूर्तीच का नाही बोलणार ? खुशाल बोलते. तुझा पिता तुझ्याशी बोलतो तशी ही गुरुमूर्ती माझ्याशी बोलते. मी चुकलो तर सुधारून घेते. शिक्षण देते. शिक्षासुद्धा देते. सकाळी त्या कुत्र्याचं तोंड बंद करण्याचं अस्त्रही तिनंच दिलं ! तुमचा विश्वास नाही बसत ?

अश्व. : कसा बसेल ? माझे वडील स्वतःच मोठे आचार्य आहेत.

एक. : आचार्य ! [ तंद्रीत जातो. किंचित् डोळे मिटून ] माझ्याही आचार्यांचा एक मुलगा होता. [ अखेरचे तीन शब्द अस्फुट. अर्धवट तंद्री लागते. ]

अर्जुन : कुठे आचार्य आणि कुठे याचा मातीचा गोळा ! मध्यान्हीच्या सूर्याबरोबर कुंभारी पणतीची तुलना करतोयस !

दुर्यो. : पण त्या पणतीच्या शिष्यानं सूर्याच्या पट्टशिष्याची जिरवली मात्र !

अर्जुन : हा आचार्यांचा अधिक्षेप मी ऐकून घेणार नाही. याच्या चेटुकाची भलावण तू करतोयस. मी ते चालू देणार नाही. हा मोठा सांगतोय हा मातीचा गोळा त्याचा गुरू आहे म्हणून. याचा तर समाचार घेऊच, पण त्याआधी मला याच्या गुरूकडे बघू दे. [ तंद्रीतल्या एकलव्याला हिसडा देतो. ] ऐक रे काळ्या, तुझ्या गुरूला सांग आपलं रक्षण करायला. माझ्या गुरूचं स्मरण करून सोडल्यावर हा बाण एका निमिषात तुझ्या गुरूची कंठनाळ तोडून गेला नाही तर...

एक. : का रे भाऊ, माझ्या गुरूवर का एवढा राग तुझा ? कंठनाळच तोडायची हौस असली तर माझी तोड ना.

अर्जुन : तू क्षुद्र आहेस ! म्हणतोस ना तुझ्या गुरूचा प्रसाद आहे म्हणून ? प्रसाद कसला, काही तरी चेटुक आहे झालं. ते चेटुकच एकदा उलथलं मग तुझ्यात काय दम आहे ? सर बाजूला... [ धनुष्य सरसावतो. ]

एक. : असं ? हे फार फार वाईट बोलतोयस तू ! पण तुझ्या मनातच असलं तर तसं होऊ दे. माझा गुरू माझ्याहून खासच समर्थ आहे. चल हो तयार. आणि मला ती पूजेची पानंफुलं काढू दे. नाहीतर तू म्हणशील, याच्या मंतरलेल्या पानाफुलांचं कवच झालं म्हणून. [ भारावून पण विश्वासानं मूर्तीच्या पुढं उभा राहतो. त्याच्या शरीरानं मूर्ती सारी झाकून टाकली आहे. तो प्रथम वंदन करतो. ] तुमचा हा शिष्य [ पायावरची पानंफुलं दूर करतो. ] तुमच्या रक्षणाला नाही समर्थ ठरला. [ हातावरची पानं काढतो. ] कालचं निर्माल्य काढायचंच राहिलं...अन् सकाळी माझ्या लक्षातही आलं नाही, त्याच्यावरच फुलं घालतोय म्हणून ! दहाबारा वर्षांच्या

भक्तीचंच निर्माल्य व्हायची पाळी आलीय्...माझ्याच हातांनी तुमचे हात उघडे केले ! [ खांद्यावरची पानं काढतो. ] खांद्यावर घेतलेल्या अज्ञान बालकासारखं माझं ओझं इतके दिवस वागवलंत...[ हातांच्या कोपरातली फुलं काढतो. ] या तुमच्या हृदयात मला स्थान दिलंत, [ गळ्यातला एक हार काढतो. ] ही तुमची कंठनाल तोडायला निघालाय तो ! हा दुष्टावा कां ? गुरू तो गुरू, त्याचा तो माझा अन् माझा तो त्याचा ! पण त्याला नाही हे पटत. आणि मीही एवढी विद्या शिकलो त्यात तुमच्या रक्षणाची विद्या नाही विचारली. पण तिची गरजच नव्हती. [ अर्जुन सज्य होत आहे. कंठाखालचा भाग उघडा झाला आहे. ] जो स्वतःच धाता त्याला कोण घडवणार ? जो साऱ्यांचा त्राता त्याच्या रक्षणाला दुसरा कुणी कशाला ? या अहंकारी तिरंदाजाला एकदा कळू दे की त्याचाच गुरू काही जगश्रेष्ठ नाही...[ मूर्तीच्या जटाभाराच्या गाठीत गुंतवलेल्या दोन हारांचं आच्छादन साऱ्या मुखावर असतं ते उचलल्यावर ] याच ना मुखातून सारी विद्या दिलीत, आचार्य...[ भान हरपून हारासकट खाली कोसळतो. ]

अर्जुन : [ भासपक्षी उडवायला उभा राहिला होता तसाच एकाग्र. उघड्या मूर्तीच्या मुखाकडं पाहतो. हातपाय थरथर कापू लागतात, घाम येतो.... धनुष्य हातचे गळून पडते... ] काय ? ! ?

दुर्यो. : [ डोळे मोठे होतात. शिरा फुगतात. चेहऱ्यावर चीड, संताप वगैरे. ] कोण ?

अश्व. : [ आश्चर्य. ] इथं कसे ?

बाहुक : आँ....

[ पडदा ]

## अंक तिसरा
### प्रवेश दुसरा

[ द्रोणाचार्यांची कुटी मागच्या बाजूला. तिचा परिसर गेल्या दहा बारा वर्षांत पार बदलला आहे. कुटी तीच पण तिच्यावर छप्पर नव्यानं शाकारलेलं. पूर्वी जिथं भरड जमीन होती तिथं आता छानशी हिरवळ आणि बाग आहे. त्यांच्या शिष्यांनी जोपासलेली. त्या जुन्या लिंबाच्या खोडाभोवती एक पारसुद्धा आला आहे. आत्ता फावल्या वेळात द्रोण बागेत जुजबी सफाई करीत आहेत. त्यांच्या शरीरावर वर्षांच्या खुणा. ]

**द्रोणाचार्य :** [ खाली वाकून वाळली पानं उचलतात आणि ढिगाऱ्यात टाकतात. ] पिकल्या पानांचा हा ढीग. काळसुद्धा असाच पिकली पानं वेचतो आणि घेऊन जातो. [ ताठपणं ] पण झाडं कायम राहतात. नवे धुमारे फुटतच राहतात. ही काय ! मी नको नको म्हणत होतो तर माझ्या शिष्यांनी लावली. पाणी घालून एकेकानं एकेक वाढवली... हे अर्जुनानं लावलेलं. ही कल्पनाच मुळी त्याची. मी सांगत होतो– अरे, मला तापसाला काय कराचीय बाग ? पण या पोरांनी जणू कटच केला. सुयोधनाचं न् भीमाचंसुद्धा एकमत झालं... कशी आवडीनं खपली पोरं सारी !... दहा बारा वर्षं हा हा म्हणता गेली... मी गेलो पिकलं पान होत– पण इकडं ही ऽ झाडं वाढली, द्रोणाच्या विद्येची बाग एकशे सहा झाडांनी भरली ! काळावर ही मातच झाली. माझी सेना उभी राहिली. कोरड्या विहिरीतली विटी काढता येत नव्हती– ती मकराच्या दाढेतलं माणिक काढायला समर्थ झाली. [ झाडावरून एक कोळिष्टक काढतात. ] यथोर्णनाभिः । कोळी जसा आपल्या अंगातून धागे काढून जाळं विणतो– तसं माझ्या विद्येतून काढलेलं हे सेनाजाल ! हे माझे वीर द्रुपदाच्या नुसते समोर गेले तर त्याचं भुभुःकार करणारं तोंड माझ्या नुसत्या इच्छेसाठी आपल्या अमोघ बाणांनी बंद करतील. त्याला मात्र जिवंत ठेवतील. कारण, तो सारा अवमान त्याला भोगता आला पाहिजे. माझ्या डोळ्यांदेखत ! [ खाली बसतात. चिमटीनं तण उपटतात. ] अस्माकमेवायं विजयो... तस्मै तृणं निदधौ–

[ चेहरा खिन्न आणि क्षुब्ध असलेला अर्जुन कुटीकडं येत आहे. आचार्यांना हिरवळीवर पाहून तिकडे वळतो. ]

अर्जुन : [ प्रणाम करून उभा राहतो. ]
द्रोण. : [ एकदाच वर पाहतात. ] कोण, अर्जुन ? कधी रे आलास परत ?
अर्जुन : आजच आलो आचार्य.
द्रोण. : तू एकटाच की सारेच जण ?
अर्जुन : सारेच जण.
द्रोण. : का रे ? आठपंधरा दिवस ना राहणार होतात ? चारच दिवसांत माघारी काय आलात ? जनावर तर नाही ना अंगाशिंगावर आलं कुणाच्या ?
अर्जुन : नाही आचार्य.
द्रोण. : मग हरकत नाही. कुत्रे होतेच म्हणा तुमच्याबरोबर. सारे खुशाल आहात ना ! गुरुकुलातून घरी जायचे दिवस आले तुमचे ! सरतेशेवटी गालबोट नको लागायला. बरं, मग शिकार कशी काय झाली ऽ ऽ ?
अर्जुन : विशेष सांगण्यासारखं काही नाही आचार्य.
द्रोण. : [ अर्जुनाचा चेहरा उतरल्याकडे त्यांचे लक्षच गेलेले नाही. ते तणबीण काढण्याच्याच नादात आहेत. ] अर्जुना, विनय विद्यार्थ्याला शोभतो ऽ ...पण आता कसला विनय प्रत्येक गोष्टीत ? अरे, बरोबरीला आलात तुम्ही मुलं आमच्या. एकदा हा दीक्षान्ताचा विधी संपला न् तुम्ही घरी गेलात की हा आश्रम खायला उठेल मला ! मनाशी एवढंच म्हणत असेन की माझा प्रियतम शिष्य साऱ्या जगाला अजिंक्य होऊन राहिला आहे. त्याला वरचढ, जगात दुसरा नाही... [ हातातला तणाचा मुटका टाकण्यासाठी उठतात तेव्हा जानवे डाव्या हाताला लागते. ] पहा : यज्ञोपवीतं परमं पवित्रं स्पृष्ट्वा सखे सत्यमिदं ब्रवीमि—
अर्जुन : [ नम्रपणे पण उद्वेगानं ] सत्य तसं नाही, आचार्य.
द्रोण. : [ चमकतात. चेहऱ्यावरचा मायाळूपणा जणू लुप्त होतो. मानाला जणू आव्हान मिळतं. ] सत्य तसं नाही ? माझा पट्टशिष्य, माझ्या अशेष विद्येचा वारस हे मला सांगतो ? हा द्रोण म्हातारपणी असत्यभाषी झाला ?
अर्जुन : [ हे सारे अपेक्षित असल्याप्रमाणंच, न गोंधळता उभा राहतो. ] क्षमा असावी, आचार्य; तुमच्या नावाच्या जोडीनं असत्य हा शब्द नुसता मनात आला तरी माझी जीभ झडून जाईल — तो उच्चारायला ती शिल्लकच कुठून राहील ?
द्रोण. : [ थोडे शांत होऊन ] मग, ते...सत्य नाही ते काय ?
अर्जुन : आचार्य,...[ थांबतो. आवंढा गिळतो. गुरुभक्तीचा उमाळा त्याला क्षणभर बोलू देत नाही. ] आचार्य, मी कसं सांगू ! तुमच्यासमोर नसे तेव्हा मलाही तुम्ही म्हणालात तसंच वाटत असे. [ थांबतो. ] आता मात्र कळून आलंय की माझ्याही वरचढ धनुर्धर आहे, की मी आचार्यांच्या अशेष विद्येचा वारस नाहीय्.
द्रोण. : [ त्याचा आशय न समजून ] याचा अर्थ असा की : मी सत्य बोलतो पण खरं

सांगत नाही. की मी विद्या देतो पण हातची राखूनही ठेवतो! [ व्यथित ] अर्जुना, दीक्षान्ताच्या प्रसंगानं, पट्टशिष्यानं गुरूला हेच प्रमाणपत्र द्यावं ना!

अर्जुन : [ भांबावतो ] नाही नाही, आचार्य! ज्यांच्या प्रेमाचं ऋण पंचप्राणावर तुळशिपत्र ठेवूनही फेडता येणार नाही त्यांना असलं प्रमाणपत्र मी देईन? आचार्य, मला क्षमा करा. [ त्यांचे पाय धरतो. ] कसं सांगावं मला कळत नाही! [ द्रोण त्याला उठवतात. ]

द्रोण. : ऊठ. मी काही रागावलो नाही तुझ्यावर. काय झालं सांग.

अर्जुन : आचार्य, तुम्ही विचारलंत, शिकारीहून परत का आलो? काय सांगू! माझ्या साऱ्या मानाचीच शिकार झाली तिथं!

द्रोण. : अर्जुना, तू माझा बहिश्चर प्राण! तुझी शिकार ती माझीच शिकार! असा कोण शिकारी जगात आहे सांग!

अर्जुन : तेच तर कोडं आहे आचार्य! तो शिकार करतो माझी आणि म्हणतो मात्र की हा बळी वहायचा तो तुमच्या पायावर! अर्जुनाचा अपमान तो इथं आचार्यांचा मान!

द्रोण. : अर्जुना, पुरे पुरे. सूर्य पश्चिमेला उगवला असंच सांगतोयस तू.

अर्जुन : नाही, नाही आचार्य. सूर्यनारायण उगवतो पूर्वेलाच, पण त्याचा प्रकाश मात्र कुणाला कमी, कुणाला जास्ती मिळतोच ना! तुमच्या या पट्टशिष्याहूनही सरस असा तुमचा आणखी कुणी शिष्य नसेलच का?

द्रोण. : अर्जुना, पोटच्या पोराला बाजूला करून तुझ्यावर माझ्या विद्येचा वर्षाव केला तरी तुला अजूनही शंका येतेच ना? तुझ्याहून सरस धनुर्धर या पृथ्वीतलावर दुसरा असणार नाही हा माझा आशीर्वाद विसरलास काय?

अर्जुन : [ गंभीरपणे ] आचार्य, मी तो विसरलो नाही म्हणूनच तर... असा एक धनुर्धर भेटला, तेव्हा... तुमचा शब्द फोल गेला काय असं वाटलं आणि तडफड झाली मनाची! असं वाटलं की... [ घुटमळतो. ]

द्रोण. : सांग, सांग काय वाटलं ते! या द्रोणाचा शऽर आणि शब्द कधी फोल होणार नाही!

अर्जुन : [ तशाही स्थितीत उत्साह वाटून ] म्हणूनच असं वाटलं की, आचार्यांनी अलगद त्याचं विद्याहरण करावं!

[ क्षुब्ध असलेला दुर्योधन झपाझपा पावलं टाकीत प्रवेशतो. त्याच्या कानी हे शब्द पडतात. तो आचार्यांना घाईनं प्रणाम करतो. ]

दुर्यो. : ते का? तुझं गर्वभरण करण्यासाठी? मनगटात जोर असला तर आणावं की त्याला शरण! कदिच्छित आपलं अन् ते पुरवायचं आचार्यांच्याकडून! खासा न्याय. उद्या लोक आचार्यांनाच नावं ठेवतील द्रोहाचार्य म्हणून! तुला काय त्याचं म्हणा.

द्रोण. : शिष्यापराधे गुरोर्दण्डः। यांचं गौडबंगाल काही कळत नाही, माझ्यावर मात्र मानार्थ उपाधींचा वर्षाव चाललाय. [ युधिष्ठिर येतो : प्रणाम करतो.] बरा वेळेवर आलास युधिष्ठिरा; ही काय भानगड आहे सारी कळू दे तरी! कोण हा धनुर्धर भेटला तुम्हाला, अन् त्याच्या आडून का हे शरसंधान चाललंय माझ्यावर?

अर्जुन दुर्यो. : शरसंधान कसलं आचार्य!

द्रोण. : तेच ते. बरं, तुमचं राहूद्या. युधिष्ठिरा, आता तूही नमनाला घडाभर तेल जाळीत बसू नकोस!

युधि. : सांगतो आचार्य. आम्ही गेलो त्याच्या दुसऱ्याच दिवशी आपला बाहुक त्याचा शिकारी कुत्रा घेऊन परत आला. त्या कुत्र्याच्या तोंडात होते सात बाण, सात दिशांकडचे. पण मारलेले अशा कौशल्यानं की कुत्र्याला खातापिता तर यावं पण भुंकता मात्र येऊ नये.

द्रोण. : खरंच कौशल्य! मलासुद्धा जमायचं नाही असं!

अर्जुन : म्हणून तर मी म्हणतो आचार्य, तो सरस आहे म्हणून. मला तर सरळ सांगायचं म्हणजे त्याचा हेवा वाटला.

दुर्यो. : [ उपरोधिक स्वरात ] अन् मग लगेच त्याच्याशी उभा दावा धरला!

युधि. : [ तिकडे लक्ष न देता ] हा चमत्कार पाहून अर्जुनाला नि सुयोधनाला मोठं आश्चर्य वाटलं.

दुर्यो. : [ तुटकपणे ] आपल्याला काही आश्चर्य वाटलं नाही! येतात कुणाकुणाला असल्या कल्पना.

युधि. : [ आपली साखळी न तोडता ] अन् दोघंही बाहुकाला घेऊन शोध करायला गेले. धनुष्यबाणाच्या खुणेवरनं पाहिलं तर शेजारीच एक काळाकभिन्न युवक भान हरपून पानाफुलांनी झाकलेल्या मूर्तीसमोर पडलेला होता. यांनी त्याला छेडलं तर त्यानं सहजच सांगितलं, की कुत्र्याला बाण मीच मारले म्हणून!

द्रोण. : मग त्याला पकडून आणायचा.

युधि. : पण, अर्जुनाचं न् त्याचं वेगळंच बोलणं निघालं! तो युवक म्हणाला की, ही मूर्ती हाच माझा गुरू, आणि तो तुझ्या गुरूइतकाच खरा आहे! अर्जुनाला हा तुमचा अपमान वाटला...

दुर्यो. : नको तिथं अभिमान दाखवायची सवयच त्याला.

द्रोण. : [ कडकपणे ] सुयोधना, ऐकू तरी देशील जरा! फुकाच्या अहंकारापेक्षा गुरू-विषयी अभिमान लाख पटींनी बरा.

युधि. : [ पहिल्याच सुरात ] आणि तो म्हणाला, 'थांब, तुझ्या गुरूचा प्रथम समाचार घेतो. माझ्या बाणानं तुझ्या गुरूची कंठनाल छेदतो.'

द्रोण. : नुसत्या शब्दांच्या बाणांनी जे खऱ्या गुरूचे प्राण कंठाशी आणतात, त्यांना खऱ्या बाणानं खोट्या गुरूची कंठनाल छेदणं काय कठीण !

युधि. : [ किंचित चमकतो; पण पुन्हा त्याच सुरात ] तो म्हणाला, थांब पानंफुलं काढतो. अर्जुन राहिला उभा धनुष्यबाण सज्ज करून.

दुर्यो. : त्याला वाटलं भासाचा डोळाच उडवायचाय.

युधि. : परंतु आचार्य, मूर्तीवरचं सारं निर्माल्य दूर करून तिकडं तो कृष्णांग मीतीनं की काय खाली कोसळला आणि इकडं अर्जुनाला कापरं भरलं, घाम आला, अंगावर काटा आला आणि त्याचं धनुष्यही हातातून गळून पडलं.

द्रोण. : अर्जुना, असं कसं झालं ? काय कश्मल तुझ्या मनात उपस्थित झालं ?

अर्जुन : [ हात जोडून ] आचार्य, पूजार्ह गुरुंवर बाण कसे सोडावेत ?

द्रोण. : मातीची मूर्ती पूजार्ह गुरू ?

युधि. : [ सूर पहिलाच ] कारण, आचार्य, ती मूर्ती तुमचीच होती !

द्रोण. : माझी मूर्ती ?

युधि. : होय आचार्य. आणि तो म्हणाला, याच मूर्तीपाशी मी शिकलो !

द्रोण. : मी जिवंत असताना, माझ्या मूर्तीपाशी शिकण्याचं काय कारण ? अरे, माझ्याकडं आला असता तर मी काय शिकवलं नसतं त्याला ?

दुर्यो. : पंचाईत झाली असती फक्त अर्जुनाची.

अर्जुन : का ऽ ऽ ?

दुर्यो. : हेवा ऽ ऽ दुसरं काय ! आपल्या पुढं कोणी गेला, हा हेवा पोटात दुखायला लावतो ना !

द्रोण. : सुयोधना,

दुर्यो. : आचार्य, क्षमा करा. पण कधीकधी वाटतं, मला सुयोधन कुणी म्हणूच नये. मी दुर्योधनच राहावा. माझ्याशी लढणं त्या काळ्या युवकालासुद्धा दुर्घट व्हावं.

द्रोण. : अरे, तुम्ही माझे प्रत्यक्ष शिष्य, त्या दूरान्वयी शिष्याच्या मापानं स्वतःला मोजताय तरी का ?

दुर्यो. : मी कुठं ? तो अर्जुनाचा व्यापार ! नुसतं गुरुकृपेचं ढळतं माप घेऊन समाधान नाही होत त्याचं !

युधि. : सुयोधना, ढळतं माप कसलं ? गुरुकृपा पाण्यासारखी असते. घेणारा आपली उंची जितकी कमी करील तितकी ती अधिक वेगानं त्याच्याकडं धावते.

दुर्यो. : असं असतं ना, तर नारळात पाणी अन् काडेचिराइताला कोरडे काटे असं कधी झालंच नसतं. पण जाऊंदे. दृष्टांत सारे एकदेशी असतात. प्रत्यक्षात काय आहे ते पाहा. आचार्यांच्या चांगुलपणानं हा अर्जुन एवढा लाडावला आहे की, त्याच्या लहरीसाठी दुसऱ्याचं वाटोळं करायला त्याला काहीच वाटत नाहीय.

अर्जुन : तुला तसं वाटणारच ! तुझ्या मनात नुसता मीकार भरला आहे. आचार्यांना गुरू

मानतोस हे भाग्य ! मी स्वतःला अर्जुन समजतच नाही. द्रोणशिष्य हे एकच माझं अभिधान. त्यांचा शब्द कुठं फोल होत असला, त्यांच्या नावानं कुणी चेष्टा करत असला तर ते मला सहन होत नाही. म्हणून मी आचार्यांना नुसतं सांगायला आलो. मला माहीत आहे त्या भास पक्ष्याचा डोळा मी उडवल्यापासून तू माझा दुःस्वास करतोयस.

दुर्यो. : दुःस्वास काय करायचाच ? अन् तुझा ! तू समज स्वतःला अद्वितीय ! आचार्यांनी मला बाण मारू दिला असता तर मीसुद्धा भासाचा डोळा उडवला असता. पण आचार्यांनी तुला सोडून साऱ्यांना नुसते प्रश्नच विचारले ! 'तुम्ही दिसता', 'झाड दिसते', 'पक्षी दिसतो' एवढी उत्तरं झाली की आम्हाला मुळी परतच पाठवलं !

युधि. : मग ? ते योग्यच होतं की ! मला पटलं नंतर की आपल्यानं काही तो डोळा उडाला नसता.

दुर्यो. : तू नावाचा युधिष्ठिर, पण आहेस बुद्धिमंद ! तुझं कशाला सांगतोस ? माझी मला खात्री आहे ना. सारं कचकचीत पाहूनसुद्धा माझ्या बाणाचा नेम चुकला नसता ! ते जाऊ दे आता. तेव्हाचपासून स्वतःला आचार्यांचा दक्षिणहस्त समजतो ना हा द्रोणशिष्य ? मग आता त्यांना गुरुदक्षिणा द्यायची सोडून भिकणं मागायला का आला आहे ?

द्रोण. : सुयोधना, भीष्मपितामहांकडून वेतन मिळतंय ते पुरे आहे मला. गुरुदक्षिणेचं बघू पुढं. वादावादी राहूद्यात. ज्याच्यामुळं हे सारं प्रकरण उद्भवलंय त्याची चौकशी तरी करूयात. चला.

दुर्यो. : ती मी करवून घेतलीय, आचार्य. हा खुळा नुसताच घाम फुटून परत आला. मी नंतर एक दूत पाठवून सारी माहिती काढली त्याची. तो आहे मूळचा निषाद. सध्या 'मी माणूस आहे', 'विद्येचा पाईक आहे' असलंच काय काय बोलत असतो. बरीच वर्षे राहिलाय धनुर्विद्या शिकत. कशासाठी ते सांगत नाही. पण मी आपलं पुढल्या धोरणानं सुचवलं की आमच्या बाजूला आलास तर एखाद्या मंडलाचा सामंत म्हणून अधिकारसुद्धा देऊ तुला. आता नाहीच म्हणतोय पण दोनचार महिन्यांत होईल तयार ! तुम्ही कशाला जायचं करता त्याच्याकडं, आचार्य ! उगीच महत्त्व वाढवल्यासारखं होतं त्याचं !

द्रोण. : सुयोधना, माझी ना मूर्ती करून शिकलाय तो. एवढा पारंगत होऊन, ज्याचं कधी तोंड पाहिलं नाही त्याचं गुरुपद सांगतो ! क्वचितच आढळतो एवढा मनाचा मोठेपणा ! अन् त्याची विद्यार्जनाची पद्धत तरी काय पाहू ! विद्येच्या क्षेत्रात मोठा कसला न् लहान कसला ? चला.

[ पडदा ]

## अंक तिसरा
### प्रवेश तिसरा

[ एकलव्याचे विद्या-स्थान. एकलव्य गुरुमूर्तीच्या आसपास वावरत आहे. आज त्याची बैठकीची जागा झाडून साफ केलेली नाही. पानपाचोळा पडलेला आहे. सकाळचं कोवळं ऊन मूर्तीच्या अंगावर पडलं आहे.

एकलव्याला स्फूर्ती देणारा सुळका आणि तो ज्या झाडाखाली अध्ययन करीत असतो ते झाड यांच्यामधल्या भूमीवरून वंचर पूर्वी आपल्या देशाला परत गेला होता. आता तिकडूनच काही अंतरावरून हळी ऐकू येते: "एकल्वा ऽ ऽ" अशी. एकलव्य थोडा वेळ कान देतो. पुन्हा अगदी जवळून वंचराचा आवाज: "एकल्वा ऽ मी आलो रे.... " ]

**एकलव्य :** [ हर्षभरित ] वंचर ! ! [ मान वळवतो आणि धावत जातो. वंचर जागीच थांबतो. दोघे एकमेकांना मिठी मारतात. वंचराचे डोळे भरलेले. त्याला शब्द फुटत नाही. तो नुसताच एकलव्याच्या पाठीवर हात फिरवीत राहतो. ]

**एक. :** [ बोलण्याची सुरुवात करतो. ] वंचरा ! नेमका कसा वेळेवर आलास रे ! स्वप्न पडलं का काय तुला ? मी खरंच निघत होतो.

**वंचर :** [ तळहाताच्या मागच्या बाजूनं डोळे पुसतो. ] निघत होतास ? चल चल, पाखरासारखी वाट पाहतायत सारी तुझी. बारा वर्षं झाली पोरा !

**एक. :** आई, बाबा बरे आहेत ना रे !

**वंचर :** होय, होय ! हिरंधनूनं माझ्यामागं केव्हाचा नेट लावलाय पोराला घेऊन ये म्हणून. चल बघू. ह्याच पावली निघू !

**एक. :** अरे, इतक्या लांबून आलायस. तुला द्यायचं तर पाणीसुद्धा आणलेलं नाही आज ! थांब थोडासा. [ त्याच्यासाठी बसण्याची जागा साफ करतो. ] बारा वर्षांच्या माझ्या घरट्यात पाहुणचार तरी घे जरासा ! आलोच बघ मी. [ गडबडीनं घडा उचलतो. तो धक्का लागून फुटतो. ] हात... फुटला बघ. त्यालासुद्धा कळलं, आता आपला काही उपयोग नाही ! राहू दे. मी आणतो पाणी. [ धावत जातो. ]

**वंचर :** [ कौतुकानं त्याच्याकडं पाहतो. ] अजून तस्साच ! त्या दिवशी, असाच पळत गेला अन् मातीचा गोळा घेऊन आला ! हा गुरू घडवायला. [ मूर्तीकडं बघतो. ]

पहिल्यासारखाच आहेस. माझे केस पांढरे झाले, एकलव्याच्या चेहऱ्यावर रान वाढलं— आवाजावर ओळखला तुसऱ्या— तू मात्र जसाच्या तसाच हां. का बदललास ? पुन्हा कधी ज्जा नाही ना म्हणालास ? पण शाबास तुझीसुद्धा हां. माझ्या एकलव्याची सोबत केलीस. अन् शिकवलंस का रे सारं त्याच्या मनाजोगतं ? [ दगडांचे ढीग, बाण घासण्याचा निसणा, वगैरे गोष्टी क्रमानं पाहतो. ] ढीग कशाचे हे ?... कळलं, सालासालाचा एक ढीग ! मातीचा गुरु, खडयांची गणती, पानापाचोळ्याचा बिछाना ! कसा राहिला असेल पोर ! आता सुखरूप घरी नेला की सुटलो काळजीतून. निसण्या, केवढा खळगा पडलाय बघ तुझ्या पोटात ! बाण खाऊनसुद्धा पोट नाही भरलं का ? पण कशावर मारले रे बाण ? त्याला तर माणसावर मारायला शिकायचं होतं. ह्या रानात कोण यायला बसलंय ! मीच आलोय तर पाणीसुद्धा नाही !... अजून कसा येईना हा ? बघतो तरी, [ उठतो. आळस देतो. तेवढ्यात एकलव्य येताना दिसतो. तो हातातला पाण्याचा द्रोण वंचराला देतो. ]

वंचर : वा ! तुझा गुरू आपल्याला पाणी पाजणार हां आता. [ हसतो. ]

एक. : माझा गुरू विद्या पाजतो, पाणी नाही !

वंचर : अरे, तो नाही येड्या. हा. [ द्रोण थोडा वर उचलून दाखवतो. ] नुसता बघ, नाही तर पाया पडशील त्याच्या ! [ हातातल्या द्रोणाचा काटा त्याच्या उजव्या अंगठ्याला टोचतो. ] अरारारा... अंगठा उडवला बघ त्यानं... मोठा तिरकस रे तुझा गुरू ! [ अंगठा तोंडात घालतो. ]

एक. : [ आत्तासा डोक्यात प्रकाश पडतो. तो हसतो. ] कळलं ! कर चेष्टा ! पण माझी कर ! गुरूची नको. [ गंभीर होतो. ] तुला माहीत नाही. माझा गुरू [ मूर्तीकडं पाहतो ] माझा पाठीराखा आहे. त्याची कृपा नसती तर आज कसला निभतो मी ! आणखी किती वर्षं राहावं लागलं असतं कुणास ठाऊक !

वंचर : ए बाबा, तू नीघ बघू. आणखी राहायची बात नको. इथं बसायचं गळ्यात येईल वाटतं ! जागेचा गुणच वाईट दिसतोय ह्या.

एक. : अरे ऐक तरी. सगळी ऽ विद्या झाली माझी. गुरूनं नुसतं शिकवलंच नाही, कसाला पण लावलं. कसोटीला उतरवलं. माझी खात्री पटवली.

वंचर : काय खात्री पटवली ?

एक. : [ सानंद अभिमानानं ] की मी त्याचा सगळ्यात लाडका शिष्य आहे. अगदी त्याच्या लाडक्या शिष्याहूनही लाडका. आणखी मला त्यानी सगळ्यांहून जास्त विद्या दिलीय.

वंचर : मग आता दक्षणा मागायला कंदी येणार ?

एक. : [ रोषानं ] साऽरखा जिभेला काटे लावूनच बोलतोयस. त्याला दक्षिणा नको, वेतन नको, नुस्ती भक्ती पाहिजे बघ. तेवढी मिळाली की आपलं काळीजसुद्धा

घायला तयार आहे तो ! अन् माझ्याभंवती पाखर आहे त्याची ! परवाच बघ ना, इतक्या वर्षांत पहिल्यानिच इतकेजण आले.

वंचर : मग झाली वाटतं चकमक तुमची ?

एक. : चकमक कसली आलीय्. परवा तेरवा काय झालं मी आपला गुरुसमोर ध्यान करीत होतो. तर एक कुत्रं त्या तिकडं सारखं भा भो करीत बसलं. मनातल्या मनात कितीदा म्हटलं त्याला गप् गप् म्हणून. जाईच ना. [ वंचर हसतो. ] गुरूचा आदेश आला अन् सोडले इथूनच सात बाण. मग थांबलं भुंकायचं. ते होतं वाटतं कुरूंचं. दुसऱ्या दिवशी आले सगळे मिळून. अन् लागले धमक्या द्यायला– चेटूक शिकवणाऱ्या तुझ्या गुरूचा काटाच काढतो म्हणून. मी म्हटलं, चल मार बाण. माझा गुरू समर्थ आहे. ( मूर्तीकडं भक्तिभावानं पाहतो. ) माझी लागली तन्द्री – पुन्हा भानावर येऊन पाहतो तर काय : कुणीच नाही ! अगदी स्वप्नातल्यागत बघ !

वंचर : त्यांना सांगायचंस ना तुमचा न् माझा गुरू एकच आहे म्हणून. तो जाडा भीमा का भीम्या तो पण आला होता का रे ?

एक. : अरे, तुला खरं वाटायचं नाही, मी त्या सगळ्यांना पार विसरून गेलो होतो. मला ते ओळखू पण आले नाहीत.

वंचर : मग तुला कळलं तरी कधी की हे कुरूच म्हणून ?

एक. : [ उद्वेगानं ] काय त्यांची दानत बघ. तिसऱ्या प्रहरी एक दूत आला माझ्याकडं. सगळं विचारलंन. मग म्हणतो, राजकुमार युवराज दुर्योधनांच्या निर्देशावरून मी आपणास निवेदन करू इच्छितो की–

वंचर : सरळ बोल रे बाबा. असं नको डोक्यावर टप्पू मारल्यागत.

एक. : [ हसून ] काय तर म्हणे दुर्योधनाला माझं कसब फार आवडलं. मला तो अभिषेक करून ससकांचा राजा करील.

वंचर : अन् त्याचं काम झालं की घरादारावर पाणी सोडायला लावील. सांगितलं नाहीस का त्याला की आम्हाला नाही लागत ते बुडकुलंभर पाणी म्हणून ? अन् तुझा बाप तुला राजा करायला उतावळा झालाय तिकडं. हक्काचं सोडून भिकेचं मागायला आम्ही काही आर्य नाहीत म्हणावं.

एक. : जाऊ दे रे, तारतोस कशाला ? मी काय त्याच्याकडं निघालोय का ? कालच मला इकडून [ छातीकडं बोट ] सांगी झाली : ‘ सगळं सुफळ झालं. आता नीघ इथून. काम संपल्यावर पळभर राहू नको. ’

वंचर : तुझा तूच निघालास म्हणून बरं. नाहीतर पुन्हा विनवण्या कराव्या लागल्या असत्या तुझ्या ! झालंय ना तुझं सारं ! मग चल. [ मूर्तीकडं पाहतो. ] याला राहु दे मला वाटतं इथंच.

एक. : नाही हां. माझा गुरू माझ्याच सवे. बारा वर्षं माझी सोबत केली, त्याला एकटा

ठेवू काय ? एकदा वाटलं होतं सरळ गुरूलाच आश्रमात जाऊन भेटावं, आशीर्वाद घ्यावा, अन् म्हणावं विद्या मिळाली मला. पण विचार केला : माझा खरा गुरू हा मातीचाच, तो हाडामासाचा नव्हे. कारण, या गुरूला मी तेवढा कळतो. त्या जिवंत गुरूला आणखी किती क्यादी ! आता बारा वर्षांनी तो मला ओळखतोय का नाही काय माहीत. ओळखलं तरी मी निषाद म्हणून मला काही तो जवळ करणार नाही. जवळ केलं तरी त्याची माया याच्यासारखी सारीच्या सारी माझ्या वाट्याला थोडीच येणार ? चल, आपण त्याच्याकडं जाण्यापेक्षा यालाच आपल्या देशाला नेऊ या !

[ पडद्यात आवाज येतात :

' इकडेच आचार्य. आलोच आपण. '

' युधिष्ठिरा, पुढं का होत नाहीस ? '

' सुयोधना, निषादाला... ' ]

वंचर : [ दचकतो. ] एकलव्या, निषाद बिषाद काहीतरी बोलतायत. तुझ्याकडंच येतायत वाटतं. धनुष्यबाण घे तो. माणसं मारायच्या विद्येत तयार झाला असशील ना आता ? बघू तुझं कसब तरी !

[ एकलव्य धनुष्याकडं अजाणताच जातो. तो पाठमोरा असतो तेवढ्यात अर्जुन आणि द्रोणाचार्य तिथं पोचतात. मागून दुर्योधन, युधिष्ठिर. ]

अर्जुन : हाच तो !

[ एकलव्य धनुष्य घेऊन त्यांच्याकडं तोंड करून उभा राहतो. अर्जुनाची ओळख पटून मान खालीवर हालवून तो आपली भावना काहीशी व्यक्त करतो. शेजारच्या द्रोणाचार्यांची ओळख त्याला लागलीच पटत नाही. पण एकदोन क्षणांनंतर ती पटते आणि त्याला सात्त्विक भावांचे भरते येते. धनुष्य सहजच बाजूला पडते. ]

एक. : आचार्य ? ! [ त्यांच्या पायाशी पडतो. द्रोणाचार्य केवळ प्रतिक्षिप्त क्रियेनं निषादाचा स्पर्श नको या भावनेनं झुणूकन मागे सरतात. तेवढ्यात आपल्याच मूर्तीवर त्यांची नजर जाते. ]

अर्जुन : ऊठ रे !

एक. : [ रोमांचित. उठून उभा राहतो. ] खरंच आलात तुम्ही आचार्य ! नाहीच राहवलं तुम्हाला. माझी कामना कळून आली नक्कीच तुम्हाला. नाहीतर मी तुमचा प्रियतम शिष्य तो काय ! [ अर्जुनाच्या मुद्रेवर बदल. ] काय उपहार द्यावा मी तुम्हाला ! मी हा असा भणंग ना ! पण जेव्हा द्यायला म्हणून काहीच नसतं तेव्हा द्यायचं फार सोपं असतं. आचार्य, हा तुमचा शिष्य साराच्या सारा तुमच्या चरणांवर वहात आहे. याचा स्वीकार करा.

द्रोण. : [ या उमाळ्यानं काहीसे बावरतात. क्षणभर थांबून ] निषादा, ऊठ बरं...

[ थांबतात. एकलव्य उठतो. ]

द्यायला तयार आहे तो ! अन् माझ्याभंवती पाखर आहे त्याची ! परवाच बघ ना, इतक्या वर्षांत पहिल्यानिच इतकेजण आले.

वंचर : मग झाली वाटतं चकमक तुमची ?

एक. : चकमक कसली आलीय्. परवा तेरवा काय झालं मी आपला गुरूसमोर ध्यान करीत होतो. तर एक कुत्रं त्या तिकडं सारखं भो भो करीत असलं. मनातल्या मनात कितीदा म्हटलं त्याला गप् गप् म्हणून. जाईच ना. [ वंचर हसतो. ] गुरूचा आदेश आला अन् सोडले इथूनच सात बाण. मग थांबलं भुंकायचं. ते होतं वाटतं कुरूंचं. दुसऱ्या दिवशी आले सगळे मिळून. अन् लागले धमक्या द्यायला— चेट्क शिकवणाऱ्या तुझ्या गुरूचा काटाच काढतो म्हणून. मी म्हटले, चल मार बाण. माझा गुरू समर्थ आहे. ( मूर्तीकडं भक्तिभावानं पाहतो. ) माझी लागली तन्द्री -- पुन्हा भानावर येऊन पाहतो तर काय : कुणीच नाही ! अगदी स्वप्नातल्यागत बघ !

वंचर : त्यांना सांगायचंस ना तुमचा न् माझा गुरू एकच आहे म्हणून. तो जाडा भीमा का भीम्या तो पण आला होता का रे ?

एक. : अरे, तुला खरं वाटायचं नाही, मी त्या सगळ्यांना पार विसरून गेलो होतो. मला ते ओळखू पण आले नाहीत.

वंचर : मग तुला कळलं तरी कधी की हे कुरूच म्हणून ?

एक. : [ उद्वेगानं ] काय त्यांची दानत बघ. तिसऱ्या प्रहरी एक दूत आला माझ्याकडं. सगळं विचारलंन. मग म्हणतो, राजकुमार युवराज दुर्योधनांच्या निदेशावरून मी आपणास निवेदन करू इच्छितो की—

वंचर : सरळ बोल रे बाबा. असं नको डोक्यावर टप्पू मारल्यागत.

एक. : [ हसून ] काय तर म्हणे दुर्योधनाला माझं कसब फार आवडलं. मला तो अभिषेक करून सवकांचा राजा करील.

वंचर : अन् त्याचं काम झालं की घरादारावर पाणी सोडायला लावील. सांगितलं नाहीस का त्याला की आम्हाला नाही लागत ते बुटकुलंभर पाणी म्हणून ? अन् तुझा बाप तुला राजा करायला उतावळा झालाय तिकडं. हक्काचं सोडून भिकेचं मागायला आम्ही काही आर्य नाहीत म्हणावं.

एक. : जाऊ दे रे, तापतोस कशाला ? मी काय त्याच्याकडं निघालोय का ? कालच मला इकडून [ छातीकडं बोट ] सांगी झाली : 'सगळं सुफळ झालं. आता नीघ इथून. काम संपल्यावर पळभर राहू नको.'

वंचर : तुझा तूच निघालास म्हणून बरं. नाहीतर पुन्हा विनत्या कराव्या लागल्या असत्या तुझ्या ! झालंय ना तुझं सारं ! मग चल. [ मूर्तीकडं पाहतो. ] याला राहुदे मला वाटतं इथंच.

एक. : नाही हां. माझा गुरू माझ्याच सवे. बारा वर्षं माझी सोबत केली, त्याला एकटा

ठेवू काय? एकदा वाटलं होतं सरळ गुरूलाच आश्रमात जाऊन भेटावं, आशीर्वाद घ्यावा, अन् म्हणावं विद्या मिळाली मला. पण विचार केला : माझा खरा गुरू हा मातीचाच, तो हाडामासाचा नव्हे. कारण, या गुरूला मी तेवढा कळतो. त्या जिवंत गुरूला आणखी किती वयादी! आता बारा वर्षांनी तो मला ओळखतोय का नाही काय माहीत. ओळखलं तरी मी निषाद म्हणून मला काही तो जवळ करणार नाही. जवळ केलं तरी त्याची माया याच्यासारखी सारीच्या सारी माझ्या वाट्याला थोडीच येणार? चल, आपण त्याच्याकडं जाण्यापेक्षा यालाच आपल्या देशाला नेऊ या!

[ पडद्यात आवाज येतात :

' इकडेच आचार्य. आलोच आपण. '

' युधिष्ठिरा, पुढं का होत नाहीस? '

' सुयोधना, निषादाला... ' ]

वंचर : [ दचकतो. ] एकलव्या, निषाद बिषाद काहीतरी बोलतायत. तुझ्याकडंच येतायत वाटतं. धनुष्यबाण घे तो. माणसं मारायच्या विद्येत तयार झाला असशील ना आता? बघू तुझं कसब तरी!

[ एकलव्य धनुष्याकडं अजाणताच जातो. तो पाठमोरा असतो तेवढ्यात अर्जुन आणि द्रोणाचार्य तिथं पोचतात. मागून दुर्योधन, युधिष्ठिर. ]

अर्जुन : हाच तो!

[ एकलव्य धनुष्य घेऊन त्यांच्याकडं तोंड करून उभा राहतो. अर्जुनाची ओळख पटून मान खालीवर हालवून तो आपली भावना काहीशी व्यक्त करतो. शेजारच्या द्रोणाचार्यांची ओळख त्याला लागलीच पटत नाही. पण एकदोन क्षणांनंतर ती पटते आणि त्याला सात्त्विक भावांचे भरते येते. धनुष्य सहजच बाजूला पडते. ]

एक. : आचार्य?! [ त्यांच्या पायाशी पडतो. द्रोणाचार्य केवळ प्रतिक्षिप्त क्रियेनं निषादाचा स्पर्श नको या भावनेनं दुणकन मागे सरतात. तेवढ्यात आपल्याच मूर्तीवर त्यांची नजर जाते. ]

अर्जुन : ऊठ रे!

एक. : [ रोमांचित. उठून उभा राहतो. ] खरंच आलात तुम्ही आचार्य! नाहीच राहवलं तुम्हाला. माझी कामना कळून आली नक्कीच तुम्हाला. नाहीतर मी तुमचा प्रियतम शिष्य तो काय! [ अर्जुनाच्या मुद्रेवर बदल. ] काय उपहार द्यावा मी तुम्हाला! मी हा असा भणंग ना! पण जेव्हा द्यायला म्हणून काहीच नसतं तेव्हा द्यायचं फार सोपं असतं. आचार्य, हा तुमचा शिष्य साराच्या सारा तुमच्या चरणांवर वहात आहे. याचा स्वीकार करा.

द्रोण. : [ या उमाळ्यानं काहीसे बावरतात. क्षणभर थांबून ] निषादा, ऊठ बरं...

[ थांबतात. एकलव्य उठतो. ]

दुर्यो. : राजकुमारा, असल्या वाचिक उपहारानं कुणाचं समाधान होईल बरं ?

एक. : गुरुबंधो, हा काय नुसता वाचिक उपहार आहे? मनाच्या तळापासून दिलेला म्हणून मानसिक, वाचेनं दिलेला म्हणून वाचिक, अवघ्या शरीरानं पुरवायचा म्हणून कायिक असा हा त्रिविध उपहार आहे! सर्वस्वाचं सर्वस्वी दान आहे हे गुरुबंधो !

युधि. : मित्रा, तू आमचा गुरुबंधू आहेस की नाही हे आचार्यांनी ठरवायचंय, नाही का ?

एक. : एक आचार्य सोडले तर मला सारेच बंधू! हा कुलबंधू, तुम्ही गुरुबंधू!

अर्जुन : तू खूप आचार्यांना गुरू मानत असशील...

एक. : मानत असेन? आईला आई मानायची असते का? ती आई असते. तसंच हे नातं !

द्रोण. : एकाच बाजूनं मानून कसं ते नातं पुरं होईल?

वंचर : [या वादाला कंटाळून] गुरू रे ! बापाला बाप म्हणतोस ते मानूनच ना?

दुर्यो. : मूर्खा, अपमान करतोस असा ? तू आहेस तरी कोण ?

वंचर : सांगतो थांब. तेव्हा पण सांगितलं होतं. पण विसरला असशील. बारा वर्षं झाली ना!

द्रोण. : बारा वर्षं... ? [कुठंतरी स्मृतीच्या गाभाऱ्यात प्रकाश पडायला लागतो.]

एक. : वंचरा, गप्प रहा. आचार्य, तुम्हाला आठवतंय? बारा वर्षांपूर्वी एक निषाद राजकुमार तुमचा शिष्य होण्यासाठी आश्रमात आला होता. तुम्हाला तो आवडला म्हणून त्याला संस्कार केलात; पण संकल्प म्हणवून घेतलात आणि सारा घोटाळा झाला! तो निषाद, म्हणून विद्येला अनधिकारी, म्हणून तुम्ही त्याला जायला सांगितलंत— तोच मी... एकलव्य !

द्रोण. : एकलव्य! [स्तब्ध राहतात.]

अर्जुन : तो तू काय? तेव्हा शिष्य व्हायला अधिकारी नव्हतास तर आजही नाहीसच!

दुर्यो. : प्रत्यक्ष विद्या हस्तगत करूनच त्यानं आपला अधिकार सिद्ध केलाय ना!

युधि. : चुकतोस सुयोधना. चोरानं वस्तू लाटली म्हणून ती त्याची झाली काय? आणि घटकाभर झाली तरी धर्मदृष्ट्या तिच्यावर त्याचा अधिकार पोचत नाहीच.

अर्जुन : विशेषतः विद्येसारखं धन, आचार्यांना हवं त्यालाच प्राप्त होऊ शकतं! त्यांनीच याला अनधिकारी ठरवल्यावर—

एक. : नाही नाही गुरुबंधूंनो! आचार्य, तुम्ही तरी नाही मला वाऱ्यावर सोडणार! तुमचे ते शब्द मला सारखे आठवतात! 'तुला माणूस म्हणून विद्येचा पूर्ण अधिकार आहे, जा.' आणि तेच ते शब्द बोलताना जसे तुम्ही मला दिसलात तसेच मी या मूर्तीत साकार केले. तुमच्या पापण्यांच्या सावलीत बारा वर्षं काढली. तुमच्या विचारांच्या पाळण्यात अज्ञानाचा सज्ञान झालो. तुमच्या या मिटल्या ओठांतून विद्येची वीणा ऐकली. तुमच्या-माझ्यात भेद म्हणून उरला नाही. नुसतं स्मरण केलं की दिसत होतात, 'आचार्य' म्हणून हाक मारली की धावून येत

होतात– आज आलात तसेच... पण एकटे!

[ द्रोणांच्या चेहऱ्यावर हळूहळू गंभीरपणा, मग स्नेहमयता येऊ लागते; अर्जुनाला ती त्रोचक होते. ]

अर्जुन : म्हणजे, तू आचार्यांना वेठीला धरलंस! त्यांच्याकडून सेवा करून घेतलीस!

एक. : [ अभिमानानं ] का नाही? ती माझी गुरुमाउली, मी तिचा प्रियतम पुत्र!

[ द्रोणाचार्य पाणावू लागतात. अर्जुनाची तगमग वाढते. ]

अर्जुन : ऐका आचार्य, मी इतकंच म्हणालो होतो. त्याची प्रचीती आली ना?

द्रोण. : एकलव्या,

एक. : [ आनंदून ] अगदी अशीच हाक मारली होतीत तेव्हासुद्धा!

द्रोण. : एकलव्या, घटकाभर तुझं म्हणणं धरून चाललं, तर तू माझं मोठंच देणं लागतोस, नाही का?

एक. : केवढं तरी! न फिटण्यासारखं! मघाशीच नाही का मी म्हटलं, सर्वस्वाचं सर्वस्वी दान करतो म्हणून!

द्रोण. : [ गंभीर ] एकलव्या, जसा तू माझ्या नकळत मला शरण होतास ना, तसा मीही तुझ्या नकळत आणखी कुणाला शरण होतो. त्या माझ्या ऋणाची फेड तू करशील का?

एक. : अर्थात. आचार्य, ही तर सोन्याची संधी सायासाविना माझ्यावर चालून आली! थोडक्यात चुकामूक झाली असती! आम्ही दोघे हे निघालो होतो. पण जाण्याआधी द्विवारच कृतार्थता झाली होती ती त्रिवार व्हायची होती म्हणून थांबलो जणू!

द्रोण. : द्विवार– त्रिवार म्हणजे काय?

एक. : पहिल्यांदा कृतार्थ झालो तुम्ही विद्येला अधिकारी ठरवलंत तेव्हा. दुसऱ्यांदा, साऱ्या विद्येची समाप्ती झाल्यावर शिष्यवर अर्जुनापेक्षा मला श्रेष्ठ ठरवलंत तेव्हा!

द्रोण. : हेच ते. इथंच तू मला गोत्यात आणलंस! या अर्जुनानं त्याच्या शिष्यभावानं मला जणू विकत घेतलंय. त्याला मी वरदान दिलंय की या धरणीवर तुझ्याहून सरस धनुर्धर असणार नाही! आणि इथं, माझंच शिष्यपण सांगणारा तू त्याच्याहून सरस म्हणून कृतार्थ होतो आहेस!

एक. : आचार्य, तुमचा शब्द अबाधित राखण्यासाठी, याचं मोठेपण मानायलासुद्धा मी तयार आहे. त्यात काय मोठं? हा मी वचन देतो की, या माझ्या गुरुबंधूसमोर, धनुष्याला दोरी लावून मी कधी उभा राहणार नाही!

[ दुर्योधन सुस्कारा टाकतो. ]

अर्जुन : [ धोरणीपणानं ] निषादाच्या वचनाचा काय भरवसा!

[ एकलव्याच्या चेहऱ्यावर विषाद. ]

वंचर : [ उसळून ] तोंड संभाळून बोल! निषाद म्हणजे कोण वाटले तुला? एवढा वेळ

पोर जीव तोडून सांगतोय– त्याचाच भरवसा काय विचारतोय. चोर तो चोर, वर शिरजोर !

अर्जुन : [ कुद्ध्या रागानं ] चोर हा ! आचार्यांचा शिष्य म्हणवतोय ना ? वेतन का नाही देत मग ?

वंचर : वेतन मागतोय मोठा. [ उजव्या हाताचा अंगठा दाखवतो. ] घे वेतन !

अर्जुन : एवढा वचनाचा आहेस ना ? बरा अंगठा दाखवलास. धनुष्याची दोरी राहू दे लावलेली. अंगठाच दे.

वंचर : अंगठाच दे ! तोंड पसरून मागायला काही वाटतंय का तुला ?

द्रोण : [ अगतिकपणं सुस्कारा टाकतात. ]

एक. : वंचरा, मागू दे त्याला काहीही ! मी तर सर्वस्वच देऊन टाकलंय. आचार्य, तुम्ही नका मनाला लावून घेऊ. अर्जुना, मी शरण आहे तो आचार्यांना, तुला नव्हे. मी देत होतो ती गुरुदक्षिणा, वेतन नव्हे ! आईचं दूध प्यालो त्याचे रतिबाच्या भावानं पैसे द्यायचे ? आचार्यांचा सत्‌शिष्य म्हणवतोस, शोभतं का हे तुला !

दुर्यो. : चालून आलेलं राजपद ठोकरलंस– आता छल करतोयस वेतन का गुरुदक्षिणा याचा !

युधि. : एकलव्या, गुरुदक्षिणेचा अधिकार अधिकृत शिष्यालाच असतो. अनधिकृत छात्रानं वेतनच द्यावं लागतं.

एक. : मी अनधिकृत ? तो वाद आचार्यांनीच फार पूर्वी सोडवलाय. ते जाऊ दे. आचार्य, गुरुदक्षिणा म्हणून हा एकलव्य आपलं मस्तकसुद्धा तुमच्या पायाशी, आपल्या हातांनी वाहील. पण वेतन म्हणून, तुमचा आणि तुमच्या वचनाचा मान राखण्याचं शुल्क म्हणून लवभर केससुद्धा कोणी मागत असेल तर तो त्याचा त्याला छिनून घ्यावा लागेल. अर्जुना, शब्दानं शब्द वाढला म्हणून तू अंगठा मागितलास ! अंगठा कसचा, माझी धनुर्विद्याच मागितलीस. घे. तुझ्या आणि माझ्या गुरूसाठी तो द्यायला मी तयार आहे. पण तो तुला हिरावून घ्यावा लागेल. घाबरू नकोस. मघाशीच वचन दिलंय– तुझ्यासमोर लढायला उभा राहणार नाही मी. पण तू जोड हे धनुष्य अन् उडव हा अंगठा... बाईटही मानू नकोस... मला करता आली नाही ती गुरुसेवा तू केलीस तिचं हे मी दिलेलं वेतनच समज... अजून पुढं होत नाहीस ?... आचार्य, तुम्ही तरी माझी विनंती ऐका... सांगा ना त्याला हा अंगठा उडवायला !

द्रोण. : [ विमनस्क ] एकलव्या, तू धन्य आहेस ! अर्जुना, याच्या निष्ठेची, तुझ्या इच्छेची आणि माझ्या इमानाची ही सरळ आणि अपरिहार्य परिणती आहे. [ थांबून ] घे ते धनुष्य आणि मिळव ते वेतन, तो अंगठा !

[ एकलव्य हात पसरून उभा राहतो. अत्यंत खळबळलेला अर्जुन कसाबसा

सावरून धनुष्याला बाण लावतो. पण त्याचा बाण भलतीकडेच जातो. तो मान गुडघ्यात घालून बसतो. युधिष्ठिर झटकन पुढे होतो. एकलव्याला एका हातानं कवटाळतो. एकलव्याच्या चेहऱ्यावर मात्र गंभीरपणाच. वंचर सुहास्य. द्रोणांचा चेहरा सैल होतो. प्रसन्नता मात्र नाही. ]

युधि. : एकलव्या, तू पक्का कसाला उतरलास. ये. तुझ्या अंगठ्यासहित तू आमचा बंधू म्हणून रहा !

एक. : गुरुबंधो, मी तर तुमचा बंधूच आहे. पण त्यासाठी या वेतनाच्या अंगठ्याचं उपायन कशाला ? तुमच्या आणि माझ्या या गुरूला, त्याची गुरुदक्षिणा, त्याचं वेतन, तेही एवढंसं-- मिळवून देणारा शिष्य तयार करता आला नाही, अशी माझ्या गुरूची अपकीर्ती होऊ देणार नाही ! अर्जुनाला नसेल जमलं, पण म्हणून काय झालं ? हा एकलव्य आहे ना आचार्यांचा शिष्य ! [ झटकन युधिष्ठिराच्या हातातून सुटून बाणाकडं धावत जातो. ]

द्रोण. : [ ओरडतात ] एकलव्या, थांब ! [ अर्जुन उठतो. तो काही करण्याच्या आतच एकलव्य बाणाचं टोक अंगठ्यात खुपसतो आणि त्याच्या पेरासकट द्रोणांच्या पायाशी तो बाण टाकतो. भयाण शांतता. ]

वंचर : [ आर्त स्वराने ] एकलव्या ऽ ऽ रे ! [ तोंड झाकून बसतो. ]

द्रोण. : [ एकलव्याकडे जातात. त्याला जवळ घेतात. त्याचा चेहरा समाधानानं भरलेला. द्रोण त्याचा वाहता अंगठा हातात घेतात. ] काय केलंस हे एकलव्या. कशासाठी ? कुणासाठी ?... [ अर्जुनादिकांकडे दृष्टी जाते. ] भागली ना भूक तुझी अर्जुना. मग जा आता. सारेच जा. ते रक्ताळलं पेर पण घेऊन जा बरोबर... [ हालत कुणीच नाही. सगळे भकासपणं पाहतात. कडक आवाजात ] निघा म्हणतो ना ! [ सारे खालच्या मानेनं निघतात. ] वत्सा एकलव्या, मला क्षमा कर.

एक. : [ गंभीर मुद्रेनं वर बघतो. ] आचार्य, मी तुम्हांला क्षमा करणार ?

द्रोण. : होय, तू. मी तुझा घोर अपराधी आहे. हे अघोरी कृत्य माझ्यामुळं झालं... तोंड अर्जुनाचं, शब्द माझे ! क्षमा केली म्हण, नाही तर हाच बाण माझ्या कंठात खुपसून मला जीव द्यावा लागेल.

एक. : [ स्वतःला सांभाळीत. त्यांचं सांत्वन केलं पाहिजे या जाणिवेनं ] किती भयानक बोलता हे, आचार्य.

द्रोण. : आम्ही एवढं भयानक वागतो त्याचं काहीच नाही ? अरे, माणसाचा हात लागलेल्या पिल्लाला कावळ्यांनी टोच्या माराव्यात तसं आम्ही तुला भंडावलं ! एकलव्या, क्षमा म्हण !...

एक. : क्षमा ? आचार्य, आज तुमचा हात पाठीवर फिरला हेच केवढं भाग्य !

द्रोण. : कोण आचार्य ? मी सर्वस्वी अनाचार्य आहे. तुझा आचार्य हा, हा न बोलणारा मातीचा पुतळा ! तुझ्याशी बोलतो आहे तो मातीचा कच्चा गोळा, पाची जनांचा

मळाकं काळवलेला !

एक. : नका नका आचार्य; पुढं बोलू नका ! ऐकवत नाही हे सारं ! माझे गुरू तुम्हीच. आणि गुरूची असली निंदा प्रत्यक्ष गुरूच्यासुद्धा तोंडून ऐकू नये !

द्रोण. : ही निंदा नाही ! हे सत्यकथन ! या जगात, या ना त्या प्रकारचे मुखवटे घेऊनच वावरत असतात सारी माणसं ! मीही आचार्यपदाचा एक मुखवटा घालून वावरत आलो. या मुखवट्यांच्या आत सारा नागवेपणाच असतो. तूच एक असा भेटलास,– ज्याला मुखवटा नाही; ज्याच्यात नागवेपणाचा लेश नाही आणि नागडेपणाची लाज नाही; ज्याच्या आरपार पाहता येतं आणि तसं पाहिलं तरी ज्याच्या पोटात मळ म्हणून दिसत नाही ! म्हणून तुझी क्षमा –

एक. : [ स्तुतीनं संकोचून ] आचार्य, मळ नसला तर तो तुमच्या प्रसादानं; तुम्हीच दिलेल्या विद्येनं धुवून गेला असेल ! पण, पण तुमच्या मनाचा हा दाह कसा गारवावा, हे काही मला कळत नाही.

द्रोण. : एकलव्या, हा दाह नाही. हे अग्निहोत्र्याच्या घरातलं धगधगतं अग्निकुंड आहे. ते जन्मादारभ्य धगधगतच आलेलं असतं आणि कधीच विझायचं नसतं. मघा तू बारा वर्षांपूर्वीची कथा सांगितलीस. एकेका वाक्यातून आठवण जागी झाली ! तुला काढून लावताना क्षोभ झाला खरा, पण तुझी पाठ फिरली आणि तो क्षोभही पार जिरला. मग, शांत झालेल्या माझ्या आर्य मनानं मला सांगितलं, 'अरे धर्मज्ञा, तू केलं तेच योग्य झालं. शुक्राचार्यांनी कचाला विद्या दिली तशी तू या निषादाला दिली असतीस तर, आर्यांच्या द्विजकुलावर एक पारधीच सोडला असतास ना ! शुक्रांचा मनःक्षोभ शमवणाऱ्या मद्यानं असुरांचा घात केला, द्रोणाच्या मनःक्षोभाच्याच मद्यानं आर्यांचा घात केला असता !' ते मी ऐकलं आणि पूर ओसरलेल्या नदीसारखा मार्गक्रमणा करू लागलो !

एक. : आज तुम्हाला सांगतो आचार्य; मी तुमच्याकडे आलो तेव्हा माझ्याही मनात कचासारखाच विचार होता. पण माणूस म्हणून जे प्रसादशब्द तुम्ही सांगितले त्यांनी माझं शोधन झालं !

द्रोण. : त्या काळी मनाचं एक संपुट थोडं खऱ्या नीतीनं भरलेलं होतं; म्हणून तेव्हा तुला प्रसादवत् वाटलेले ते शब्द या मुखातून बाहेर आले. बारा वर्षांत, त्या संपुटा-तल्या त्या नीतीचाही जळून कोळसा झाला आहे. आता ते विचार आठवत नाहीत, आठवले तर ओळखत नाहीत, ओळखले तर रुचत नाहीत, रुचले तर पचत नाहीत ! म्हणून मी अनाचार्य ! आज तर अनाचारी पण ! आमच्या व्यवस्थेनं नियत केलेल्या कर्कश नीतीच्या गणितातून निघणाऱ्या सुबक पण निर्जीव आकृत्यांवर नाचणारा कळसूत्री बाहुला !

एक. : आचार्य, मला या साऱ्याचा काहीच बोध होत नाहीय. मी काय सेवा करू हो तुमची ?

द्रोण. : तुला न कळू दे. मला मात्र कळू दे! तुझ्या पायांशी धडे घेण्यासाठी हा आचार्य स्वतःची पूर्वपीठिका तुला सांगत आहे. ऐक. मी कुठं वाढलो? एका द्रोणाकार नावेत– हा चंचर म्हणाला ते अगदी खरं होतं! जगानं मला सांगितलं, 'भरद्वाज मुनी तुझे वडील!' आणि म्हणून मी झालो भारद्वाज! थोर ब्राह्मण कुळातला गुणी पुत्र! माझी आई मला माहीतच नाही! कोण होती ती? चांडाळसुद्धा असेल! आईच्या दुधाची धार मला कधी चोखायलाच मिळाली नाही, तर तू म्हणालास ती भावना माझ्या मनात रुजणारच कुठून? सुरुवातीला कुणीकुणी माझा उपहासही करायचे– पण बीजक्षेत्राच्या नियमानुसार चांडाळभूमीतला हा अंकुर ब्राह्मण्याचा वृक्ष म्हणून वाढीला लागला. त्याच्या बुद्धीची रसाळ फळं हवीत, म्हणून त्याला ब्राह्मण म्हणायला कोणाचीच ना नव्हती! धनुर्विद्येत पारंगत होऊन मी क्षत्रिय व्हायचा खटाटोप केला – पण, जन्मानं क्षत्रिय असलेल्या माझ्या एकाकाळच्या गुरुबंधूनं मला माझी जागा दाखवून दिली! त्याच वेळी या व्यवस्थेवर प्रहार करण्याची इच्छा बळावली. पण या आखीव व्यवस्थेच्या गणितानुसार, अंकगणितातला प्रश्न सोडवायला बीजगणितातली रीतसुद्धा चालत नाही. तो प्रहारसुद्धा त्या व्यवस्थेच्या नियमांनीच करणं जरूर होतं. क्षत्रियाशी क्षत्रियालाच झुंजवायला पाहिजे होतं. म्हणून मग क्षत्रिय-शिष्यांच्या शोधात फिरलो. मन जळत होतं पण पोट जाळीत होतं. अरे, या पोरांना कोरड्या विहिरीतली विटी काढतो म्हणालो न् लागलीच शूद्रासारखं विनवलं : गोळाभर भात द्या रे आधी! थूः माझ्या वृत्तीवर. अन् त्याच पोटाची खळगी भरत राहण्यासाठी ही कुरूंची पिलावळ वाढवायचं काम अंगावर घेतलं! माझ्या विद्येचा व्यापार केला! मग वाटलं मी विकणारा आहे! खरा विकला गेलो होतो तो मी! आर्य क्षत्रियांच्या वेतनाच्या दोऱ्यांनी आणि गुरुभक्तीच्या गाठींनी करकचून आवळलेला, जखडलेला दस्युश्रेष्ठ झालो होतो तो मी! म्हणूनच रे, तेव्हा मी तुला घेऊ शकलो नाही!

एक. : आचार्य, मिळायची ती विद्या मला मिळालीच ना!

द्रोण. : मिळाली नाही, तू मिळवलीस! अरे, मला येत नाही ते तू शिकलास; मी कसला तुझा गुरू? या द्रोणाचीच काय, एखाद्या दगडाचीसुद्धा उपासना करून तू थोर झाला असतास. झालासच की, या मातीच्या पुतळ्याची सेवा करून! आणि मी? बीजानं ब्राह्मण, शिक्षेनं क्षत्रिय, वृत्तीनं वैश्य, कृतीनं शूद्र असा मी... या व्यवस्थेच्या सूत्रांवर नाचत, माझ्या परात्पर क्षत्रियशिष्यांसह येऊन तुझ्यासारख्या विद्येच्या उपासकावर तुटून पडलो आणि क्षेत्रानं चांडाळ आहे हे पक्कं सिद्ध केलं! तुला क्षमा मागितली– पण नाही... मला क्षमा नाही! [ सुन्नपणं डोकं धरून खाली कोसळतात. इतका वेळ भकासपणं ऐकत असलेला चंचर द्रोणात उरलेलं पाणी त्यांच्या डोक्यावर आणून थापतो. एकलव्य त्यांना धरून असतो. ते

हळूहळू भानावर येतात. ]

एक. : आचार्य, असं वाटतंय ना हो तुम्हांला ?

द्रोण. : [ स्वतःला सावरून ] एकलव्या, तू जायला निघालास ना. जा. माझा आशीर्वाद आहे तुला अन् वंचरालासुद्धा ! [ पुन्हा उद्विग्न ] पण काय उपयोग त्या आशीर्वादाचा. तुझा अंगठा तर छाटून घेतला ! काय करशील रे तू आता ऽऽ !

एक. : [ बळेच्या उत्साहानं ] आचार्य, अंगठा गेला म्हणून सारी विद्या थोडीच गेली ! बाण लावायचा वेग गेला इतकंच ना ! अन् विद्या पुरी झाली तेव्हाच लढायची इच्छा पण संपली ! आता मला लढायचंच नाही, तर वेग गेला म्हणून खंत कशाची ! तुमच्यासारखा ध्रुवतारा समोर असताना माझी वाट मला सापडणार नाही कशी ? तुमच्याचसारखा शिक्षक होऊन शबरांना शिकवीत राहणार आहे आता !

द्रोण. : [ तटकन् उठतात. कपाळाला हात लावीत ] हाय एकलव्या, अरे, काय ठरवून बसलास ? शिक्षकाच्या वाट्याला केवढ्या दारुण निराशा वाढून ठेवलेल्या आहेत तुला माहीत नाही ! माझ्याकडं तरी बघ !

एक. : आचार्य, अर्जुन– एकलव्यासारख्या मानसपुत्रांच्या गुरुपित्यानं असं का म्हणावं ?

द्रोण. : का म्हणावं ? पृथ्वीच्या पाठीवरचा पर्वत एवढासा असतो पण त्याची मुळं असतात शेषाच्या मस्तकापर्यंत. ती कुणाला दिसतात ? दुरून भव्य दिसणाऱ्या गुरुजीवनाचे किती वासे पोकळ असतात कोण पाहतो ? न पाळण्याचा आदर्श म्हणून समाज गुरूला डोक्यावरही घेतो पण वेळ आली की व्यवहाराच्या खडकावर खाडकन फोडूनही टाकतो. आपल्या कर्तव्याच्या कठोर मागण्या आणि मनाच्या अतृप्त इच्छा यांच्या खुंट्यांमध्ये त्याच्या मनाचा धागा न् धागा ओढला, ताणला, पिळला जातो ते कोण बघतो ? तेही असो. अगदी विद्येच्या व्यापात तरी त्याला यश मिळतं का ? शिष्यात् इच्छेत् पराजयम् ही गुरूची परम इच्छा असते म्हणे ! कोणत्या गुरूनं हे ठरवलं देव जाणे. बहुधा एखाद्या मठ्ठ शिष्यानंच हा घट्ट दंडक घातला असावा. कारण, अरे, शिष्याकडून गुरूला पराजयाखेरीज काही मिळतच नाही !

एक. : असं कसं आचार्य ? खऱ्या गुरूच्या पायावर–

द्रोण. : एक शिष्य दुसऱ्याला अंगठा वहायला लावतो ! लावतो ना ? तेच मी सांगतो. बघ–बघ ही माझ्या गळ्यातली पराजयाच्या पदकांची माळा ! ऐक ! मनात मोठी उमेद होती की माझाच अंश अशा माझ्या पुत्राला द्रुपदाच्या आसनावर बसवीन– तुझ्या विद्येच्या जिवावर. तेवढ्यासाठी त्याला ' अश्वत्था ' म्हणत आलो. त्याला मोठा करण्याच्या नादात पक्षपातसुद्धा केला ! बघतो तर त्याला विद्येची चाडही नव्हती, क्षमताही नव्हती. हा पहिला पराजय ! तुझ्यासारखा विद्येचा अभिलाषी

आला तर त्याला खालच्या मिठाला जागण्यासाठी हाकलावं लागलं आणि जे माझं झालं असतं असं केवढं मोठं श्रेय हरपलं ! हा दुसरा. अर्जुनासारखा थोर शिष्य लाभला. त्याच्याकरवी माझी चिन्मय विद्या अजेय करीन म्हटलं–तर माझ्याच मृण्मय रूपाकरवी तू शिकलेल्या विद्येनं त्याचा आणि माझाही पराजयच केला. वेतन देतात त्यांच्याकडून गुरुदक्षिणेचीअपेक्षा ठेवतो आणि गुरुदक्षिणा देऊ बघतो त्याच्याकडून मी पापाचं वेतन मागतो ! स्वतःच्या तोंडानं मागायची लाज वाटते म्हणून लोकाच्या तोंडानं मागतो ! का ? ? मला माझ्याच शब्दात पकडून, माझ्याचकरवी पण केवळ स्वतःच्या अजेयत्वासाठी अर्जुनानं तुझं विद्याहरण करवलं हा माझ्या विद्येचा, नीतीचा आणि शीलाचाही पराजय ! ( एकलव्य रोखू पाहतो. ) पुढे ऐक : या माळेतला मेरुमणी होईल असा पराजय अजून पुढेच आहे. मी ज्योतिषी नसलो तरी ते भविष्य मला स्पष्ट दिसते आहे. बारा वर्षे यांची चालचलणूक पाहिली आहे. आर्यांच्या या थोर कुळात सरळ दोन तट पडणार, त्यांचा निर्णायक संग्राम होणार, आणि त्यात हा द्रोण धृतराष्ट्राच्या अन्नाला जागून, त्याच्या मुलांच्या बाजूनं, पंडूच्या गुणी मुलांवर प्रेम करीत पण त्यांच्याविरुद्ध आणि स्वतःच्या मनाविरुद्ध मोठ्या शौर्यानं लढणार ! फलित काय ? स्वतःच तयार केलेल्या सर्वोत्तम शिष्याकडून पराजयांतला पराजय ! [ शांतता. ] तेवढ्यात तू सुदैवी आहेस. तू लढणारच नसल्यामुळं हा पराजय तरी तुला भोगावा लागणार नाही. जा एकलव्या, फा ऽ र उशीर झाला तुला. वंचरा, कर बाबा सारं गोळा...

[ वंचर मूर्तीजवळ जाऊन ती उचलून घ्यायला लागतो. ]

वंचर : एकलव्या, ह्याला चीर पडली रे !

[ एकलव्य आणि द्रोण चमकून तिकडे पाहतात. ]

द्रोण. : [ काहीशा विकटपणं ] अहाहा ! या द्रोणाच्या दुभंग व्यक्तित्वाचीच ही मूर्ती... वा वा !

एक. : [ अत्यंत दुःखित. ] घात झाला माझा. क्षमा करा आचार्य. माझ्या हृदय-मंदिरातल्या गुरुमूर्तीला कुठं तरी तडा गेला ! असं कसं झालं ! वंचरा, अरे ही भग्नमूर्ती कशी न्यायची आपण ?

द्रोण. : [ गंभीर पण शांत. ] अगदी योग्य झालं ! एकलव्या, मूर्ती नेऊच नको. गुरूचं ओझंच तुझ्यावर नको. गुरूला वाहू नकोस, गुरू होऊही नकोस. तू समूर्त शिष्य आहेस. नुसत्या धनुर्वेदाचा नव्हेस. मनुष्यमात्रात विश्व जाणून घेण्याची, त्याचा शोध घेण्याची जी आदिम प्रवृत्ती आहे तिची तू मूर्ती आहेस. तुझ्या विद्येचं श्रेय मला नाही, त्या मूर्तीलाही नाही. तुझ्या निष्ठावान प्रयत्नाला आहे. सर्वात अधिक तुझ्या दुर्दम्य जिज्ञासेला आहे. एकटाच नीघ.

एक. : वंचरा, चल. आचार्य, जाण्यापूर्वी एकदा– [ द्रोणांना वंदन करण्यासाठी वाकतो.

वंचरही त्याच्याचबरोबर पण किंचित नंतर वाकू लागतो. द्रोण दोघांनाही वरच्या-वर तोलून धरतात. ]

द्रोण. : नाही. एकलव्या, आता नमस्कार नाही.

वंचर : [ हळू आवाजात ] आचार्य,...

द्रोण. : [ घाईने ] छे छे वंचरा. चांगला खडसून म्हण : गुरू रे म्हणून. आपण माणसं ना सारेच ! इथं कोण कुणाला मोठा ? अन् नमस्कारच करायचा असला तर तो ह्या एकलव्याला ! कारण, द्रोण–अर्जुन विसरले जातील, पण या विशाल आणि अद्‌भुत विश्वात जोवर जिज्ञासा म्हणून आहे तोवर, एकलव्याचे नाव सगळ्यांना स्फूर्ती देत राहील.

[ पडदा पडत असताना ओवी गायिली जाते :

इये विश्वी सचराचरी । आणि जिज्ञासाही जववरी
स्फूर्ती दीजो तववरी । एकलव्य ॥ ]

* * *

## एकलव्य

### महाभारतीय कथेतले पवित्रभीषण नाट्य

हे अत्यंत विद्रोही नाटक आहे, हे, कुणी नुसतं वाचूनसुद्धा बघितलं तरी त्याच्या मनावर ठसेल. हे विद्रोही नाटक विद्रोहाचं अध्यात्म सांगतं.

**दि. के. बेडेकर**

हे नाटक वाचण्यासारखंच आहे असं मला वाटतं. कारण की विचारप्रधान आहे.

**यदुनाथ थत्ते**

जुन्या पद्धतीचा नाटकीपणा त्यांच्या भाषेत नाही. परंतु ही भाषा लवचिक व मनाचा वेध घेणारी आहे.. या भाषेने नाटकाचा प्रभावीपणा व सामर्थ्य आणखीच वाढायला मदत झाली आहे.

**केशव मेश्राम**

नाट्यसृष्टीतून शूद्र तेवढा राहिला होता. एकलव्याच्या रूपाने खैरे यांनी शूद्राच्या जीवनाला वेगळ्या तऱ्हेने स्पर्श केला आहे. एकलव्याइतकंच हे नाटक दुभंगलेल्या मनाच्या द्रोणाचार्यांचं आहे.

**दया पवार**

एकलव्यकथेचे हे नाट्यरूप रंगावृत्तीस फारसे पोषक नसले तरी मनस्वी मनोवेधक निःसंशय आहे.

**माधव मनोहर**

संमत